903 इतिहास

भंडारी लोकांचा
वृत्तांत


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा

विठोबा सोनजी चव्हाण,

यानें लिहिला.

तो

विद्वज्जनमान्य भिकोबा लक्ष्मण चव्हाण,

यांनीं

सुधारून वाढविला.

---

( या ग्रंथाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें मांडून ग्रंथकारानें सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

---

मुंबई

धी "जॉइंट-स्टॉक" प्रिंटिंग प्रेसमध्यें छापिला.

---

सन १८८७ इसवी.

शके १८०९.

किम्मत पांच आणे.

# ओवी.

संपूर्ण ग्रंथ पाहिल्याविना ॥
उगाच कराल कल्पना ॥
तेणें होईल विटंबना ॥
तुमचीच कीं निश्चयें ॥ १ ॥

वि० भि०


ावें... ९५
.... ६०
.... ६१
......... ७४
७६


# सूचना.

'भंडारी लोकांचा वृत्तांत' पुस्तकरूपानें प्रसिद्ध व्हावा असें वाटल्यावरून, आह्मी सन १८८३ सालीं "दीनबंधु" पत्रांत पांचवेळ जाहिरात देऊन सदर्हू लोकांविषयीं माहिती मागविली होती. व त्या जाहिरातीचीं साहा हजार पत्रकें छापवून उत्तर व दक्षिण कोंकणांत त्यांचा प्रसार व्हावा ह्मणून प्रत्येक तालुक्यांत पाठविलीं होतीं. तथापि इच्छेनुरूप कोणाकडून अल्पस्वल्पही माहिती लिहून आली नाहीं. ह्मणून आह्मी ह्या प्रयत्नास लागून सामर्थ्यानुरूप हा लहानसा ग्रंथ स्वज्ञातिसेवेंत सादर केला आहे.

असो, उत्तर व दक्षिण कोंकणांतील भंडारी आणि त्यांचे वंशज ... शहरांत राहत आहेत, त्यांसर्वांस विनंती करण्यांत येते ...णते स्वज्ञातिपुरुष कसकसे उदयास आले (तीं कारणें), ...रूप, वसतिस्थानें वगैरे इत्थंभूत वृत्तांत लेखी किंवा दंतकथे... रून मिळल तो कृपा करून खालीं सही करणार यांजकडे टपाल... ार्गें मुंबई येथें खडकावर निशानपाडा रस्ता नं० ८९ च्या घरांत, अथवा कोटांत टाईम्स ऑफ् इंडिया स्टीम प्रेस जॉब डिपार्टमेंट... ध्यें पाठविण्याची तसदी घ्यावी. ह्मणजे ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढण्याचें अगत्य दिसल्यास, लिहून आलेल्या माहितीबद्दल अवश्य विचार होईल.

विठोबा सोनजी चवाण.

...ख १ माहे सप्टेंबर सन १८८७.

# अनुक्रमणिका.


विषय.

वृत्तांत लिहिण्याचें कारण. ........................................ १
जातीच्या उत्पत्तीचा उद्देश अथवा रहस्य ........................................ ५
लेखी ग्रंथाचे पूर्वी तोंडच्या कथा. ........................................ १३
भंडारी लोकांच्या उत्पत्तिविषयीं दंतकथा ........................................ १४
नारळीच्या झाडाचें आहे तसें साधें वर्णन. ........................................ २२
,, झाडाचे उपयोग ........................................ ३०
भंडारी लोकांचा इतिहास........................................ ३२
,, जातीच्या उत्पत्तीची पौराणिक कथा........................................ ३४
शाण्णव कुळें ........................................ ३८
त्यांच्या पूर्वजांचें मूळचें स्थान कोंकणप्रांत किंवा दुसऱ्या कोणत्या देशाहून आलेले होते वगैरे ऐतिहासिक यथार्थ गोष्टी........ ५५
भंडारी लोकांस गोमांतक प्रांतांतील गांवांवरून पडलेलीं उपनांवें... ९५
भंडारी लोकांचे देव ........................................ ६०
,, ,, चा धर्म........................................ ६१
,, ,, चा आचार........................................ ६२
,, ,, ची व्यवहारिक रीतिभाती........................................ ६३
,, ,, चे अधिकार........................................ ६४
,, ,, चीं कर्में........................................ ६५
,, ,, चा गुण ........................................ ६६
,, ,, ची स्थिति ........................................ ६६
,, कोणत्या वर्णांत मोडतात तें ........................................ ७१
,, लोकांचे पराक्रम ........................................ ७४
लोकांचा संभवनीय आणि खरा वृत्तांत ........................................ ७६

संग्रह नं. ११४५

# भंडारी लोकांचा वृत्तांत.

## वृत्तांत लिहिण्याचें कारण.

जातिभेदाच्या प्रकारविशेषानें तद्देशीय लोकांची प्रत्येक जाति विदेशीय लोकांसारखी निराळी झाली आहे, ह्मणून तिचा वृत्तांत असल्यावांचून त्याविषयीं पूर्ण माहिती व्हावयाची नाहीं.

एतद्देशीय हिंदु लोकांहून भंडारी लोक निराळे नाहींत, ह्मणून त्यांचा निराळा वृत्तांत नको होता; परंतु त्यांत ज्यापेक्षां जातिसंबंधी विचार येऊं पाहतो, त्यापेक्षां येथें त्याचा स्वल्प तरी उल्लेख केला पाहिजे; तो थोडक्यांत करितों.

समान गुणाच्या किंवा धर्माच्या अनेक पदार्थांचा जो समुदाय, ती जाति. तसेंच या पदार्थाहून तो पदार्थ निराळा, अशा भेदभानास कारणभूत जे पदार्थांच्या अंगीं परस्परांहून भिन्न गुण अथवा धर्म असतात, ज्यांच्या भेदावरून चराचर सृष्टीमध्यें जातिभेद दिसून येतात, त्या प्रत्येक सामान्य जातीच्या पोटांत अल्प सामान्यादि जातिभेदांचा विस्तार झाला आहे. जसें जारज, अंडज, उद्भिज्ज, स्वेदज; या चार खाणी अतिसामान्य जातीच्या रूपानें परस्परांहून भिन्न आहेत. तशाच त्यांतील मनुष्य, पशु, पक्षी, वनस्पति, मत्स्य, कीटकादि पोटभेदाच्या असंख्य सामान्य जातिही भिन्न आहेत. त्यांची विद्वान् लोकांस अजून

बिनचूक गणती सांपडली नाहीं असें ह्मणतात. आमच्या प्राचीन विद्वानांनीं ज्या चौऱ्यांशी लक्ष योनि ह्मणून सांगितल्या, त्याही जातीच होत. असो; हे सांगितलेले जातिभेद जसे स्वतःसिद्ध आहेत, तसे एका मनुष्यजातींतील जातिभेद हे स्वतःसिद्ध नाहींत. ते कर्म, वर्ण ( रंग ), धर्ममत, देश इत्यादिकांवरून मानिलेले कृत्रिम भेद आहेत. तथापि सृष्टीची स्थिति सुभग होण्यास तींतले स्वतःसिद्ध भेद जसे कारण झाले आहेत, तसेच देशाची स्थिति उत्कृष्ट करण्यास त्यांतल्या कृत्रिम जातिभेदांनींहि उपयोगी हेतु होण्याची अवश्यकता आहे. त्या प्रकारचा हेतु सांगण्यापूर्वीं आमच्या जुनाट कथांची व प्राचीन ऐतिहासिक ग्रंथांची तऱ्हा जरा येथें सांगून ठेवूं द्या.

ती अशी आहे कीं, एखादे गोष्टीचें यथातथ स्वरूप लोकांस सहज उमगूं नये इतका अलंकार आणि विस्मयादि रसांचा घणदाट वेसवार* त्या कथांत कालवून, त्या जितक्या अलौकिक व आश्चर्यकारक वाटतील, तितक्या असंभूत करून वर्णायाचा परिपाठ आमच्या प्राचीन ग्रंथकारांचा आढळतो. ती एक त्यांची पुराणी भाषाच होय, असें समजून तिचा सृष्टिनियमानुसार भाषांतररूप तात्पर्यार्थ निघेल तेवढा काढून घेण्यापुरता त्या ग्रंथांचा गौरव केला पाहिजे.

---

* मसाला. बाहेर गांवीं नवे आंबे झाले ह्मणजे लहान मुलें मिळून तिखट मीठ मसाला व गूळ घेऊन रानांत जातात, व तेथें उत्तम आंब्याच्या कैऱ्या झाडावरून काढून त्या चिरून त्यांत तिखट मीठ मसाला व गूळ घालून खातात; त्या मसाल्यास वेसवार ह्मणतात.

भरतखंडांतील अदृष्टवादी लोक, ज्यांस इतर देशाचे लोक ह्मणतात, त्यांच्या प्राचीन धर्मग्रंथांत अशी कथा सुप्रसिद्ध कीं, सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाच्या अंगाचे पुरुष आणि स्त्री दोन भाग झाले. त्या पुरुषाचें नांव स्वयंभुमनु, आणि नांव शतरुपा स्त्री; या स्त्रीपुरुषांच्या युग्मापासून मानवी वाढत गेली. ब्रह्मदेवाच्या अंगापासून चार वर्णांची उत्पत्ति, ती गुण आणि कर्में यांवरून झाली; असें गीतेंत तलें आहे. त्या पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहुपासून य, पोटापासून वैश्य आणि पायांपासून शूद्र; असे चार वर्ण न्न झाले.* नंतर उंच नीच वर्णाच्या स्त्रीपुरुषांपासून अनुज, प्रतिलोमज, इत्यादि बहुत जाती उत्पन्न होत गेल्या.

य चार वर्णांचीं कर्मेंः—धर्मसंबंधीं काम चालविणारे ब्राह्मण, र्म करणारे क्षत्रिय, व्यापार करणारे वैश्य, आणि तीन चो चाकरी करणारे शूद्र; हीं कर्में येथें संक्षेपानें सांगितलीं. वरून वर्ण सांगितले, त्याखेरीज सत्पुरुष विवेकदृष्टच्या स्वाभा-. गुणावरून वर्ण मानितात, तें असेंः—जो ब्रम्ह जाणतो तो ब्रा-ग, कामादि शत्रूंस जिंकितो तो क्षत्रिय, प्रामाणिकपणानें व्या-करितो तो श्रेष्ठ ( शेठ ) वैश्य, आणि तमोगुणानें निंद्य वर्तन ती तो शूद्र ( क्षुद्र ), हे वर्ण खरे ह्मणावे. याशिवाय ज्योतिषी-र्णक लोक मनुष्याच्या जन्मकालचा नक्षत्रयोग पाहून त्यावरूनही वर्ण सांगत असतात, आणि त्याचा जन्मपत्रिकेंत उपयोग करितात.

---

* आणि प्रत्येक वर्णामध्यें आणखी पुष्कळ वर्णभेद उत्पन्न होऊन जाती झाल्या.

पुढें यांतीलच मतांतराच्या लोकांनीं आपल्या मत चीन परमेश्वर, ब्रह्मदेव, पुरुष, शिव, विष्णु, शक्ति इत्यादि आराध्य दैवतें मानिलीं; आणि त्यांच्या मुख, बाहु, मांड्या उदर आणि पाय अशा चार अंगांपासून चार वर्णांची उ झाली, असें आपल्या मताप्रमाणें ह्मणून दैवत घेऊन लिहिलें अनेक दैवतांतून अन्यतम दैवत जरी घेतलें, तरी त्याचें ता एकच आहे. भगवद्गीतेंत भगवान कृष्णानीं ह्मटलें आहे चार वर्णांचा समुदाय मीं गुण आणि कर्म या विभागेंकरून के गुणावरून सत्पुरुष विवेकदृष्टीनें चार वर्ण मानितात.

सांप्रत भरतखंडांत हिंदूंच्या जितक्या जाती उपलभ्य आहेत, तितक्या सर्व जाती पूर्वोक्त चार वर्णांत समाविष्ट आहे परंतु कोणत्या वर्णांत कोणत्या जाती मोडतात, याविषयीं सर्वमा निर्णय अद्यापि आह्मांस समजला नाहीं. ब्राह्मण वर्णांत जातिविशेषाच्या नांवापुढें प्रथम वर्णाची ब्राह्मण ही संज्ञा ज ल्यानें रांगडेब्राह्मण, नागरब्राह्मण, श्रीमाळीब्राह्मण, देश ब्राह्मण, चित्तपावनब्राह्मण, गौडब्राह्मण, पळशेब्राह्मण, जउ ब्राह्मण, लंबोरीब्राह्मण इत्यादि जसे ब्राह्मण जातीचे भेद क तात, तसे क्षत्रियादि खालच्या वर्णांतील रजपूतक्षत्री, शीख गुरुखेक्षत्री, मराठेक्षत्री, असें म्हणण्याची चाल नसल्या क्षत्रियादि वर्णांतल्या जातीचे भेद सर्व कळत नाहींत. ज्या लोकांनीं विद्येवर निष्ठा ठेविली, किंवा देशहितार्थ जगप्रसिद्ध पराक्रमानें उच्चत्व पावले, आणि ज्यांनीं विद्येचा अनादर करून हलकी वृत्ति अंगिकारिली, ते क्षुद्रत्व पावले, यांत नवल नाहीं.

राजिस्टर ९०३

# जातीच्या उत्पत्तीचा उद्देश अथवा रहस्य.

श्रीअनाद्यनंत परमेश्वरानें चिच्छक्तीच्या योगानें आपल्या आधारामध्यें, केव्हांपासून, कोठें कोठें, केवढीं केवढीं, कसीं, कोणत्या प्रकारचीं आणि किती संख्य जगें, कितीदां उत्पन्न केलीं, आणि लयास नेलीं; याविषयीं मनुष्याच्या अल्पांशी मतीला निश्चित कल्पना करण्याची शक्ति नाहीं. तथापि चुकतवाकत किंचित् तरी कल्पना करण्यास काय तो या सृष्टीचा आधार आहे. इजवरून मनुष्याचे स्थितिविषयीं असें दिसून येतें कीं, दुसऱ्याच्या सहाय्यावांचून एकट्या मनुष्याचा चारितार्थ चालूंच नये. सर्व सद्गुणांनीं परिपूर्ण असेंच परमेश्वराचें अद्वितीय रूप आहे. ते गुण मनुष्याच्या आत्मत्वांत अंशतः बिंबले आहेत, हें कोणाच्यानें नाहीं ह्मणवणार नाहीं. त्या गुणांचें मनुष्याकडून आचरणद्वारानें प्रकाशन व्हावें, त्याचेंच नांव धर्म; यावरून धर्मानें चालणें हें परमेश्वराचें अथवा त्याच्या महिम्याचें प्रदर्शन जाणावें. धर्माचरण करणारा मनुष्य धर्मसंबंधी आपली योग्यता व विचार जसजसे वाढवीत जाईल, तसतसें ईश्वरी गुणाच्या शक्तीचें कल्याणप्रद फळ त्यास प्राप्त होईल; हीं फळश्रुतीचीं पुष्पीत वाक्यें नव्हत. याविषयीं साक्षात् प्रतीति अनुभवास आली तर होय ह्मणा.

श्रीविश्वंभर परमपुरुषाचे अवयव विराटपुरुष, विराटपुरुषाचे अवयव देशपुरुष, देशपुरुषाचे अवयव वर्गपुरुष, आणि वर्गपुरुषाचे अवयव व्यष्टिपुरुष ह्मणजे प्रत्येक मनुष्य; वस्तुच्या एका व्यक्तीला व्यष्टि, आणि तिच्या व्यक्तिसमुदायास समष्टि

ह्मणतात. व्यष्टीची गुणशक्ति अल्प, त्या मानानें तिचें कार्यहि लहान असतें. आणि पुष्कळ व्यष्टीच्या समुदायाची गुणशक्ति एकत्र झाल्यानें जी समष्टि गुणशक्ति होते, तिला बळकटी येऊन तिच्या कार्यांचें महत्व वाढत जातें; असा नेम दिसतो. यावरून व्यष्टि हे समष्टीचे अवयव, आणि समष्टि ही व्यष्टिच्या अवयवी; अशा कल्पनेनें बहुत प्रकारचीं रूपकें रचितां येतात. मनुष्यांच्या अल्प मतिप्रमाणें आणि अपूर्ण शक्तीनुसार, यथार्थ किंवा अयथार्थ कल्पना व विचार करायास काय तो आधार या सृष्टीचा आहे. सृष्टिवरून परमेश्वराच्या अस्तित्वादि नित्य सद्गुणांचा व महिम्याचा बोध होतो. परमेश्वर पूर्ण समर्थ, सद्गुणरूपी, अद्वितीय एकच आहे. त्याचा विश्वास, प्रीति, दया, क्षमा, शांति, औदार्य, परोपकार, न्याय, विनय, सत्कार आणि हितकर्त्या वरिष्ठांच्या आज्ञेचें* पालन, इत्यादि बहुत सद्गुणांचें किंचिदंश धरण्याची सर्व मनुष्यांस अधिक उणी शक्ति प्राप्त झाली आहे, ती कोणाच्यानें नाहीं ह्मणवणार नाहीं. त्या गुणानें मनुष्यांकडून ईश्वराशीं व परस्पर मनुष्याशीं आचरणद्वारा जें प्रकाशन व्हावें, त्याचेंच नांव धर्म होय. धर्मानें चालून ईश्वरी गुण प्रदर्शित करणें, हें ईश्वर आणि ईश्वराचा महिमा प्रदर्शित करण्यासारखं आहे. या विश्वांत ज्या मनुष्यांनीं, आपल्या ठायीं जी सद्गुणरूपी परमेश्वराची आंशिक शक्ति आहे, तिचा उपयोग करून सद्गुण बिंबवून घेतले आहत;

* आज्ञा, हें वरिष्ठांच्या स्वातंत्र्याचें निशाण अथवा झेंडा, त्याचें पालन ह्मणजे रक्षण समजावें.

तेच सर्व प्रजेचे खरे आईबाप, गुरु, आप्त, धनी, अधिकारी व राजे होऊन लोकांचें कल्याण आणि नियमन करीत आहेत; यावरून विश्वंभर सत्ताच सद्गुणधारी पुरुषाच्या रूपानें आश्रित विश्वाचें भरणपोषण करीत आहे असें उघड सिद्ध होतें.

वरकड जीं सद्गुणरहित धर्महीन अधिकारी मनुष्यें असतात, तीं केवळ सत्त्याचा अभाव दाखविणारीं लटकीं सोंगें शेवटीं निंदेस व धिक्कारास पात्र होतात; तसींच जीं आश्रित मनुष्यें व बाळकें आपल्या वरिष्ठांच्या हितकर आज्ञा मानीत नाहींत तींही अधर्मानें वागल्यामुळें परिणामीं दुःखास पात्र होतात. तस्मात् अल्प शक्तीचीं सद्गुणी मनुष्यें पूर्ण सद्गुणरूपी परमेश्वराचे अवयव होत, असें सृष्टींतील संकेतावरून मानायास वावगें दिसत नाहीं.

गुण, द्रव्य, क्रियादि आधारांस धरून कोणत्याहि अर्थाचें जें असणें, त्याला स्थिति ह्मणतात. देशकालचक्राचे ठायीं मनुष्याचे स्थितींत सुखदुःखाचा अंश दिसतो, त्याप्रमाणें स्थितीचे जे कारणपरत्वें निरनिराळे प्रकार होतात त्याला अवस्था ह्मणतात, ज्या अवस्थेंत दुःख कमी, आणि सुख अधीक, ती अवस्था उत्तम; आणि जिच्यामध्यें दुःख फार, आणि सुख थोडें, ती अवस्था निकृष्ट; असा साधारण समज आहे. निकृष्ट अवस्थेहून उत्कृष्ट अवस्थेस चढण्याची बहुधा सर्व लोकांस इच्छा असते. यावरून उत्तमावस्थेचीच फार अवश्यकता आहे असें दिसतें. स्थितीच्या श्रमसाध्य पायऱ्या क्रमून उच्चावस्थेस पोंहचायाला सर्वांसच साधत नाहीं, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी ती कोणाचे दैवीं येते हें निश्चित कळण्याकरितां सर्वांसच वारंवार झटून योग्य मार्गानें

उद्योग व परिश्रम केले पाहिजेत, मग स्थितीची कोणती तरी बरी पायरी हातीं आल्यावांचून रहात नाहीं.--बऱ्या वाईट गुणकर्माप्रमाणें सुखदुःखरूप जे फळभोग, त्याच पुरुषाच्या उंच नीच अवस्था होत. उन्नत अवस्था पावायास मनुष्यांनीं चांगलीं गुणकर्में धरावीं, ह्मणजे धर्मानें चालावें; हें दाखविण्या-करितां विश्वंभर परमपुरुषानें विश्वाची अवस्था आपल्या लेशांशें-करून केली आहे, असें कां मानूं नये.

लोक आणि लोकांनीं भरलेला देश यांत जर अवयव अवयव-विभावसंबंध कल्पिला, तर त्यांत देशाची अवस्था सुखाची असलीच पाहिजे. ही अवस्था सुखाची ह्मणजे उत्तम व्हावयास मनुष्यांनीं एका मेळ्यानें राहणें भाग आहे. मेळ्यानें वागण्यास पूर्वोक्त उपकारक साधुगुण धरण्याचें अगत्य आहे.

दुसरें, या संसारांत मनुष्याचे स्थितिविषयीं असें दिसून येतें कीं, दुसऱ्याच्या सहाय्यावांचून एकट्या मनुष्याचा चरितार्थ सुखानें कधींच चालूं नये. व्यवहारांत सर्वांस परस्परांच्या सहाय्याची गरज पडत असावी, व त्यांनीं परस्परांच्या व निरुपायी जनांच्या यथाशक्ति उपयोगीं पडावें. स्वदेशाच्या हितांत प्रत्येक व्यक्तीचें हित आहे, असें पक्कें उमजून देशाच्या सेवेंत भक्ति-पुरस्सर जसें तत्पर रहावें लागतें, तसें राहून स्वदेशाभिमान हा आपला मुख्य धर्म पाळून स्वराष्ट्राची उन्नति साधावी. हीं अवयवांचीं कामें उत्तम प्रकारें बजाविलीं जावीं, ह्मणून एकाहून एक भिन्न अशीं नानाप्रकारचीं अवश्यक कर्में संपादायाचे अधिकउणें गुण किंवा अनुकूळ शक्ति देवानें मनुष्यांस वांटून दिल्या आहेत. अचे-

तन पदार्थ आणि सचेतन प्राणी यांचें मोल त्यांच्या गुणावर आहे, आणि मनुष्यांचें मोल ह्मणजे त्यांची योग्यता त्यांच्या ज्ञानादि सद्गुणावर व कर्मावर अवलंबून आहे; यावरून 'गुणास मोल' असी जी लोकांत ह्मण पडली आहे ती यथार्थ आहे. हीं व्यवहारिक व पारमार्थिक गुणकर्में कांहीं दुष्कर्में नव्हत, परंतु सत्कर्में होत. हीं भिन्न भिन्न कर्में एकंदर लोकसमूहाच्या ह्मणजे देशाच्या नाशार्थ योजिलीं नाहींत, परंतु हितार्थ आहेत; हीं यज्ञ यागादि कर्में नव्हत, परंतु देशांतील लोकांला ज्या उद्योगेंकरून आपली उपजीविका चालवितां येते व दुसऱ्याच्याहि गरजा पुरविण्यांच्या उपयोगीं पडतां येतें, ज्यावांचून देशाचा व्यवहार चालावयाचा नाहीं, असीं जीं प्रत्यक्ष सुफलदायक कर्में तीं होत. हीं कर्में नानाप्रकारच्या उपयोगी विद्या, युक्ति, कळा, कुशलता, यांहीं-करून चांगल्या रूपास आणिलीं असतां, आणि सत्ताधीश ईश्वरास भिऊन न्यायानें चाललें असतां, देशाची स्थिति उत्कृष्ट होत असते. यासाठीं या कर्मालाही धर्म असी संज्ञा आहे.—

हीं कर्में शिकण्याची देश ही एक उद्योगशाळा होय, आणि प्रत्येक कर्माचे जनसमुदाय हे तींतले वर्ग समजावे. या वर्गांतील शिकणारास, अवश्यकता, बुद्धीचा कल, झटून अभ्यास, व्यासंग, योग्य समागम, गोडी, इच्छा, ईर्षा इत्यादि कारणांपैकीं कोणत्याही कारणानें, आपली व आपल्या देशरूप उद्योगशाळेची प्रतिष्ठा व स्थिति उर्जीत करून घेण्यासाठीं, ज्या कर्मवर्गांत, चढण्याची शक्ति येईल, त्या वर्गांत चढायास, आणि न्यून शक्तिमुळें अयोग्य झाला तर त्याच वर्गांत राहण्यास किंवा खालच्या वर्गांत उत-

रण्यास अर्थातच मार्ग मोकळा असावा, आणि बहुतकरून सर्व देशशाळांतून वर्गांत चढण्याउतरण्याचा नियम असाच शिकणारांच्या विद्यादिगुणांच्या योग्यतेवर आहे, कुळावर नाहीं.

हे गुणकर्मांचे वर्गभेद एका जनपूर्णदेशाचे अवयव मानायास चिंता नाहीं असें स्पष्ट करीत आलों, त्याप्रमाणें या देशांतील सुज्ञ लोक प्राचीनकाळीं मानीत होते असें ह्मणायास आधार पुरुषसूक्तादि प्राचीन ग्रंथांत आहे. तेथें भिन्न कर्मे करणाऱ्या सर्व पुरुषांचे चार प्रकार मानून, त्यांस मुख, हात, मांड्या आणि पाय, असे अनुक्रमानें विराट नामक पुरुषदेवाचे रुपकालंकारानें चार अवयव कल्पिले आहेत, ह्मणजे धर्मशिक्षक जे ब्राह्मण ते या पुरुषाचें मुख, देशाच्या संरक्षणाकरितां युद्ध करणार जे शूरपुरुष क्षात्रिय ते हात, क्रयविक्रय करून निर्वाहाची सामग्री देशास पुरविणारे जे वैश्यपुरुष ते मांड्या, आणि देशोपयोगीं आंगबळानें काबाडकाम करणारे जे शुद्रपुरुष, ते पाय, किंवा पायापासून झाले असें लिहिलें आहे. यावरून त्याच्या पूर्वी या कर्मांच्या जाती होत्या असें दिसतें. त्यानंतर मतांतराच्या ग्रंथांत आपआपल्या आराध्य दैवतांच्या चार अंगांपासून चार वर्ण झाले असें लिहीत आले; तसेंच शिवाच्या बहुत अंगापासून अनेक जाती उत्पन्न झाल्या असें लिहिलें आहे. इतकें अगत्यपूर्वक लिहून ठेवण्याचें रहस्य देशाची अवस्था जातींच्या एकोप्यानें स्वतंत्र व उत्कृष्ठ व्हावी हेंच असावें. परंतु तो एकोपा व स्वातंत्र्य कशानें साध्य होईल याचा विचार तितक्या अगत्यानें उघड लिहिलेला आढळत नाहीं. गवळी, माळी,

सं. ३ ...

शेतकरी, लोहार, सुतार, पाथरवट, वस्त्रकार, कोळी, युद्धशूर, वाणी, उदमी, कारागार, धर्मगुरु, मजूर, इत्यादि बहुत जातींच्या गुणकर्मांनीं विभागलेली, अन्योन्याश्रित प्रजा देशाचा व्यवहार चालण्याकरितां पूर्वीपासून सर्व देशांत आहे, तसी या देशांतही होती. परंतु गुणकर्मविशिष्ट जातींतील योग्य प्रजा वरच्या वर्गांत चढून उत्कर्ष पावायाची, ती जेव्हां कुळकर्मविशिष्ट जातींत गतिस्तंभ होऊन कोंडत गेली, तेव्हां आमच्या देशास सुखवशी लागत चालली. स्वदेशप्रीय कर्मांच्या बंधुजातींत, विश्वास, प्रीति इत्यादि सद्गुणांच्या लक्षणांचे मुख्य व्यवहार जे ऐक्यत्वास व देशोत्कर्षास साधक असावयाचे, तेच जेव्हां बंद पडले, तेव्हां आमच्या देशाचें दैवत बेठीस गेलें; इतकें इतर देशाच्या व आमच्या देशाच्या अवयवांत अंतर आहे. आमच्या देशाची जितक्या कारणानीं अनिष्ट अवस्था झाली आहे, तितकीं सर्व कारणें येथें आमच्यानें सांगत बसवत नाहींत. परंतु त्यापैकीं प्रस्तुत विषयास लागू अशा थोड्याच कारणांचा उल्लेख केला आहे. तर पूर्वपुरुषांच्या गुणकर्मांवरून पडलेल्या जाती, ज्या सांप्रत त्यांच्या वंशावर खिळून बसल्या आहेत, त्या पुरते सत्तेवांचून अपुरत्या सत्तेच्यानें उंच नीच करितां यावयाच्या नाहींत; परंतु आपली अवस्था मात्र एकटच्या मनुष्याच्यानें देखील गुणकर्मांच्या योगानें उंच नीच करितां येईल; हें जाणून याकाळीं आपआपल्या जातींत संतुष्ट राहून हरउपायांनीं आपली किंवा आपल्या जातीची स्थिति साधेल तवढी निर्दोष चांगली करून घेण्याच्या प्रयत्नास लागावें हेंच सर्वांस उचित आहे.

रण्यास अर्थातच मार्ग मोकळा असावा, आणि बहुतकरून सर्व देशशाळांतून वर्गांत चढण्याउतरण्याचा नियम असाच शिकणारांच्या विद्यादिगुणांच्या योग्यतेवर आहे, कुळावर नाहीं.

हे गुणकर्माचे वर्गभेद एका जनपूर्णदेशाचे अवयव मानायास चिंता नाहीं असें स्पष्ट करीत आलों, त्याप्रमाणें या देशांतील सुज्ञ लोक प्राचीनकाळीं मानीत होते असें ह्मणायास आधार पुरुषसूक्तादि प्राचीन ग्रंथांत आहे. तेथें भिन्न कर्मैं करणाऱ्या सर्व पुरुषांचे चार प्रकार मानून, त्यांस मुख, हात, मांड्या आणि पाय, असे अनुक्रमानें विराट नामक पुरुषदेवाचे रुपकालंकारानें चार अवयव कल्पिले आहेत, ह्मणजे धर्मशिक्षक जे ब्राह्मण ते या पुरुषाचें मुख, देशाच्या संरक्षणाकरितां युद्ध करणार जे शूरपुरुष क्षात्रिय ते हात, क्रयविक्रय करून निर्वाहाची सामग्री देशास पुरविणारे जे वैश्यपुरुष ते मांड्या, आणि देशोपयोगीं आंगबळानें काबाडकाम करणारे जे शुद्रपुरुष, ते पाय, किंवा पायापासून झाले असें लिहिलें आहे. यावरून त्याच्या पूर्वी या कर्मांच्या जाती होत्या असें दिसतें. त्यानंतर मतांतराच्या ग्रंथांत आपआपल्या आराध्य दैवतांच्या चार अंगांपासून चार वर्ण झाले असें लिहीत आले; तसेंच शिवाच्या बहुत अंगापासून अनेक जाती उत्पन्न झाल्या असें लिहिलें आहे. इतकें अगत्यपूर्वक लिहून ठेवण्याचें रहस्य देशाची अवस्था जातींच्या एकोप्यानें स्वतंत्र व उत्कृष्ठ व्हावी हेंच असावें. परंतु तो एकोपा व स्वातंत्र्य कशानें साध्य होईल याचा विचार तितक्या अगत्यानें उघड लिहिलेला आढळत नाहीं. गवळी, माळी,

स. ३. ...



शेतकरी, लोहार, सुतार, पाथरवट, वस्त्रकार, कोळी, युद्धशूर, वाणी, उदमी, कारागीर, धर्मगुरु, मजूर, इत्यादि बहुत जातीच्या गुणकर्मांनीं विभागलेली, अन्योन्याश्रित प्रजा देशाचा व्यवहार चालण्याकरितां पूर्वीपासून सर्व देशांत आहे, तसी या देशांतही होती. परंतु गुणकर्मविशिष्ट जातींतील योग्य प्रजा वरच्या वर्गांत चढून उत्कर्ष पावायाची, ती जेव्हां कुळकर्मविशिष्ट जातींत गतिस्तंभ होऊन कोंडत गेली, तेव्हां आमच्या देशास सुखवशी लागत चालली. स्वदेशप्रीय कर्मांच्या बंधुजातींत, विश्वास, प्रीति इत्यादि सद्गुणांच्या लक्षणांचे मुख्य व्यवहार जे ऐक्यत्वास व देशोत्कर्षास साधक असावयाचे, तेच जेव्हां बंद पडले, तेव्हां आमच्या देशाचें दैवत वेठीस गेलें; इतकें इतर देशाच्या व आमच्या देशाच्या अवयवांत अंतर आहे. आमच्या देशाची जितक्या कारणानीं अनिष्ट अवस्था झाली आहे, तितकीं सर्व कारणें येथें आमच्यानें सांगत बसवत नाहींत. परंतु त्यापैकीं प्रस्तुत विषयास लागू अशा थोड्याच कारणांचा उल्लेख केला आहे. तर पूर्वपुरुषांच्या गुणकर्मांवरून पडलेल्या जाती, ज्या सांप्रत त्यांच्या वंशावर खिळून बसल्या आहेत, त्या पुरते सत्तेवांचून अपुरत्या सत्तेच्यानें उंच नीच करितां यावयाच्या नाहींत; परंतु आपली अवस्था मात्र एकटच्या मनुष्याच्यानें देखील गुणकर्मांच्या योगानें उंच नीच करितां येईल; हें जाणून याकाळीं आपआपल्या जातींत संतुष्ट राहून हरउपायांनीं आपली किंवा आपल्या जातीची स्थिति साधेल तवढी निर्दोष चांगली करून घेण्याच्या प्रयत्नास लागावें हेंच सर्वांस उचित आहे.

एका पुरुषाच्या अवयवापासून चार वर्ण उत्पन्न झाले, असें जें पुरुषसूक्तादि अनेक ग्रंथांत लिहिलें आहे, त्याचें तात्पर्य व सद्हेतु यांविषयीं विचार येथें विस्तारानें लिहिला असतां प्रसक्तानुप्रसक्ती होईल, या भीतीनें थोडक्यांत सुचविण्यांत येतें कीं, चार वर्णांनीं आपला एक जगज्जनक (परमेश्वर), स्वदेशमाता, बंधुधर्म, आणि आपलीं कर्तव्यकर्में यांस स्मरून, मनांत परस्परांविषयीं कांहींएक उंच नीच भाव न आणितां, समदृष्टीनें देशाचें जें हीत, तें प्रत्येक व्यक्तीचें हीत, असें पक्कें लक्ष्यांत वागवून स्वदेशाहितार्थ व उत्कर्षार्थ, प्रीतीनें, विश्वासानें आणि एकोप्यानें आपण वांटून घेतलेलीं देशहिताचीं कामें उत्साह बुद्धिनें करीत असावीं. अशक्त वर्णबंधूस बुद्धिमान, धनवान आणि धैर्यवान, शूर, सशक्त वर्णबंधूंनीं आपलें सहाय्य देत जावें, असें सद् हेतुला मुळचे चार वर्णांच्या उत्पत्तीचें तात्पर्य होतें, तें आतां इतर देशांत स्वदेशाभिमान या परमधर्मरूपानें प्रकाशत आहे, आणि या देशांत त्याला धर्मभ्रष्टत्वाचें रूप प्राप्त होऊन जातीचे प्रकार माजले आहेत. याचें दुसरें फळ पहायास नको. हे प्रकारच स्थिती आणि जाती हे दोन शब्द भिन्न अर्थाचे वाचक आहेत, हें सांगावें नलगे. स्थिती उंच करायास प्रयत्नांचा उपाय आहे, परंतु जाती उंच करण्याचा ईश्वरी अंशावाचून किंवा लोकांत जातीच्या समुदायाचा एकोपा झाल्यावांचून यत्न राहिला नाहीं, इतकें हें काम कठीण आहे. फार काय सांगावें, याशिवाय सध्यां ह्या वर्णजातीप्रकारांस दुसरा हेतुच राहिला नाहीं. वैराचे दुष्परिणामरूप फळ झाले आहेत.

## लेखी ग्रंथाचे पूर्वी तोंडच्या कथा.

जसें ग्रामांतरीं गेलेल्या मनुष्यास तोंडच्या निरोपानें कित्येक-जण वर्तमान कळवितात, तसी भाषेची लिपि प्रचारांत येण्यापूर्वीं अथवा लिपि थोडी प्रचारांत असतां ह्मणजे तिचा अभ्यास फारसा नसतां, किंवा लिहिणारा भेटला नाहीं, अगर लिहिणारा भेटला परंतु वाटेवर लिहिण्याची सामग्री नाहीं, वा साहित्य आहे तर लिहिवव-णारास अवश्यकता वाटली नाहीं, अशा कारणामुळें अनक्षर लोकां-मध्यें जुन्यानव्या कथा, काहाण्या, उपदेश व वार्ता दुसऱ्यापासून लक्षपूर्वक ऐकून घेऊन, त्यांत बुद्ध्यां प्रमाद न करितां आपल्या स्मरणशक्तिप्रमाणें ऐकल्या तशा तिसऱ्यास सांगाव्या, अशा परंपरेनें तोंडच्या कथांची प्रसिद्धि करण्याचा पूर्वीं परिपाठ होता, व आतांही आहे: या परंपरेनें चालत आलेल्या जुन्या तोंडच्या कथेस दंतकथा ह्मणतात. एकाच विषयावरील अनेक दंत-कथांत फरक पडण्याचा सहज संभव आहे. तसे कथांचे पाठभेद एका लेखी ग्रंथाच्या अनेक प्रतींतही अढळतात. जे ग्रंथ स्वतः लिहिणाऱ्या कल्पक कवींनीं कोणी सांगितल्यावांचून आपल्याच कल्पनेनें लिहिले असतील, त्यांस मात्र तोंडानें सांगणा-राची गरज पडली नसेल.*

आपले महाभारतासारिखे पौराणीक ग्रंथही व्यासादिका-

* श्रुति अथवा वेदाचे ग्रंथ प्रथम भगवंताच्या मुखापासुन वाणीश्रुत झाल्यानंतर लिहिण्यांत आले, व स्मृतीचे ग्रंथही अगोदर विधात्याच्या मुखापासून माहामुनींनीं किंवा मन्वादिकांनीं ऐकलेली वाणी स्मृतांत धरून मग कांहीं काळानें लिहिले असें ह्मणतात.

एका पुरुषाच्या अवयवापासून चार वर्ण उत्पन्न झाले, असें जें पुरुषसूक्तादि अनेक ग्रंथांत लिहिलें आहे, त्याचें तात्पर्य व सद्हेतु यांविषयीं विचार येथें विस्तारानें लिहिला असतां प्रसक्तानुप्रसक्ती होईल, या भीतीनें थोडक्यांत सुचविण्यांत येतें कीं, चार वर्णांनीं आपला एक जगज्जनक (परमेश्वर), स्वदेशमाता, बंधुवर्ग, आणि आपलीं कर्तव्यकर्मं यांस स्मरून, मनांत परस्परांविषयीं कांहीं एक उंच नीच भाव न आणितां, समदृष्टीनें देशाचें जें हीत, तें प्रत्येक व्यक्तीचें हीत, असें पक्कें लक्ष्यांत वागवून स्वदेशहितार्थ व उत्कर्षार्थ, प्रीतीनें, विश्वासानें आणि एकोप्यानें आपण वांटून घेतलेलीं देशहिताचीं कामें उत्साह बुद्धिनें करीत असावीं. अशक्त वर्णबंधूस बुद्धिमान, धनवान आणि धैर्यवान, शूर, सशक्त वर्णबंधूंनीं आपलें सहाय्य देत जावें, असें सद् हेतुला मुळचे चार वर्णांच्या उत्पत्तीचें तात्पर्य होतें, तें आतां इतर देशांत स्वदेशाभिमान या परमधर्मरूपानें प्रकाशत आहे, आणि या देशांत त्याला धर्मभ्रष्टत्वाचें रूप प्राप्त होऊन जातीचे प्रकार माजले आहेत. याचें दुसरें फळ पहायास नको. हे प्रकारच स्थिती आणि जाती हे दोन शब्द भिन्न अर्थाचे वाचक आहेत, हें सांगावें नलगे. स्थिती उंच करायास प्रयत्नाचा उपाय आहे, परंतु जाती उंच करण्याचा ईश्वरी अंशावाचून किंवा लोकांत जातीच्या समुदायाचा एकोपा झाल्यावांचून यत्न राहिला नाहीं, इतकें हें काम कठीण आहे. फार काय सांगावें, याशिवाय सध्यां ह्या वर्णजातीप्रकारांस दुसरा हेतुच राहिला नाहीं. वैराचे दुष्परिणामरूप फळ झाले आहेत.

## लेखी ग्रंथाचे पूर्वी तोंडच्या कथा.

जसें ग्रामांतरीं गेलेल्या मनुष्यास तोंडच्या निरोपानें कित्येक-जण वर्तमान कळवितात, तसी भाषेची लिपि प्रचारांत येण्यापूर्वी अथवा लिपि थोडी प्रचारांत असतां ह्मणजे तिचा अभ्यास फारसा नसतां, किंवा लिहिणारा भेटला नाहीं, अगर लिहिणारा भेटला परंतु वाटेवर लिहिण्याची सामग्री नाहीं, वा साहित्य आहे तर लिहिवव-णारास अवश्यकता वाटली नाहीं, अशा कारणामुळें अनक्षर लोकां-मध्यें जुन्यानव्या कथा, काहाण्या, उपदेश व वार्ता दुसऱ्यापासून लक्षपूर्वक ऐकून घेऊन, त्यांत बुद्धचां प्रमाद न करितां आपल्या स्मरणशक्तिप्रमाणें ऐकल्या तशा तिसऱ्यास सांगाव्या, अशा परंपरेनें तोंडच्या कथांची प्रसिद्धि करण्याचा पूर्वी पारिपाठ होता, व आतांही आहे: या परंपरेनें चालत आलेल्या जुन्या तोंडच्या कथेस दंतकथा ह्मणतात. एकाच विषयावरील अनेक दंत-कथांत फरक पडण्याचा सहज संभव आहे. तसे कथांचे पाठभेद एका लेखी ग्रंथाच्या अनेक प्रतींतही अढळतात. जे ग्रंथ स्वतः लिहिणाऱ्या कल्पक कवीनीं कोणी सांगितल्यावांचून आपल्याच कल्पनेनें लिहिले असतील, त्यांस मात्र तोंडानें सांगणा-राची गरज पडली नसेल.*

आपले महाभारतासारिखे पौराणीक ग्रंथही व्यासादिका-

---

* श्रुति अथवा वेदाचे ग्रंथ प्रथम भगवंताच्या मुखापासून वाणीश्रुत झाल्यानंतर लिहिण्यांत आले, व स्मृतीचे ग्रंथही अगोदर विधात्याच्या मुखापासून माहामुनीनीं किंवा मन्वादिकांनीं ऐकलेली वाणी स्मृतींत धरून मग कांहीं काळानें लिहिले असें ह्मणतात.

सारिख्या विशाल स्मृतिसंपन्न कवींनीं, आपल्या गणेशादि लेखकांस मुखानेंच सांगितले असें लिहिलें आहे. यावरून या देशचे पूर्ववृत्तांत प्रथम मुखानें वाच्य झाल्यावर मग लेखी ग्रंथाच्या रूपास आले असावें असा आमचा समज आहे. हा समज कदाचित् खोटा जरी असला, तरी अशा वादांतील कोणत्याही पक्षाच्या जयाजयांत आमच्या लाभहानीचा संबंध नाहीं; ह्मणून आह्मांस वाटतें तें कळविण्यास चिंता नाहीं कीं, भंडारी लोकांच्या उत्पत्तिविषयीं जुन्या ग्रंथांत ज्या कथा लिहिल्या आहेत, त्या प्राचीन दंतकथेच्या आधारानें प्रथम लिहिल्या असाव्या. कां कीं, ग्रंथाचे कथेंत व दंतकथेंत मोठासा फरक दृष्टीस पडत नाहीं, आणि जें अंतर ह्मणून भासतें तें कथेचा संक्षेप व विस्तार इतक्याच अंशीं भासत असेल; कथेंत कांहीं वास्तविक विरोध नाहीं.

---

## भंडारी लोकांच्या उत्पत्तिविषयीं दंतकथा.

भंडारी लोकांच्या उत्पत्तिविषयीं या लोकांत वृद्धपरंपरेनें चालत आलेली जी दंतकथा आमच्या ऐकण्यांत आहे ती लिहितों:—

सत्ययुगीं भरतखंडामध्यें हिमाद्रिपासून तों सह्याद्रिच्या दक्षिण अग्रापर्यंत श्री विश्वेश्वर महेंद्र आपला परिवार जो शिवगण, देवगण, भुतगण, गणाध्यक्ष, यक्षाध्यक्ष, देवसेना व सेनापति इत्यादि यांस बरोबर घेऊन विहार करीत असतां, त्यांणीं भूमंडळावर लोकोपकारार्थ ठिकठिकाणीं असीं रमणीय स्थानें निर्माण केलीं, तसें मलयगिरीच्या प्रदेशांतही स्वभक्तांच्या सुखासाठीं एक विस्तीर्ण उपवन उत्पन्न केलें. त्यांत अष्टयोगीं नाना जा-

तीचे वृक्ष, लता, ( वेली ) औषधी, कंद, मुळें, तृण इत्यादि वनस्पति ऋतुऋतूंच्याठायीं ; सुरंग, सुरस, व सुगंधयुक्त ; पर्णें, फळें, पुष्पें, साली, डीक व काष्ठें यांचें दान करणारीं अशीं उद्भुत केलीं ; त्यांच्या वर्णनाचे मोठाले ग्रंथ होतील. अशा आरामांत सागराच्या समीप उष्णप्रदेशीं वनस्पतींच्या एका वर्गांत, या लोकीं कल्पतरुतुल्य महोपकारक नारीकेर नामें एक वृक्षजातिविशेष, श्री महेश्वर आपल्या शक्तीनें रुजावित झाले. या कथेचें रूप कांहीं अलंकार रीतीनें वर्णन केलें आहे, तें असें :—

दनुमनु वंशांतील शिवधर्मी, महोदार, परोपकारी, साधु, योगी, इत्यादि जे आपले प्रीयभक्त, सारुप्य मुक्तिप्रत पावले (ह्मणजे शिवासारिखे त्रिनेत्र झाले), ते भक्त शिवास उत्तम आचरणेंकरून आपल्या गळ्यांतील ताईतासारिखे प्रीय झाले. हा भाव दाखविण्याकरितां श्री शंकरानें त्यांच्या सूक्ष्म दैहिक रुंडांच्या माळा करून आपल्या कंठाच्या ठायीं धारण केल्या, व ते सरुपता मुक्ति पावून कैलासवासी झाल्यावरही त्यांच्यामागें भूलोकीं तत्सदृशगुणलक्षणें दाखविणारे कीर्तिध्वज, वृक्षरुपानें वंशपरंपरा दीर्घायु राहावे ह्मणून, भक्तवत्सल सांबानें त्या सत्वगुणी बीजरूपी रुंडांचा पेरा केला, आणि त्यास पाणी लावायाची आज्ञा जलदेवतास केली; ईश्वराच्या संकल्पानुसार त्या मूळबीजापासून पूर्वोक्त वृक्ष उत्पन्न झाला.

या वृक्षास पाडाशिलापासून तों सोलींव फळापर्यंत ११ त्रिकें आहेत. त्यांणी ‘ ॐ ’ संज्ञक उत्पत्ति कर्त्ता, पालन कर्त्ता व लय कर्त्ता, या तीन ईश्वरी विभूतींचें मायाशक्ति सहवर्तमान एका अद्वितीय परमेश्वराचें ऐकत्व लक्षण सभून

लागला तेसमयीं शिवानें आपल्या शक्तीचा प्रयोग करून त्या पाप्याचा वध केला, आणि त्याचें प्रेत एका प्रचंड घाण्यांत घालून तो घाणा नंदिकेश्वराकडून फिरवून असुरी देहाचा चुराडा करून टाकिला. त्याचकाळीं विश्वकुटुंबी विश्वेश्वराच्या अंगापासून निरनिराळ्या कर्मांच्या उपयोगीं गुणासहीत कर्मानुरूप मनुष्यांच्या अनेक जाती उत्पन्न झाल्या. त्यांत सांबाच्या मस्तकापासून जो घामाचा थेंब पडला त्यापासून एक पुरुष उत्पन्न झाला; त्यास सांबानें आयुध ( आऊत ) व कमंडलु* ( तुंबडें ) घेऊन, व आणखीं कांहीं युक्ति सुचवून सांगितलें कीं, या बागांतील नारळीचें फळ, व तिच्या पोईचें अग्र (मुकुटी) कापून टाकून तींतून नूतन निर्मळ रस निघेल, तो कमंडलू पात्रांत घेऊन आह्मांस प्यावयास आण; अशी आज्ञा करतांच त्या पुरुषानें शंभूस वंदन करून सुचविलेल्या युक्तिप्रमाणें, नारळ व रस आणून ईश्वरास अर्पण केला. तो उमामहेश्वरांनीं खाऊन पिऊन संतोष दाखविला; आणि या पुरुषानें भाव हा उत्तम गुण धरून, आमचे आज्ञेप्रमाणें यथायोग्य वर्तन केलें, म्हणून ईश्वरानें त्याचें नांव "भावगुण" असें ठेविलें. मग श्री शिवानें मानसूचक आसनावर भावगुणास बसायास सांगून पार्वतीस आज्ञा केली कीं, आसनावर बसलेल्यास सुवर्णदान कर,

---

* ही तुंबडी कुंभासुर दैत्याच्या दांतापासून एक वेल रुजला त्याचें फळ ह्मणून पांढऱ्या भोपळ्याच्या ब्या दांतासारिख्या दिसतात, ही त्याची साक्ष असे पूर्वींचे वडील मानीत असत. त्यावरून दसऱ्याचे दिवशीं बकऱ्याकोंबड्याच्या बद्दल देवीस या असुरी फळाचें बळीदान करण्याची चाल आद्यापि गरीब भंडारी लोकांत चालत आहे.

त्याप्रमाणें ती सुवर्ण आणायास गेली तों एक ब्राम्हण आला, त्यास भावगुणानें आसन सोडून आभ्यूत्थान दिलें, भावगुण उठतांच ब्राह्मण त्या आसनावर बसला; त्यास पार्वतीनें सुवर्ण दिलें. ब्राह्मण गेल्यावर भावगुण उभाच होता, त्यास तसा पाहून भवानी चंडकोपानें तापून बोलली कीं, "शंकराज्ञा लक्षांत न ठेविल्यामुळें तूं मानास आणि धनास मुकलास." या वाक्यांत 'शंकराज्ञा' या शब्दाचा पहिला अर्थ कल्याणरूप आज्ञा, दुसरा अर्थ महादेवाची आज्ञा, आणि तिसरा अर्थ हितकर्त्याची किंवा कल्याण कर्त्याची आज्ञा. तात्पर्य हितकर्त्याची आज्ञा लक्षांत न वागवितील तर ते तुझे वंशजही मानरहित नीच, व धनरहित दरिद्री होतील, असें शापोत्तर बोलून गेली. त्यावेळच्या तिच्या स्थितीच्या रूपास चंडिका अशी संज्ञा आहे. नंतर भावगुणाची दीन व कुमार अवस्था पाहून, कुमारस्वामिनी महादेवाची आज्ञा घेऊन त्यास आपले सेनेंत ठेविलें. तेव्हां त्याचें नांव कुमारक्षात्रि असें पडलें. या नावाची जात हल्लीं मलबार प्रांतांत आहे ह्मणून ह्मणतात. पुढें शंकर पार्वतीच्या संमत्तानें क्षात्रियाच्या कन्येशीं त्याचें लग्न झालें. त्या वेळेस शिवशक्तिनीं वधुवरांला हितकर बोध केला कीं, तुह्मी मातापितरादि गुरुजनांची व धर्माची मानमर्यादा बाळगून परस्परांशीं प्रीतीनें व विश्वासानें वर्तावें. वधूनें परपुरुषाचा व वरानें परस्त्रीचा अभिलाष कधींही धरूं नये. आपल्या प्रजेस बालत्वापासून संसारिक हिताचे व धर्माचे निर्दोष उद्योग शिकवायास चुकूं नका. असन्मार्ग सोडून सन्मार्गांत चालला तर सद्गती पावून आह्मास प्राप्त व्हाल, नाहीं तर दुर्ग-

लागला तेसमयीं शिवानें आपल्या शक्तीचा प्रयोग करून त्या पाप्याचा वध केला, आणि त्याचें प्रेत एका प्रचंड घाण्यांत घालून तो घाणा नंदिकेश्वराकडून फिरवून असुरी देहाचा चुराडा करून टाकिला. त्याचकाळीं विश्वकुटुंबी विश्वेश्वराच्या अंगापासून निरनिराळ्या कर्मांच्या उपयोगीं गुणासहीत कर्मानुरूप मनुष्यांच्या अनेक जाती उत्पन्न झाल्या. त्यांत सांबाच्या मस्तकापासून जो घामाचा थेंब पडला त्यापासून एक पुरुष उत्पन्न झाला; त्यास सांबानें आयुध ( आऊत ) व कमंडलु* ( तुंबडें ) घेऊन, व आणखीं कांहीं युक्ति सुचवून सांगितलें कीं, या बागांतील नारळीचें फळ, व तिच्या पोईचें अग्र (मुकुटी) कापून टाकून तींतून नूतन निर्मळ रस निघेल, तो कमंडलू पात्रांत घेऊन आह्मांस प्यावयास आण; अशी आज्ञा करतांच त्या पुरुषानें शंभूस वंदन करून सुचविलेल्या युक्तिप्रमाणें, नारळ व रस आणून ईश्वरास अर्पण केला. तो उमामहेश्वरांनीं खाऊन पिऊन संतोष दाखविला; आणि या पुरुषानें भाव हा उत्तम गुण धरून, आमचे आज्ञेप्रमाणें यथायोग्य वर्तन केलें, म्हणून ईश्वरानें त्याचें नांव "भावगुण" असें ठेविलें. मग श्री शिवानें मानसूचक आसनावर भावगुणास बसायास सांगून पार्वतीस आज्ञा केली कीं, आसनावर बसलेल्यास सुवर्णदान कर,

---

* ही तुंबडी कुंभासुर दैत्याच्या दांतापासून एक वेल रुजला त्याचें फळ म्हणून पांढऱ्या भोपळ्याच्या ज्या दांतासारिख्या दिसतात, ही त्याची साक्ष असे पूर्वीचे वडील मानीत असत. त्यावरून दसऱ्याचे दिवशीं बकऱ्याकोंबड्याच्या बद्दल देवीस या असुरी फळाचें बळीदान करण्याची चाल आद्यापि गरीब भंडारी लोकांत चालत आहे.

त्याप्रमाणें ती सुवर्ण आणायास गेली तों एक ब्राम्हण आला, त्यास भावगुणानें आसन सोडून आभ्यूत्थान दिलें, भावगुण उठतांच ब्राह्मण त्या आसनावर बसला; त्यास पार्वतीनें सुवर्ण दिलें. ब्राह्मण गेल्यावर भावगुण उभाच होता, त्यास तसा पाहून भवानी चंडकोपानें तापून बोलली कीं, "शंकराज्ञा लक्षांत न ठेविल्यामुळें तूं मानास आणि धनास मुकलास." या वाक्यींत 'शंकराज्ञा' या शब्दाचा पहिला अर्थ कल्याणरूप आज्ञा, दुसरा अर्थ महादेवाची आज्ञा, आणि तिसरा अर्थ हितकर्त्याची किंवा कल्याण कर्त्याची आज्ञा. तात्पर्य हितकर्त्याची आज्ञा लक्षांत न वागवितील तर ते तुझे वंशजही मानरहित नीच, व धनरहित दरिद्री होतील, असें शापोत्तर बोलून गेली. त्यावेळच्या तिच्या स्थितीच्या रूपास चांडिका अशी संज्ञा आहे. नंतर भावगुणाची दीन व कुमार अवस्था पाहून, कुमारस्वामिनी महादेवाची आज्ञा घेऊन त्यास आपले सेनेंत ठेविलें. तेव्हां त्याचें नांव कुमारक्षात्रि असें पडलें. या नावाची जात हल्लीं मलबार प्रांतांत आहे ह्मणून ह्मणतात. पुढें शंकर पार्वतीच्या संमत्तानें क्षात्रियाच्या कन्येशीं त्याचें लग्न झालें. त्या वेळेस शिवशक्तिनीं वधुवरांला हितकर बोध केला कीं, तुह्मी मातापितरादि गुरुजनांची व धर्माची मानमर्यादा बाळगून परस्परांशीं प्रीतीनें व विश्वासानें वर्तावें. वधूनें परपुरुषाचा व वरानें परस्त्रीचा अभिलाष कधींही धरूं नये. आपल्या प्रजेस बालत्वापासून संसारिक हिताचे व धर्माचे निर्दोष उद्योग शिकवायास चुकूं नका. असन्मार्ग सोडून सन्मार्गांत चाललां तर सद्गती पावून आह्मास प्राप्त व्हाल, नाहीं तर दुर्ग-

तीस जाल असें कांहीं करूं नका. आमचे ठायीं तुमचा सप्रेम भाव स्थीर करून त्या भावाचा भाऊ जो विश्वास किंवा प्रामाणिकपणा, तो तुमच्या निर्वाहाच्या धंद्यांत स्वपराशीं अढळ असूंद्या. आपल्या कामांत प्रामाणिकपणा ह्मणजे आपल्याकरितां जें निर्दोष काम करायाचें तें वेळच्या वेळेवर हयगय अथवा आळस सोडून करीत जावें. तसेंच दुसऱ्याचेंही पत्करलेलें काम खरेपणानें करावें. तेणेंकरून तुमच्या धंद्यारोजगारास बरकत येऊन तुमचा उत्कर्ष होईल. इत्यादि उपदेश केल्यावर मग विश्वनाथानें कुबेरास सांगून त्याच्या भांडाररक्षकांत भावगुणास ठेविला. तेव्हांपासून त्याला भांडारी व त्यांनतर या शब्दाचा अपभ्रंश होऊन 'भंडारी' ह्मणूं लागले. याच्या संततींतून कित्येक नारळीचा रस काढण्याचें काम करीत होते, त्यांस वरुणानें त्या रसाची सुरा दुष्ट राक्षसांच्या नाशार्थ काढायास शिकाविलें, त्यावरून त्या मद्यास वारुणी असें नांव पडलें. याशिवाय अन्यत्रही लोक ताड, माड, भेरली, सिंदी इत्यादि वृक्षांच्या रसापासून व अनेक प्रकारच्या पदार्थांपासून मद्य उत्पन्न करूं लागले. आणि हें मद्य शक्तिदेवीस प्रिय आहे असें दुर्जनांनीं पाखांड उपस्थित केलें. तेव्हां विश्वजननी आपल्या किर्तीस कलंक लाविला ह्मणून पुनः क्षोभली, तिचें सदाशिवानें शांतवन करून पुनरपि भंडारी प्रजेस आज्ञा केली कीं, तुह्मी नारळीवांचून दुसऱ्या वृक्षापासून रस अथवा त्या रसापासून मद्य काढूं नये. आणि नारळीचा आसव किंवा त्याची दारु अथवा दुसरी कोणत्याही प्रकारची व कोणत्याही देशांतली सुरा तुह्मी कधीं पिऊं नका; कारण कीं, ही हाला; हालाहल विषाची

बहीण आहे. ही आपल्या पानप्रियास हालहाल करून मारीत असते. जिची योजना जुलमी वैऱ्यांच्या व दुष्ट राक्षसांच्या नाशार्थ करायाची, तिचा प्रयोग आपल्या प्रियतम प्राणधनावर करून तुह्मी आपणांस आपले शत्रु व निर्दय राक्षस ठरवून घेऊं नका. तसेंच जेणेंकरून मनुष्यांची संसारांत दुर्दशा होते, असा कोणताही दुर्गुण अथवा दुर्व्यसन आपणांस जडवून घेऊं नका, ही माझी इच्छाई ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें वागलेत तर तुमचें बरें होईल; नाहीं तर ती मोडल्याचें समुचित् फळ पावल्यावांचून कोणी कधींही राहणार नाहीं. तुह्मी आजपर्यंत हें पातक केलें नाहीं, परंतु पुढें दुःसंगतीनें कराल ह्मणून आज सावध करून ठेविलें आहे. या आज्ञेचें स्मरण असूं द्या. माझा संपूर्ण हितोपदेश तुह्मीं आपल्या हृदयांत जागृत ठेवाल तर मी सदाशिव सर्वदां तुमच्या त्हृदयांत जागा आहें. माझा बोध विसरलेत ह्मणजे मला विसरलेत असें समजा. जर जागें आईच्या स्तनाजवळचें बालक आईला विसरलें, तर त्यास आईजवळ आहे असें कशानें वाटेल ! ह्मणून विसरणें, निजणें, आणि मोहांत पडणें, हें सारखेंच आहे. तसें स्मरण धरणें, जागें होणें, आणि विवेक करणें, हेंही समान आहे, यास्तव तुह्मीं सारासार विचार करून चालावें हेंच योग्य आहे. हें ऐकून सर्व प्रजेनें महादेवाची स्तुति करून लोटांगणें घातलीं, आणि "पार्वतीपते हरहर महादेव" असा उच्चस्वरानें सर्वांनीं एकदांच जयघोष केला. विश्वनाथ अंतर्धान पावले, आणि प्रजा स्वस्थानीं गेली; काळांतरानें भंडारी प्रजा वाढत जाऊन सह्याचळाच्या पश्चिमेस कोंकणपट्टींत उत्तरेकडेस वसत गेली.

## नारळीच्या झाडाचें आहे तसें साधें वर्णन.

नारळीचें साधारण वर्णन कांहीं अंशीं तरी येथें आह्मास करितां येतें कीं नाहीं याविषयीं प्रयत्न करून पाहतों:—या झाडास समुद्र फार दूर नाहीं अशा कांहीं उष्ण देशांतील नेमस्त खारट व बारीक वाळूची चांगली जमीन लागवडीस लागते.— सोडणासकट माडावर पिकून सुकलेल्या नारळास सुकड ह्मणतात. कोणी सुकड रुजत घालायाची असल्यास माडावरून तजविजीनें खालीं उतरतात, कोणी पडलेली असली तरी लावायास घेतात. कारण सोडणामुळें उंचावरून पडलेली सुकड पेरण्यास निरुपयोगी होत नाहीं, तींत पाणी मात्र असलें पाहिजे. लावितांना सुकड किंचित् आडवी करून थोड्या छायेच्या जमिनींत पुरितात, आणि नेहमी ओल राही इतकें हातानें पाणी घालितात. कांहीं दिवसांनीं त्या सुकडींतील नारळांतल्या खोबऱ्याच्या शिरोभागीं लहान चवळीच्या दाण्यायेवढा एक पांढरा मोड असतो, तें त्याचें बीज स्थूळ होत गेलें ह्मणजे त्याचे खालचे बाजूस बारीक रेषाकार तंतु फुटतात. आणि वरले बाजूस नारळाच्या मुखछिद्रावरील पातळ कवची भेदून कोंब उगवूं लागतो. त्या वेळेस नारळामध्यें खोबरें व पाणी यांची मिश्रणाक्रिया चालू होऊन, तिजपासून लोण्यासारखा एक मधूर पदार्थ उत्पन्न होतो. त्यांत कोंबाच्या पाळांच्या तंतुरूप रेषा शिरून त्याला चोखूं लागतात. या चोखिलेल्या अंशाचा खव्यासारिखा गीर होऊन त्याचा चेंडूप्रमाणें गोळाकार एक गट्टा कोंबाच्या मुळाशीं जमत जातो, त्याला खोफुस ह्मण-

तात. या खोकुसावर व त्या सांकुळलेल्या दुधावर कोंबाचें पोषण होतें.—नारळांतील सत्वांश सर्व संपल्यावर कोंबाच्या मुळाचें बुंध होतें, आणि त्याचीं पाळें वाढून जमिनींतील कस घेण्याकरितां नारळांतून बाहेर पडून भूमींत शिरतात, व कांहीं पाळें त्या जीर्ण मुकडीस आपल्या मुळाशीं धरून ठेवितात. बुंधाच्या ज्या भागामध्यें नारळीच्या अंगाची व अवयवांची सर्व सामग्री कोमलरूपानें असते, आणि काळक्रमानें पुढें प्रकट होत जाते त्या भागास हांडी ह्मणतात, व तींतल्या सामग्रीस कोवळाई ह्मणतात. हा पदार्थ शुभ्रवर्ण कुरकुरीत असून पुढें रुचिकर होत जातो. याला कोणी खवळाही ह्मणतात. कांहीं दिवसांनीं कोंबाच्या खवळ्यांतून हिरक्यासहीत एकमेकीस जडलेल्या पात्यांचा सुळक्यासारिखा एक अणिदार सुईरा बाहेर पडतो. तो प्रथम कळीसारिखा असतो, परंतु मग हळु हळु उघडत गेला ह्मणजे पानासारिखा दिसतो. बहुधा अशीं पानें प्रतिमासीं उगवून, त्यांच्या रांगा कोंबाच्या बुंधाभोंवत्या मळसूत्राच्या वांकणासारिखा घेरा घालीत जातात. या बाल्यावस्थेपासून तों पुढें बाहारांत येईतोंपर्यंत याला “ रोपा ” हेंच नांव असतें.

रोप्याच्या संयुक्त पात्या वियुक्त होण्याच्या पूर्वीं किंवा मागून, त्याला पूर्व स्थळाहून काढून दुसरीकडे जेथें सूर्यकिरणें फार वेळ राहतील अशा मोकळ्या जागेंत मुकडीसुद्धां, किंवा मुकडीवांचून हीं जुनीं पाळें तोडून पुरितात. आणि त्याच्या बुंधाभोंवतें हातभर खोल आळें करून दररोज पाणी घालितात. सुमारें महिन्याभरानें त्याला नवीं पाळें फुटलीं असतां तो जीव धरितो,

त्याचीं समान जाडीचीं पाळें, आंत बहु चिवट इषिकारज्जु, त्यावर गाराचें आवरण आणि त्यावर पातळ त्वचा व बारीक तंतु अशीं असतात, तीं बुंधाच्या सभोंवतीं भूमींत लांबपर्यंत उभीं आडवीं संचार करीत तींतला रस घेत जातात. ज्यांच्या योगानें वृक्ष उभे राहतात, तीं पाळें त्यांचे पाय मानिले तर, ते पायांनीं भूमींतील रस पितात असें होतें; म्हणून सर्व वृक्षजातीस संस्कृतांत " पादप " म्हणजे पायांनीं पिणारे असें नांव दिलें आहे.

वर जीं संयुक्त पात्यांचीं पानें म्हणून सांगितलीं, त्या पानाच्या देंठाचे ठिकाणीं मधोमध मुळापासून तो टोंकापर्यंत एक दांडा असतो, त्या दांड्याच्या उताण्या भागावर वेताच्या पाटाविलासारिखी गुळगुळीत तंतुनिर्मित साल मुळापासून शेंड्यापर्यंत निमूळती होत गेलेली असती, तिला शेड म्हणतात. असो, कांहीं माहेत्यांनीं त्या पानांतील प्रत्येक पातीच्या मध्यभागीं एक हिरका राहून, त्या संयुक्त पात्या एकमेकीचे कांठ सोडून परस्परांपासून सुट्या पडून दांड्याच्या दोन्ही बाजूस खोळगट भाग खालीं व गुळगुळीत भाग वर अशा प्रकारें दोन हारींनीं जडून राहतात. पातीमध्यें उभ्या व आडव्या बारीक तंतुजाळाच्या खालीं वर पातळ हिरवी त्वचा असते. दांड्याच्या मुळाकडील भागास पिवडा म्हणतात. पिवड्यास पात्या असत नाहींत, पण त्याच्या दोन्ही कांठामधून निघालेल्या शलाका व तंतूंचीं जाळीं तुटलेलीं असतात, तो त्या दळाचा देंठ समजावा. पिवडा, दांडा व पात्या, हे अवयव मिळून जें एक दांडवत होतें, त्याला झावळी किंवा साऊळ ह्मणतात. झावळीच्या शेंड्यास शिगा अथवा

काखा ह्मणतात. काखा बारीक दांडीमुळें सदा कुशीस किंवा खालचे बाजूस नमलेला असतो. सगळे झावळीच्या न्युनाधिक तृतियांशाइतका पिवडा लांब असतो. ह्या सावळा दर महि-न्यास एक याप्रमाणें खालीं वर कांहीं अंतर सोडून परस्पर अभिमुखतेनें हांडीच्या कोंवळ्या खवळ्यांतून बाहेर पडून, एकी-च्या वेंगेंत दुसरी, अशा क्रमानें सभोंवती वाढत जातात. त्यांबरोबर आणखी प्रत्येक झावळीचें मूळ व पिवड्याचे दोन्ही कांठ, यांपासून चिवट शलाका व तंतु यांच्या कितानासारिख्या घट्ट जाळ्या उत्पन्न होतात. त्या जाळ्यांनीं एके झावळीच्या उजव्या कांठांत व समोरल्या दुसऱ्या झावळीच्या डाव्या कांठांत प्रवेश केला असतो. अशा रितीनें त्याच्या वेढ्याच्या आंतील प्रत्येक झावळीस व सुईऱ्यास त्याणीं इतकें गच्च वेष्टून धरिलें असतें कीं, दुःसह आघातावांचून त्यांतील एकेही झावळीनें निखळून पडूं नये. हांडीचा कोंवळा भाग काळांतरानें जसजसा जून व पक्क होत जातो, तसतसे त्याचे अवयवही जून आणि पक्क होत जाऊन शेवटीं गळून पडतात; या नियमाप्रमाणें जेव्हां झाऊळ पिकून पडायास होते, तेव्हां त्या जाळ्यांचीं बंधनेंही शिथिल होऊन तुटतात, आणि जीर्ण झावळा पडूं लागतात. अशानें हांडीचा जून व कठीण भाग मोकळा होत जातो, त्याला त्या रोप्याचें कांड ह्मणतात. आणि जाळीला पिसुंद्री ह्मणतात. पिसुं-द्र्यांच्या योगानें सावळांचा समुदाय जो जाड वल्कलांनीं गच्च आवळून बांधिलेल्या गुच्छासारिखा दिसतो, त्याला या झाडाचा शेंडा, खवळा किंवा कळा ह्मणतात. रोप्याच्या जोमाचें

धोरण भूमी, हवा, जोपासना आणि निर्विघ्नपणा यांवर असतें. या झाडास बाल्यावस्थेपासून जे सुईरे व ज्या पिसुंद्र्या फुटतात, त्यावर बाहेरल्या बाजूस भुशासारिखा एक नरम व हलक्या पदार्थाचा जो लेप असतो त्याला 'कीस' अथवा 'कप' ह्मणतात. जोमदार रोप्याच्या कळ्यामध्यें, शिरोभागीं जो सुईरा उगवतो, तो पिकून सुकून त्या कळ्याच्या अधोभागीं यावयास दोन वर्षांहूनही अधिक काळ लागतो. ह्मणजे पूर्वोक्त क्रमानुसार जसजसें कोंवळ्या हांडीचें जून कांड, व नव्या सुईऱ्यांच्या जीर्ण झावळा होत जातात, तसतशा त्या पक्कदशा पावून कळ्याचे अधोभागीं होत जातात. आणि कोवळाई व नव्या सावळा कळ्याचा शिरोभाग पावतात, या शिरोभागींचा सुईरा आपल्या स्थानासुद्धां पिकून खालीं व्हावयास दोन वर्षांवर काळ लागतो असा अर्थ. कळ्याच्या जून झावळा फार पसरलेल्या असतात. व नव्या सावळा बाहुधा उभ्या असतात, यावरून नवा आणि जुना असे कळ्यामध्यें दोन भाग दिसतात. या दोन्ही भागाच्या झावळा मिळून कधीं पंचविसांवरही भरतात.

रोपा आपल्या बहारांत आला असतां, त्याच्या कळ्याच्या ह्मणजे शेंड्याच्या नवीन भागांत, कोणत्या एका झावळीच्या पुळ्यांत ओटीसरसा खंजिराच्या आकाराचा लखोट्यासारिखा सर्व बाजूंनीं बंद असा तंतुवटीत एक चपटा कोश बाहेर निघतो, त्याला फोगटी, पाडशील किंवा नाकें ह्मणतात. असीं पाडशिलें सुमारें महिन्यामहिन्याच्या अवधीनें रोप्याच्या चोहींकडेस उत्पन्न होत जातात. सुक्या पाडाशिलांस सेलें ह्मणतात. असो, त्या

फोगटीच्या आंत, तिच्या मुळास लागून ज्याचें मूळ असा एक रसवाहक तंतुघटीत दांडा असतो; त्या दांड्यास कांहीं अंगुळांच्या अंतरावर जाड सालीचें शृंगाकृति एक कवच फुटलें असतें. तेथून पुढें थोडक्या अंतरावर त्या कवचाच्या आंत त्या दांड्याला शेवटापर्यंत छडीसारिखे पुष्कळ फांटे फुटलेले असतात, ते या वृक्षाच्या फळपुष्पाचे देंठ होत. त्यांतला एकेक देंठ साठ पाकळ्यांच्या दाट कळ्यांनीं भरलेला असतो. कित्येक देंठांस काचोळ्या मुद्धां कोंवळ्या फळांची एकेक गांठ असते, त्या गांठीला पोखटे म्हणतात. व त्या पोखट्याच्या पुढें कळ्यांच्या रांगा लागल्या असतात. या कोमळ कळिकांची रचना जणु काय पांढरा सर्पच त्या कवचामध्यें निजला आहे अशी भासते. कवचांतल्या देंठ फुटलेल्या या दांड्याच्या भागाला सारूख ह्मणतात. व मागल्या दांडीसहीत सारुखाला शिपा म्हणतात, मागें रसवाहिनी रज्जूचा जो दांडा सांगितला तोच हा शिपा समजावा. यांतील रज्जुद्वारा हांडींतल्या गर्भकोशांतून रस वाहून फळामध्यें उतरतो आणि तेणेंकरून फळाचे भाग वृद्धि पावतात. हे भाग ज्यामध्यें असतात, त्या कवचाला पोई म्हणतात. पोईच्या टोंकाला मुकुटी म्हणतात. सारुख पुष्ट होऊन पोईच्या पोटांत मावेनासें झालें म्हणजे ती तडकून प्रसूत होते. आणि आंतून चवरीसारिखें पिंजरलेलें दांडीसुद्धां सारुख जन्म पावतें. या सारुखाच्या किंवा शिप्याच्या सर्व जाड देंठांस बारीक कुंसांसारिखे आणखी पडदेंठ असतात. त्यांच्या अग्रास वरीच्या टरफलासारख्या तीन शलाकांनीं युक्त अशीं अगदीं लहान दळाधार असतात. त्या दळाधारांत

ताठ तीन पाकळ्यांचें फुल पांढऱ्या मोठ्या पाखडाएवढें असतें. पाकळयांच्या आंत अंगासरसे सभोंवते सहा पुंकेसर माथ्यावर परागाच्या कणिका घेऊन उभे असतात, आणि त्यांच्या मध्यभागीं कर्णिका असते; तिच्या मस्तकास मुंगीच्या पायांएवढे तीन फांटे असतात. आणि मूळभागीं किंचित् गोड रस असतो, अशा फुलांच्या रांगांनीं शिप्याचे सर्व देंठ भरलेले असतात, तीं फुलें मग हळू हळू गळून जातात, आणि कित्येक देंठांस कांहीं फळें मात्र अवशेष राहतात. फळाच्या कांचोळ्यास कोकण ह्मणतात, तें खवळासारिख्या तीन तीन दळांच्या दोन थरांनीं म्हणजे साहा शलकांनीं घटीत असतें. हें कोकण शिप्याच्या देंठाला संयुक्त झालें असतें. आणि कोकणाखालीं फळ जडलेलें असतें, फळाची घटना बहुधा नार, नीर आणि तंतु या वस्तुपासून झाली असावी. या फळावर तंतुंच्या तीन संयुक्त चोडांची जाड साल असते तिला भिन्न केली असतां सोडणें होतात. त्यांच्या आंत कोंवळा व किंचित् तुरट असा पांढरा पदार्थ असतो, त्याला नार ह्मणतात. या नारांत प्रथम वाटाण्याएवढी गोलाकार कोंवळी नरोटी होते. ती मग पाण्यासुद्धां मर्यादेपर्यंत वाढत जाते. तिच्या गोलकामध्यें थंड, स्वच्छ आणि मधुर पाणीं तुडुंब भरलें असतें. या अवस्थेंत त्याला मोठा पोखटा म्हणतात. यांतल्या कांहीं पाण्याच्या शिऱ्याची शाई होऊन नरोटीच्या तळापासून जमत जमत वर नरोटीस लपटत जाते, तिला शिरु म्हणतात. या स्तिथींतल्या फळाला हातखरपा नारळ म्हणतात. शीरु बरीच घनदाट झाली म्हणजे तिचें खोबरें होतें. या दशेंतल्या फळास कोंवळा नारळ किंवा शहाळें म्हणतात,

यांतही पाणी सुमिष्ट आणि भरपूर असतें. कारण सारुखाच्या देंठांतून वहात आलेल्या रसानें नार ओला असतो, त्यांतून नारळांत पाण्याचा पुरवठा होतो. 'देवाची करणी आणि नारळांत पाणी' ही म्हण खरी आहे. येथें नारळाचे वाढीची सिमा होते. पुढें खोबरें जून होत चाललें असतां अधिक रसाचें प्रयोजन नसतें. सारुखांतील वाहिनी एक वर्षानें जीर्ण व मंद होत जातात, खोबरें जून होण्याची इयत्ता संपत आली म्हणजे शेष पाणी आटूं लागतें व अधिक गोड होतें, याला जून किंवा सुका नारळ म्हणतात. हे बियाण्यास उपयोगीं होतात. त्यापुढें सगळें पाणी आटून खोबऱ्याचा गोटला नरोटीपासून सुटला म्हणजे तो गुडगुडा नारळ झाला. मग त्यांतल्या सुक्या खोबऱ्याच्या गोलकास गोटा म्हणतात. व सुकलेल्या सोडणासहीत नारळास सुकड म्हणतात. या फळाचे नीर, रूप, रस व नार हे चार भाग आहेत, म्हणून याला नारळ म्हणत असतील; याचे घडास पेंड म्हणतात. तसेंच या झाडास नारळ येतात म्हणून नारळी म्हणतात. व ताडांत जशी पुरुषजाती आहे, तसी माडांत नाहीं म्हणून इला नारीकेर म्हणत असतील. रोप्याचें कांड तीसपस्तीस हात उंच झालें म्हणजे त्यास माड म्हणतात. माडाची उंची सरासरी पन्नास हातपर्यंत होते. तितकीच लांब त्याच्या कांडावरचे तंतु व सालही असते. तिजवर पिवळ्याच्या वेळ्यांच्या खुणा दिसतात. कांडाच्या गर्भांत नरम हिरके दूर दूर असून त्यांच्या फटींत रुक्ष नाराची पोंचट घट्ट भर असते. तिच्या बाहेर सभोंवता अत्यंत दाट हिरक्यांचा चार पांच अंगुळें जाड असा कठीण साड असतो. तृण वर्गांतील बोरु,

देवनळ, केतकी, वेळू, भेरली किंवा सुरमाड, सिंद, खजुरी, पोफळी, ताड, महाताड,* इत्यादि झाडांचे साड असेच बाह्यांगीं असतात. इतर वर्गीय झांडाचे साड मध्यें गर्भांत असतात. असो, जमीन सोडलेल्या माडाच्या बुंधाचा घेर बहुधा साडेतीन चार हातांवर असतो. त्याचा व्यास हात सवाहात. मध्यम कांडाचा घेर सत्तेचाळीस अंगुळें आणि व्यास पंधरा अंगुळें. कळ्याजवळच्या कांडाचा घेर बावीस अंगुळें आणि व्यास सात अंगुळें, याप्रमाणें सरासरी कांडाचें जाडीचें मान आहे; याहून अधिकउणेंही भरेल. आतां माडाच्या वयपरत्वें एक हात कांडावर किती सावळांची संख्या येती, ती अल्प अंतराच्या चुकीनें अथवा अटकळीनें सांगतों. बुंधाच्या एक हात कांडास तीन चार पिवळ्यांचे वेढे असतात. मध्यकांडास सात आठ, आणि कळ्याचे कांडास वीस बावीस वेष्टनाचीं चिन्हें दिसतात. माडाच्या आयुष्याचें मध्यममान शंभर सवाशें वर्षांचें असेल. अशा माडाला झीट म्हणतात. कित्येक गांवांत सवाशें वर्षांहून अधिक वयाचीं झिटें अद्यापि जिवंत आहेत.

---

## नारळीच्या झाडाचे उपयोग.

नारळीचें झाड चिरून त्याचीं गरीब लोकांच्या घरांस बहालें, वडोद व वांसे होतात. पाणी वाहाण्याचे पन्हळ करितात. झावळ्यांचे झांप विणून त्यांचा घरास शाकार व आडोशास कुडण

---

* हे वृक्ष आफ्रिकेंत आहेत, याच्या फळाच्या अर्ध्या करोटीचें गोसावी लोक इकडे भिक्षापात्र करितात.

होतें. पर्जन्यनिवारणार्थ खोळ करितात. हिरक्यांच्या केरसुण्या वगैरे करितात. शिप्याच्या दांड्याचा भितीस चुना लावायाचा कुंचा करितात. पीठ जमा करायाचें चोड सोडणाचें करितात. आणि सोडणें कुजवून त्याचा काथा करितात. तो काथा लोडांत भरायाचे कामीं पडतो. काथ्याचे तंतुपासून गोप, सुंभ, मयाळी, गोफणा, जाळ्या, शिंकीं, दावीं, वराती, जंजल (झावली) पायधुळ पुसण्याचें साधन, थोर लोकांच्या घरांत सत्रंजीच्या ऐवजीं बहुतकाल टिकणारें मजल्याचे जमिनीवर घालायाचें अस्तरण, जाहाजाचे सरंजामास मोठे दोर, व इतर सर्व कार्यांस लागणारे लहान मोठे दोर व तऱ्हेतऱ्हेचीं साधनें होतात.—लहान मुलें याच्या पोईचीं खेळायासाठीं तारवें करितात. गरीब लोक पळी, पानपात्राच्या बद्दल नरोटीचे वणख, डऊल्या, आणि बेले करितात. खोबरें लाहानमोठीं मनुष्यें मेव्याप्रमाणें खातात. किसलेलें खोबरें किंवा त्याचा रस स्वयंपाकांत व पक्वान्नांत घालितात. सुक्या किंवा ओल्या खोबऱ्यांत गुळ मिसळला ह्मणजे मुलांस चांगला खाऊ होतो. सुक्या खोबऱ्याचें तेल काढतात.—नारळांतील पाणी उन्हांत तापलेल्यास व तान्हेल्यास थंडावा देतें. तरुण मनुष्याच्या मुखावरील पिठिका व आंगावरील शिबलें या पाण्यानें दूर होतें. कांहीं लोक पिठांत नारळाचें पाणी घालून त्याच्या दशम्या करितात. याशिवाय नारळीपासून दुसरे बहुत उपयोग आहेत. नारळीच्या ज्या भागाचा कांहींच उपयोग होत नाहीं, त्याचा शेवटीं सरपणास उपयोग होतो. तरुणपणांत, नारळीच्या पोईपासून रस काढायास शिकलेले लोक

देवनळ, केतकी, वेळू, भेरली किंवा सुरमाड, सिंद, खजुरी, पोफळी, ताड, महाताड,* इत्यादि झाडांचे साड असेच बाह्यांगीं असतात. इतर वर्गीय झांडाचे साड मध्यें गर्भांत असतात. असो, जमीन सोडलेल्या माडाच्या बुंधाचा घेर बहुधा साडेतीन चार हातांवर असतो. त्याचा व्यास हात सवाहात. मध्यम कांडाचा घेर सत्तेचाळीस अंगुळें आणि व्यास पंधरा अंगुळें. कळ्याजवळच्या कांडाचा घेर बावीस अंगुळें आणि व्यास सात अंगुळें, याप्रमाणें सरासरी कांडाचें जाडीचें मान आहे; याहून अधिकउणेंही भरेल. आतां माडाच्या वयपरत्वें एक हात कांडावर किती सावळांची संख्या येती, ती अल्प अंतराच्या चुकीनें अथवा अटकळीनें सांगतों. बुंधाच्या एक हात कांडास तीन चार पिवड्यांचे वेढे असतात. मध्यकांडास सात आठ, आणि कळ्याचे कांडास वीस बावीस वेष्टनाचीं चिन्हें दिसतात. माडाच्या आयुष्याचें मध्यममान शंभर सवाशें वर्षांचें असेल. अशा माडाला झीट म्हणतात. कित्येक गांवांत सवाशें वर्षांहून अधिक वयाचीं झिटं अद्यापि जिवंत आहेत.

---

## नारळीच्या झाडाचे उपयोग.

नारळीचें झाड चिरून त्याचीं गरीब लोकांच्या घरांस बहालें, वडोद व वांसे होतात. पाणी वाहाण्याचे पन्हळ करितात. झावळ्यांचे झांप विणून त्यांचा घरास शाखार व आडोशास कुडण

---

* हे वृक्ष आफ्रिकेंत आहेत, याच्या फळाच्या अर्ध्या करोटीचें गोसावी लोक हिकडे भिक्षापात्र करितात.

होतें. पर्जन्यनिवारणार्थ खोळ करितात. हिरक्यांच्या केरसुण्या वगैरे करितात. शिप्याच्या दांड्याचा भितीस चुना लावायाचा कुंचा करितात. पीठ जमा करायाचें चोड सोडणाचें करितात. आणि सोडणें कुजवून त्याचा काथा करितात. तो काथा लोडांत भरायाचे कामीं पडतो. काथ्याचे तंतुपासून गोप, सुंभ, मयाळी, गोफणा, जाळ्या, शिंकीं, दावीं, वराती, जंजल (झावली) पायधुळ पुसण्याचें साधन, थोर लोकांच्या घरांत सतरंजीच्या ऐवजीं बहुतकाल टिकणारें मजल्याचे जमिनीवर घालायाचें अस्तरण, जाहाजाचे सरंजामास मोठे दोर, व इतर सर्व कार्यास लागणारे लहान मोठे दोर व तऱ्हेतऱ्हेचीं साधनें होतात.—लहान मुलें याच्या पोईचीं खेळायासाठीं तारवें करितात. गरीब लोक पळी, पानपात्राच्या बद्दल नरोटीचे वणख, डऊल्या, आणि बेले करितात. खोबरें लाहानमोठीं मनुष्यें मेव्याप्रमाणें खातात. किसलेलें खोबरें किंवा त्याचा रस स्वयंपाकांत व पक्वान्नांत घालितात. सुक्या किंवा ओल्या खोबऱ्यांत गुळ मिसळला ह्मणजे मुलांस चांगला खाऊ होतो. सुक्या खोबऱ्याचें तेल काढतात.—नारळांतील पाणी उन्हांत तापलेल्यास व तान्हेल्यास थंडावा देतें. तरुण मनुष्याच्या मुखावरील पिठिका व आंगावरील शिबलें या पाण्यानें दूर होतें. कांहीं लोक पिठांत नारळाचें पाणी घालून त्याच्या दशम्या करितात. याशिवाय नारळीपासून दुसरे बहुत उपयोग आहेत. नारळीच्या ज्या भागाचा कांहींच उपयोग होत नाहीं, त्याचा शेवटीं सरपणास उपयोग होतो. तरुणपणांत, नारळीच्या पोईपासून रस काढायास शिकलेले लोक

जो रस काढितात, तो परिमीत घेतला असतां, गरीब काबाडी लोकांस तृप्ति, पुष्टाई, व हुशारी देणारा आहे. या रसापासून कफाचा नाश करणारा चांगला गूळ होतो. हा रस आंबला ह्मणजे त्याचा शिर्का होतो. त्याचा औषधांत व इतर कामांत उपयोग पडतो. थोड्या आंबलेल्या रसाची भटी लाऊन त्याची दवादारु काढितात. हा शेवटला पदार्थ औषधावांचून सेवन केला तर फार हानिकारक आहे, म्हणून पृथ्वीवरील ज्या लोकांस धर्मशास्त्र आहे, त्या सर्व लोकांनीं, व जे लोक रुढीनें चालत आले त्या लोकांनींही मद्यपान निषिद्ध ठरविलें आहे, व हिंदुधर्मशास्त्रांत तर सुरापान हें पंचमहापातकांत गणिलें आहे. त्याहून विशेष भयंकर ईश्वरपार्वतीचा शाप, भंडारी लोकांच्या दुर्दशेवरून साक्षात् याकाळीं जो प्रचितीस येत आहे, तो या असल्या दुर्व्यसनामुळेंच समजावा.

सर्वसमर्थ आणि सर्वज्ञ परमेश्वरानें कृपाळु होऊन मनुष्याच्या कल्याणासाठीं जो असला उपकारक व कल्याणप्रद दिव्य वृक्ष दिला, त्याची अवगणना करून मोहवश होऊन आह्मी आपल्या अकल्याणाकडे त्याच्या रसाची योजना करावी, हें मनुष्यधर्मास योग्य आहे काय? याविषयीं आह्मी विचार न केला तर मग देवास आणि दैवास काय बोल?

---

## भंडारी लोकांचा इतिहास.

मराठे लोकांत विद्येचा अभाव होता, व त्या जातीस शूद्रांत लेखीत असत, परंतु शिवाजी महाराजाच्या अद्भूत पराक्रमानें त्य

जातीचें क्षत्रिय जातींत ग्रंथप्रसिद्ध उद्धरण झालें.* तसें जव्हार संस्थानांतील कोळी जातीचें झालें नाहीं. कित्येक जातींत सुशिक्षीत लोक होते त्यांणीं त्यांस जे आधार सांपडले त्या आधारावरून आम्ही अमुक वर्णांतील जातीचे लोक आहों, असें आपसांत ठरविलें.

भंडारी लोक मराठे लोकांहूनही भोळे व अज्ञान होते, त्यांस विद्या नव्हती म्हणून दूरदर्शी ग्रंथकर्त्ते या जातींत कोणी झाले नाहींत. व आपली जात कोणत्या वर्णांमध्यें गण्य आहे याविषयीं देखील या लोकांस जिज्ञासा नाहीं. आमची जात भंडारी एवढा मात्र समज आहे, मग इतर लोक तिला काशिही लेखोत, त्याविषयीं त्यांला कांहीं पर्वा नाहीं. तथापि जुन्या काळांतल्या इतर जातीच्या कांहीं उदार ग्रंथकारांनीं या अज्ञान, गरीब, व एकमार्गी जातीची दाद आपल्या प्राकृत ग्रंथांत घेतली आहे. त्यांचे आम्ही उपकार स्मरून त्या पौराणिक व ऐतिहासिक ग्रंथांतील साराशाचे उतारे, व शाण्णवकुळी नामक प्राकृत गद्यग्रंथ, जो भंडारी व मराठे इत्यादि जातींत प्रसिद्ध आहे त्यांतील कुळ्या आणि भंडारी लोकांच्या चालत आलेल्या रीतिभाती व दंतकथा इत्यादि जें कांहीं आम्हांस पाहून व ऐकून कळलें तें सर्व पुढें सादर लिहितों. त्यावरून ऋजु बुद्धिचे कोणतेही लोक ही जात कोणत्या वर्णांत गणायास योग्य आहे,† याविषयीं निर्णय समजूं शकतील.

पूर्वींचे भंडारी, त्यांचे शिष्ट. किंवा गुरुजन जें कांहीं सांगतील

---

* गागाभट्टी ग्रंथ पहा. † जातीप्रकाराचे हेतुअर्थ शून्य झाले आहेत.

त्यावर भाव ठेऊन वागणारे असे केवळ भोळे लोक होते; या भाविकपणाच्या गुणावरून 'भावगुण' ही संज्ञा या जातीस प्राप्त झाली असावी.

## भंडारी जातीच्या उत्पत्तीची पौराणिक कथा.

ज्ञातिनिर्णय नामक ग्रंथांत ब्रह्मोत्तरखंड आणि कथाकल्पतरु यांचा आधार घेऊन लिहिलें आहे तें येणेंप्रमाणें:—

**भंडारी जातीची उत्पत्ति**:—ह्या जातीची उत्पत्ति महादेवापासून आहे. या पृथ्वीच्याठायीं तिळकासुर ह्मणून एक महादैत्य देवादिकांस त्रास देत असे, ह्मणून सांबानें त्या दैत्याचा पराभव करून त्यास घाण्यांत घालून नंदीकरवीं तो घाणा फिरवूं लागला. तेव्हां महादेवास फार श्रम झाले, त्या श्रमाच्या योगानें शंकराच्या ललाटींचा घर्मबिंदू पडला, त्यापासून तात्काळ एक पुरुष उत्पन्न झाला, आणि शिवाची स्तुति करूं लागला. मग शंकरानें त्याचें 'भावगुण' नांव ठेविलें. शंकर त्यास ह्मणाले, मी फार तृषित झालों, तर तूं मला शीतल उदक प्राशनार्थ आणून दे. मग भावगुण ह्मणाला, देवा, शीतल उदक कोठून आणूं? असें ऐकून शंकरानें इच्छामात्रेंकरून सुरातरूचा ( नारळीचा ) वृक्ष उत्पन्न केला, आणि त्या भावगुणाकरवीं ( नारळीची ) मधुर सुरा काढवून ती शंकर प्याले, आणि संतुष्ट होऊन त्या भावगुणास अलकावतीच्याठायीं भांडारी केलें. त्यावरून भावगुणाच्या वंशास 'भंडारी' असें ह्मटलें आहे. यास आधार ( ब्रह्मोत्त० आणि क० क० पहा. )

ह्या जातीमध्यें पुष्कळ भेद आहेत, ते येणेंप्रमाणें:—

१ कित्ते भंडारी, २ गावड भंडारी, ३ थले भंडारी, ४ सिंदे भंडारी, असे भेद आहेत. यांचें मूळ ठिकाण गोमांतक प्रांत असावें, परंतु

बंडामुळें हे लोक तो प्रांत सोडून उत्तर कोंकण प्रांतांत वसत गेले. हल्लीं सर्व कोंकणांत यांचें बहुतकरून वास्तव्य आहे, हे लोक नारळी-पासून सुरा उत्पन्न करून उपजीविका चालवितात. यांच्यामध्यें मोठी जात कित्ते ( भावगुण ) भंडारी यांची आहे.

जातिभेद विवेकसारसिंधु नांवाचा एक लहानसा ग्रंथ आहे, त्यांत भंडारी लोकांविषयीं अशी कथा आहे.

भंडाऱ्यांत दोनतीन जाती निरनिराळ्या आहेत, त्यामध्यें मोठी जात भावगुण किंवा कित्ते भंडारी यांची आहे. त्यांनीं सर्व कोंकण-पट्टी व्यापून टाकिली आहे. यांचें मूळ वास्तव्य गोमांतक प्रांतीं होतें, तो प्रांत त्यांनीं फिरंगी लोक जुलूम करूं लागले तेसमयीं सोडून देऊन उत्तरेस वसत गेले. यांच्या उत्पत्तीविषयीं ब्रह्मोत्तर खंडांतून प्राकृतमध्यें विष्णुदास नामा ह्मणून एक कवि होऊन गेला, त्यानें ओवीबद्ध ग्रंथ लिहिला आहे; त्याखेरीज कोठें दुसऱ्या ठिकाणीं लेख सांपडत नाहीं. ब्रह्मोत्तरीं जी कथा आहे तिचा सारांशः— यापृथ्वीच्याठायीं तिळकासुर ह्मणून एक महादैत्य देवादिकांस त्रास देऊं लागला, तेव्हां सांबानें त्याचा पराभव करून, त्यास घाण्यांत घालून आपल्या नंदीकरवीं तो घाणा फिरवूं लागला असतां महादेवास श्रम जाहले; तेव्हां त्यानें भावगुण नांवाच्या भंडाऱ्यास उत्पन्न केलें. आणि त्याकरवीं नारळीपासून मधुर सुरा काढवून ती आपण प्याला आणि संतुष्ट होऊन पार्वतीस त्याला सुवर्ण बक्षीस देण्याची आज्ञा केली. ती मान्य करून पार्वतीनें त्यास पाटावर बसवून घरांत सुवर्ण आणावयास गेली, तों तेथें एक ब्राह्मण आला. त्यास आभ्युत्थान देण्याकरितां भावगुणानें आसन सोडिलें; त्यावर ब्राह्मण बसला असतां पार्वतीनें भावगुणास देण्याकरितां घरांतून सुवर्ण आणिलें, तें शिवानें सांगितल्याप्रमाणें आसनावर बसलेल्यास देऊन ती पुन्हा घरांत जाती झाली. ब्राह्मण उठून गेल्यावर भावगुण तेथेंच उभा होता, त्यास पार्वतीनें पुन्हां परत येऊन पाहिल्यावरून विचारिलें कीं, तुला सुवर्ण

मिळालें असतां तूं उभा कां राहिला आहेस ? तेसमयीं त्यानें ह्मटलें कीं, तुह्मीं सुवर्ण मला देण्याकरितां आणिलें तें भटास दिलें. तें ऐकून पार्वती कोपायमान होऊन ह्मणाली कीं, तुला सुवर्ण मिळावयाचें नाहीं. तूं आपली उपजीविका नारळीचा रस विक्रय करूनच कर. तेव्हांपासून या लोकांची वृत्ति नारळीपासून काढलेल्या रसाचा विक्रय करण्याची झाली. परंतु कथाकल्पतरू ह्मणून सर्व पुराणांतील कथा-संग्रह घेऊन मराठींत एक ग्रंथ केला आहे, त्यामध्यें भंडाऱ्याच्या उत्पत्तीविषयीं जी कथा लिहिली आहे, तिजमध्यें सांबानें भावगुणावर प्रसन्न होऊन त्यास अलकापुरीच्याठायीं भांडारी केलें आणि त्यावरून त्याच्या संततीस 'भंडारी' असें नांव पडलें असें ह्मटलें आहे. परंतु या सर्व कथेंत सत्य किती आहे, तें विचारशील मनुष्यांचे लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

भंडारी लोकही आपणांस कित्येक जातीच्या लोकांप्रमाणें क्षत्रिय आहों असें ह्मणवितात. परंतु हे अजून मुंजी करून जानवीं घालूं लागले नाहींत. यांतील कित्येक लोक जेवतेवेळीं सोंवळीं मात्र नेसत असतात. आणि त्यांच्यामध्यें पाट लावण्याची चाल आहे. यांचीं कुळें रजपूत* लोकांच्या कुळांबरोबर व त्यांच्या प्रत्येक निशाण झेंड्यावरोबर मिळतात. त्यावरून हे लोक रजपूत* लोकांतील असावे असें अनुमान होतें.

भंडारी लोकांच्या उत्पत्तीविषयीं अशी दंतकथा आहे कीं, रजपूत लोक राज्य करीत असतां दक्षिणदेशीं बंडें† फार उठलीं होतीं, तीं मोडून टाकावीं ह्मणून कांहीं रजपूत लोकांनीं पाटलाग करून त्यांचा मोड केला, आणि तीं बंडें पुन्हा उद्भवूं नयेत ह्मणून ते त्याच देशांत राहिले. यावरून त्यांस बंडहारी ( भंडारी ) असें नांव पडलें, हे लोक त्या वेळापासून तों पेशवाईपर्यंत शिपाईगिरीचीं कामें बजावीत होते. व त्यांनीं मुंबईस व साष्टीस राज्यही केलें असें इतिहासावरून कळतें.

* रजपूत ह्मणजे राजपूत. † हीं बंडें मुसलमानांचीं असावीं.

सदरहू पौराणिक ग्रंथावरून भंडारी* लोक हे क्षत्रीय आहेत असा खास सिद्धांत होतो. कारण कीं, त्यांचीं कुळें आणि मराठ्यांचीं कुळें हीं एकच आहेत. "मराठ्यांची उत्पत्ति† रजपूत लोकांपासून आहे. यांचीं व रजपुतांचीं कुळें एक मिळतात, व त्यामध्यें लग्नादि व्यवहार घडून येतात. मराठ्यांचें राज्य होईपर्यंत त्यांस ब्राह्मण शूद्रांत गणीत असत, व त्यांस लिहिण्यास वगैरे शिकवीत नसत. परंतु जेव्हां शिवाजीनें छत्रपती असा किताब मिळविला तेव्हां गागाभट्टानें गागाभट्टी या नांवाचा एक ग्रंथ लिहून त्यांस क्षत्रिय ठरविलें, व त्यांस जानवीं देऊन ब्रह्म-गायत्री मंत्र जपून वेदोक्त कर्माप्रमाणें चालण्यास अधिकार आहे, असें स्थापिलें. परंतु त्यांचें राज्य आतां नाहींसें झालें ह्मणून ब्राह्मण त्यांच्या येथें वेदोक्त कर्म करीत नाहींत." —जातीभेद विवेकसार दु० आवृ० पृ० ९३.

---

* नागपूर इलाख्यांत भंडारा ह्मणून जो प्रांत आहे, तेथील लोकांनीं गोमांतकांत आल्यावर एकोपा करून (सरेकरी लोकांचा) माडांचा रस काढून विकण्याचा धंदा पत्करिला ह्मणून या लोकांस भंडारी हें नांव पडलें असावें. यांत बरींच क्षत्रिय कुळें आहेत.

† या ग्रंथांत जरीं असें सांगितलें आहे तरी विशेष शोधांतीं असें सिद्ध होतें कीं रजपुतांची उत्पत्ति मराठ्यांपासून आहे, कारण मराठ्यांनीं उत्तर-प्रांतीं जाऊन तो देश जिंकला व राज्यें स्थापन केलीं त्यामुळ तिकडे त्यांची वसाहत झाली असा आधार मिळतो पण मराठ्यांस रजपुतांनीं जिंकल्याचा व दक्षण प्रांतांत लोक केव्हां येउन राहिले याजबद्दल लेख नाहीं शिवाय मराठ्यांच्या कुळांचा भरणा जसा महाराष्ट्र देशांत आहे तसा उत्तर प्रांतांत नाहीं या वरून मराठे हे मूळचे येथलेच असावे यांत संशय नाहीं.

# शाण्णव* कुळें.

शाण्णव कुळ्यांचा आह्माजवळ एक हस्तलिखीत लहानसा ग्रंथ पंचवीस वर्षांमागें मिळविलेला आहे, त्यावरून क्षत्रियांची उत्पत्ति कशी आणि कोठें झाली तें येणेंप्रमाणें:—

त्रेतायुगाचेठायीं परशुरामनांवाच्या पुरुषानें हिंदुस्थानांतील बहुतेक क्षत्रिय मारिले ह्मणून प्रजारक्षणार्थ महादेवानें सप्तऋषी† मिळवून तेतीस कोटी देवांसह, गण, गंधर्व यांस बलावून वसिष्ठाच्या हातीं फळ दिधलें. नंतर ब्रह्मा, विष्णु, महेश, आणि सप्तऋषी असे सर्व मिळून प्रयागास गेले. त्या ठिकाणीं यज्ञास आरंभ केला. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वणवेद यांचे मंत्र जपून यज्ञ सिद्ध केला. नंतर त्या फळाचे सहा पिंड केले, आणि वशिष्ठ ध्यानस्त बसून मूळमंत्र जपले तेव्हां प्रथम धुम्रीं धूमाळ जन्मले, तेचीं नांव **तोवर** पावले. यांशीं वहन, लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं सूर्य, वेद ऋग्वेद, त्रिपदा गाईत्री, वशिष्ठ गुरु, कुळें:—**नागणें, अंबारे, दळवी, माळचिमणे, जाळगुंज** ऐसे मिळून तोवरकुळी.

## तोवर.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—जसुमतीराजा यदुवंशीं याचें कुळ:— **तोवर**, गर्गायन ऋषि गुरु, कुळदैवत जोगेश्वरी, तक्त गादी

---

* मराठे क्षत्रियांचीं **शहाणीं कुळें**. याबद्दल हल्लीं ग्रंथांतरीं व प्रचारांत लोक शाण्णव शब्द वापरतात, परंतु मुख्य कुळें थोडकीं असून त्यांची वंशवृद्धी होऊन त्यांत पराक्रमी पुरुषांच्या कुळ्या वाढत गेल्या, त्यांची गणती करूं गेलें तर शाण्णवांपेक्षांही अधिक संख्या होते. सबब **शहाणीं कुळें** हाच शब्द बरोबर आहे.

† काश्यप, अत्रि, वशिष्ट, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि आणि भारद्वाज.

कर्नाटक (सावनूर बंकापुर), हिरवी गादी, हिरवें निशाण, पिंवळा वारू, जरीपटका, भूचरी मुद्रा नरसिंह मंत्र, विवाह (लग्नकार्यास) देवक रुद्राक्षांची माळ, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पुजणें त्यागा. यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**तामटे, बुलके, धातडे, मालपवार** हीं कुळें मिळून **तोंवर** जाणावें. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत घालणें.

## धुलप.

दुसऱ्या ग्रंथाचें मत:—महीपाल राजा शेषवंशीं याचें कुळ, **धुलप**, कुळदैवत खंडेराव, भूचरीमूद्रा, मृत्युंजय मंत्र, तक्त गादी नाशीकत्रिंवक, आणि विजयदुर्ग, भगवी गादी, भगवें निशाण, भगवा वारू, जरीपटका, लग्नकार्यास देवक कळंबाचें, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र खांडा पुजणें, यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**धुमाळ, घुले, धुरे, कासले, लेंडपवार,** हीं कुळें मिळून धुलप जाणावें. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र, यज्ञोपवीत घालणें.

## पवार.

सोहंमंत्रधारा घातली, त्यावेळीं **धारपवार** निर्माण झाले, सोळपात्र जानवें घालणें, याशीं वहन, लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं हनुमंत, वेद ऋग्वेद, त्रिपदा गाइत्री, वसिष्ठ गुरु, गोवर्धन देवक, पवारांचीं प्रसिद्ध कुळें:—**जगदळे, वागजे, वाघ, लांडगे, उबाडे, सेलके,** असे मिळून पवारकुळीं.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—मयुरध्वज राजा सूर्यवंशी याचे वंशीं झाले. उपनाम **पवार**, भारद्वाज गुरु, कुळदैवत खंडेराव, अलक्षमुद्रा, बजिमंत्र, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र तरवार पुजणें, पिवळी गादी, पिवळें निशाण, जरदा घोडा, तक्तगादी पायगड,

लग्नकार्यास देवक धार. यांचीं कुळें :—**धारराव, पाळवे, इचारे,** आणि, **सालवे** हीं कुळें मिळून पवार. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत (जानवें) घालणें.

## चवाण.

अनंत मंत्र जपले, तेथें चतुरभुजी **चवाण** निर्माण झाले, तेव्हां शंकरास मोठें आश्चर्य वाटलें कीं, हा अजिंक्य वीर जन्मला ह्मणून चक्र मंत्र जपून दोन भूजा छेदिल्या. यांचें वहन पांढरा घोडा, पांढरें आभरण, पांढरें भूषण, पांढरें छत्र, पांढरें निशाण, ध्वजस्तंभीं हनुमंत, वेद ऋग्वेद, त्रिपदा गाइत्री, वसिष्ठ गुरु, वासुकी देव्हारी, देवक वेल भार्गवी, कुळें:—**मोहिते, हावले, पारटे, रणदिवे,** ऐसे हे चवाण.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत** :—मणिभद्र राजा सोमवंशी याचें कुळ, **चवाण,** कपिल ऋषि गुरु, कुळदैवत जोतिबा आणि खंडेराव, चाचरीमुद्रा, नृसिंह मंत्र, तक्तगादी पंजाब, पिंवळी गादी, पिंवळें निशाण, पिंवळा वारू, विवाह (लग्नकार्यास) देवक वासुंद्री वेल विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पुजणें खांडा, यांचीं कुळ येणें-प्रमाणें:—**धडम, वारगे,** आणि **दलपते,** हीं कुळें मिळून चवाण. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें. यज्ञोपवीत घालणें.

## मोहिते.

विजयाभिनामक राजा सोमवंशी, याचें कुळ, **मोहिते,** गार्ग्यऋषी गुरु, कुळदैवत खंडेराव, अलक्षमुद्रा, बीजमंत्र, तक्तगादी मंदोसर, पांढरी गादी, पांढरें निशाण, पांढरा वारू, विवाह (लग्न) कार्यास देवक कळंबाचें. विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पुजणें तेगा. यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**माने, कामरे, कांटे, काटवटे,** असे हे मोहिते

जाणावे. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत ( जानवें ) घालणें.

### इंगळे.

नियंत मंत्र जपले तेच इंगळे निर्माण झाले, यांसी वहन. लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं सूर्य, वेद ऋग्वेद, वसिष्ठ गुरु, कुनका देवक, इंगळा राजा अयोध्यापूरचा.—कुळें **लांखंडें**. क्षत्रियधर्म चालविणें सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें यज्ञोपवीत घालणें.

### सुर्वे.

नांव मंत्र जपले तेच **सुर्वे** निर्माण झाले, यांसीं वहन शामकर्ण-वारू, लाल आभरग, लाल भूषण, (तीन वर्णिका छत्र, तीन वर्णिका निशाण, ध्वजस्तंभी सूर्य) वेद ऋग्वेद, त्रिपदा गाईत्री, सूर्यकांति देवक, वसिष्ठ गुरु, कुळें:—**घाटगे, गाइकवाड, कस्यो, दुबडे, थोरात, देवमाने, लटके, साकळे, डोइफोड, तुळीक, कचरे, कोंकाटे,** ऐसे हे सुर्वे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—अजपाळ राजा सूर्यवंशी, याचे वंशीं झाले, **सुर्वे**, वसिष्ठ गुरु, कुळदैवत महालक्ष्मी देवी, खेचरी मुद्रा, तारक मंत्र, विजयादशमीस ( दसऱ्यास ) शस्त्र खांडा पुजणें, लग्नकार्यास देवक सूर्यफूल तक्त गादी अयोध्या, पिंवळी गादी, पिंवळें निशाण, तांबडा घोडा, यांचीं कुळें:—**सितोले, गवसे, नाईक, घाड, राऊत,** हीं कुळें मिळून सुर्वे. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत ( जानवें ) घालणें.

### जगताप.

वसिष्ठ, दुर्वास, ब्रह्मा, विष्णु, महेश इत्यादि सप्तऋषींनीं मिळून पाटीची मळी काढून पिंड केला. ते जपमंत्र जपले. तेच **जग-**

## शाण्णव* कुळें.

शाण्णव कुळयांचा आह्माजवळ एक हस्तलिखीत लहानसा ग्रंथ पंचवीस वर्षांमागें मिळविलेला आहे, त्यावरून क्षत्रियांची उत्पत्ति कशी आणि कोठें झाली तें येणेंप्रमाणें:—

त्रेतायुगाचेठायीं परशुरामनांवाच्या पुरुषानें हिंदुस्थानांतील बहुतेक क्षत्रिय मारिले ह्मणून प्रजारक्षणार्थ महादेवानें सप्तऋषी† मिळवून तेतीस कोटी देवांसह, गण, गंधर्व यांस बलावून वसिष्ठाच्या हातीं फळ दिधलें. नंतर ब्रह्मा, विष्णु, महेश, आणि सप्तऋषी असे सर्व मिळून प्रयागास गेले. त्या ठिकाणीं यज्ञास आरंभ केला. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वणवेद यांचे मंत्र जपून यज्ञ सिद्ध केला. नंतर त्या फळाचे सहा पिंड केले, आणि वशिष्ठ ध्यानस्त बसून मूळमंत्र जपले तेव्हां प्रथम धुम्रीं धूमाळ जन्मले, तेची नांव **तावर** पावले. यांशीं वहन, लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं सूर्य, वेद ऋग्वेद, त्रिपदा गाईत्री, वशिष्ठ गुरु, कुळें:—**नागणें, अंबारे, दळवी, माळचिमणे, जाळगुंज** ऐसें मिळून तावरकुळी.

### तावर.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—जसुमतीराजा यदुवंशीं याचें कुळ:— **तावर**, गर्गायन ऋषि गुरु, कुळदैवत जोगेश्वरी, तक्त गादी

---

* मराठे क्षत्रियांचीं **शहाणीं कुळें**. याबद्दल हल्लीं ग्रंथांतरीं व प्रचारांत लोक शाण्णव शब्द वापरतात, परंतु मुख्य कुळें थोडकीं असून त्यांची वंशवृद्धी होऊन त्यांत पराक्रमी पुरुषांच्या कुळया वाढत गेल्या, त्यांची गणती करूं गेलें तर शाण्णवांपेक्षांही आधिक संख्या होते. सबब **शहाणीं कुळें** हाच शब्द बरोबर आहे.

† काश्यप, अत्रि, वशिष्ट, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि आणि भारद्वाज.

कर्नाटक (सावनूर बंकापुर), हिरवी गादी, हिरवें निशाण, पिंवळा वारू, जरीपटका, भूचरी मुद्रा नरसिंह मंत्र, विवाह (लग्नकार्यास) देवक रुद्राक्षांची माळ, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पुजणें त्यागा. यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**तामटे, बुलके, धातडे, मालपवार** हीं कुळें मिळून **तोवर** जाणावे. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत घालणें.

## धुलप.

दुसऱ्या ग्रंथाचें मत:—महीपाल राजा शेषवंशीं याचें कुळ, **धुलप**, कुळदैवत खंडेराव, भूचरीमूद्रा, मृत्युंजय मंत्र, तक्त गादी नाशीकत्रिंबक, आणि विजयदुर्ग, भगवी गादी, भगवें निशाण, भगवा वारू, जरीपटका, लग्नकार्यास देवक कळंबाचें, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र खांडा पुजणें, यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**धुमाळ, घुले, धुरे, कासले, लेंडपवार,** हीं कुळें मिळून धुलप जाणावे. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र, यज्ञोपवीत घालणें.

## पवार.

सोहंमंत्रधारा घातली, त्यावेळीं **धारपवार** निर्माण झाले, सोळपात्र जानवें घालणें, याशीं वहन, लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं हनुमंत, वेद ऋग्वेद, त्रिपदा गांइत्री, वासिष्ठ गुरु, गोवर्धन देवक, पवारांचीं प्रसिद्ध कुळें:—**जगदळे, वागजे, वाघ, लांडगे, उबाडे, सेलके,** असे मिळून पवारकुळीं.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत:**—मयुरध्वज राजा सूर्यवंशी याचे वंशीं झाले. उपनाम **पवार**, भारद्वाज गुरु, कुळदैवत खंडेराव, अलक्षमुद्रा, बीजमंत्र, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र तरवार पुजणें, पिवळी गादी, पिवळें निशाण, जरदा घोडा, तक्तगादी पायगड,

लग्नकार्यास देवक धार. यांचीं कुळें :—**धारराव, पाळव, इचार,** आणि, **सालवे** हीं कुळें मिळून पवार. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत ( जानवें ) घालणें.

## चवाण.

अनंत मंत्र जपले, तेथें चतुरभुजी **चवाण** निर्माण झाले, तेव्हां शंकुरास मोठें आश्चर्य वाटलें कीं, हा अजिंक्य वीर जन्मला ह्मणून चक्र मंत्र जपून दोन भूजा छेदिल्या. यांचें वहन पांढरा घोडा, पांढरें आभरण, पांढरें भूषण, पांढरें छत्र, पांढरें निशाण, ध्वजस्तंभीं हनुमंत, वेद ऋग्वेद, त्रिपदा गाइत्री, वसिष्ठ गुरु, वासुकी देव्हारी, देवक वेल भार्गवी, कुळें:—**मोहिते, हावले, पोरटे, रणदिवे,** ऐसे हे चवाण.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत** :—मणिभद्र राजा सोमवंशी याचें कुळ, **चवाण**, कपिल ऋषि गुरु, कुळदैवत जोतिबा आणि खंडेराव, चाचरीमुद्रा, नृसिंह मंत्र, तक्तगादी पंजाब, पिंवळी गादी, पिंवळें निशाण, पिंवळा वारू, विवाह ( लग्नकार्यास ) देवक वासुंद्री वेल विजयादशमीस ( दसऱ्यास ) शस्त्र पुजणें खांडा, यांचीं कुळें येणें-प्रमाणें:—**धडम, वारगे,** आणि **दलपते,** हीं कुळें मिळून चवाण. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें. यज्ञोपवीत घालणें.

## मोहिते.

विजयाभिनामक राजा सोमवंशी, याचें कुळ, **मोहिते,** गार्ग्यऋषी गुरु, कुळदैवत खंडेराव, अलक्षमुद्रा, बीजमंत्र, तक्तगादी मंदोसर, पांढरी गादी, पांढरें निशाण, पांढरा वारू, विवाह ( लग्न ) कार्यास देवक कळंबाचें. विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पुजणें तेगा. यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**माने, कामरे, कांटे, काटवटे,** असे हे मोहिते

जाणावे. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत ( जानवें ) घालणें.

## इंगळे.

नियंत मंत्र जपले तेच इंगळे निर्माण झाले, यांसी वहन. लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं सूर्य, वेद ऋग्वेद, वसिष्ठ गुरु, कुनका देवक, इंगळा राजा अयोध्यापूरचा.—कुळें **लांडे.** क्षत्रियधर्म चालविणें सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें यज्ञोपवीत घालणें.

## सुर्वे.

नांव मंत्र जपले तेच **सुर्वे** निर्माण झाले, यांसीं वहन शामकर्ण-वारू, लाल आभरण, लाल भूषण, (तीन वर्णिका छत्र, तीन वर्णिका निशाण, ध्वजस्तंभी सूर्य) वेद ऋग्वेद, त्रिपदा गाईत्री, सूर्यकांति देवक, वसिष्ठ गुरु, कुळें:—**घाटगे, गाइकवाड, कस्यो, दुबडे, थोरात, देवमाने, लटके, साकळे, डोइफोडे, तुळीक, कचरे, कोकाटे,** ऐसे हे सुर्वे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत:**—अजपाळ राजा सूर्यवंशी, याचे वंशीं झाले, **सुर्वे**, वसिष्ठ गुरु, कुळदैवत महालक्ष्मी देवी, खेचरी मुद्रा, तारक मंत्र, विजयादशमीस ( दसऱ्यास ) शस्त्र खांडा पुजणें, लग्नकार्यास देवक सूर्यफूल तक्त गादी अयोध्या, पिंवळी गादी, पिंवळें निशाण, तांबडा घोडा, यांचीं कुळें:—**सितोळे, गवसे, नाईक, घाड, राऊत,** हीं कुळें मिळून सुर्वे. क्षत्रियधर्म चालाविणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत ( जानवें ) घालणें.

## जगताप.

वसिष्ठ, दुर्वास, ब्रह्मा, विष्णु, महेश इत्यादि सप्तऋषींनीं मिळून पाटीची मळी काढून पिंड केला. ते जपमंत्र जपले. तेच **जग-**

**ताप** निर्माण झाले. क्षत्रियधर्म चालविणें, यांसीं वहन उजळा वारू, लाल छत्र, लाल निशाण, एक जिभी ध्वजस्तंभीं चाप, वेद ऋग्वेद, कुळगोत्र याजळ, त्रिपदा गाईत्री, वसिष्ठ गुरु, प्रयागवट देवक, **जगताप** कासिखंड कोरंडी.

**दुसऱ्या ग्रंथाचें मतः**—वसुसेन राजा सोमवंशीं याचें कूळ, **जगताप** दाल्भ्य ऋषि गुरु, कुळदैवत खंडेराव, खेचरीमुद्रा, षडाक्षरी मंत्र, तक्तगादी भरतपूर, ढवळी गादी, ढवळें निशाण, ढवळा वारू लग्नकार्यास देवक पिंपळाचें पान, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र तरवार पुजणें, यांचीं कुळें येणेंप्रमाणें:-**शेलार, म्हात्रे, सितोले,** हीं तीन कुळें मिळून जगताप जाणावे. क्षत्रियधर्म चालविणें सोंवळें धूतवस्त्र नेसणें.

## सिंदे.

बारा पाकंडी संसारशिंदे निर्माण झाले, तिघे जावळे, सोळा दैवतें, ज्याचे द्वारीं नाग, तो **कुवारसिंदा, शसुपाळसिंदा, महंकाळसिंदा, सकपाळसिंदा, जयसिंदा, विजयसिंदा, दुर्दयासिंदा, नकुळसिंदा, सीतज्यासिंदा,** ऐसे हे बारा सिंदे. यांसीं वहनें दिधलीं, लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, दरयावरती लाल निशाण, ध्वजस्तंभीं शेष, वेद सामवेद, चौपदा गाईत्री, कौंडिण्य गुरु, मथन देवक, सिंगण वेळेश्वराचा विस्तार, **कुवासिंदा**, मार्वेली देवक; **जयसिंदा**, रुईचें देवक; **विजयसिंदा**, वडाग्नि देवक; ऐसे हे बारा सिंदे सोमवंशीचे राजे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मतः**—भद्रसेन राजा सूर्यवंशीं, याचें कूळ. सिंदे, कौंडिण्य ऋषी गुरु, कुळदैवत जोतिबा, अलक्ष मुद्रा, तारकमंत्र, तक्त गादी ग्वाल्हेर, पिवळी गादी, भगवें निशाण, पिवळा घोडा, लग्नकार्यास देवक रुईचें, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र तरवार पुजणें. हे सिंदे बारा असून एकच उपनांवाचे जाणावे,

क्षात्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत ( जानवें ) घालणें.

## सिंदे दुसरा प्रकार.

एका ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, शेषापासून बारा सिंदे झाले ते येणेंप्रमाणें:-- **कुर्वासिंदा, शिशुपाळसिंदा, महत्पाळसिंदा, सकत्पाळसिंदा, जयसिंदा, विजयसिंदा, दुर्दयासिंदा, नकुळसिंदा, सितज्यासिंदा,** इत्यादि बारा सिंदे झाले ; त्यांची ओळख येणेंप्रमाणें:--सिगणवेळ देवक, तो **कुर्वासिंदा** ; मारवेल देवक, तो **जयसिंदा** ; कळंबाचें देवक, तो **विजयसिंदा**, इत्यादि बारा सिंदे जाणावे, असें एका प्रतीमध्यें लिहिलें आहे.

## जाधव.

नारायण आधिवंत मंत्र जपले, तेच **जाधव**, यादव निर्माण झाले. यांसीं गुरु कौंडिण्य, सडासंमार्जन करणें, क्षात्रधर्म चालविणें, यांसीं वहन दिधलें, सात सिंहासनें, अटरा निशाणें, बाराशें मंडळीचा कांत, मावी घोडा, मावी आभरण, मावी भूषण, मावी छत्र, मावी निशाण, शेष देवक, जाधव यादव हे मथुरापट्टणचे, कुळें:— **भोगसाटे, लाटे, सेवटे, बोराटे, पुदाले, काटवटे, अपराधे, हगरे,** ऐसे हे जाधव यादव.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:-यदुराजा यदुवंशीं याचें कुळ जाधव उर्फ यादव, कौंडिण्य ऋषि गुरु, कुळदैवत जोगेश्वरी, जोतिबा आणि खंडेराव, तक्तगादी मथुरापूर : पिंवळी गादी, पिंवळें निशाण, पिंवळा वारू, अलक्ष मुद्रा, पंचाक्षरी मंत्र, विवाह लग्नकार्यास देवक उंबराचें. विजयादशमीस ( दसऱ्यास ) शस्त्र पुजणें तरवार. यांचीं कुळें येणेंप्रमाणें:--**जालिंधरे, जसवंत, जगपाल, पाटेल, जागले, जारे, धूमक, घोगले, सीरगारे, घरत,** हीं कुळें मिळून

जाधव जाणावे. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत (जानवें) घालणें.

## निकम.

वैजावंत मंत्र जपले तेच **निकम** निर्माण झाले, यांसीं आचार सडासंमार्जन, अंघोळ करणें, यांसीं वहन दिधलें, लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र, पार्थऋषि गुरु, कळकी देवक, कुळें:—**नरखांबे, गूढभोजनें, अवताडे, हाळींग,** ऐसी ही निकमकुळी.

## नलावडे.

सफळवंत मंत्र जपले, तेच **नलावडे** निर्माण झाले; क्षत्रियधर्म चालविणें, यांसीं वहन दिधलें लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र, अथर्वण वेद, चौपदा गाईत्रि, दुर्वास गुरु, नागचाफ्याचें देवक, कुळें:—**दाखे** आणि **साबळे.** सोंवळें धूत वस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत घालणें.

## कदम.

गुणवंत मंत्र जपले, तेच **कदम** निर्माण झाले, क्षत्रियधर्म चालविणें, यांसीं वहन दिधलें, लाल घोडा, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र, वेद सामवेद, चौपदा गाईत्री, दुर्वास गुरु, कळंब देवक, कुळें:—**थोरात, भीरसलगडे, आंगणें, उगडे, कदमराय, गुढघ्यासीं बसींग,** ऐसी ही कदमकुळी. सोंवळ धूत वस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत घालणें.

## साळुंके.

बुद्धिवंत मंत्र जपले, तेच **साळुंके** निर्माण झाले, क्षत्रियधर्म चालविणें, यांसीं वहन दिधलें, पिंवळा घोडा, पिंवळें आभरण, पिंवळें भूषण, पिंवळें छत्र, पिंवळें निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र,

अथर्वणवेद, चौपदागाईत्रि, दुर्वास गुरु, साळुंखे चक्रवर्ती, त्रिशूळ उत्पत्ति, महिनगर, कुळें:—**काळे, खांडे, तांबे, चंदनसीव, वावरे, मोटे, ढोरे, आतकारि, सावळे, सवाळे, पडवळ,** ऐसे हे साळुंखे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत:**—हंसध्वजराजा सूर्यवंशीं याचें कुळ, साळुंके, विश्वामित्र ऋषि गुरु, कुळदैवत हिंगळाजमाता, अगोचरी मुद्रा, बीजमंत्र, लग्नकार्यास देवक कमळ देंठासहित, तक्त गादी दिल्ली शहर, पिंवळी गादी, पिवळें निशाण, जरदा वारू, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पुजणें खांडा. यांचीं कुळें येणेंप्रमाणें: **वाघमारे, घाटगे, घाग, पाताडे,** किंवा **पाटोळे.**—हीं कुळें मिळून साळुंके जाणावे. क्षात्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र, यज्ञोपवीत (जानवें) घालणें.

## सिसोदे.

सहस्र मंत्र जपले, तेच **सिसोदे** निर्माण झाले. यांसीं वहन दिधलें, लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, भगवें छत्र, हिरवें निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र, अथर्वण वेद, चौपदा गाईत्रि, दुर्वास गुरू, सूर्यकांत देवक, कुळें:—**खराटे, काटे, चौधारे,** ऐसे हे **सिसोदे.** सोंवळें धूत वस्त्र नेसणें, यज्ञोपवीत घालणें.

## सिसोदे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत:**—सिंहकेत राजा सूर्यवंशीं याचें कुळ **सिसोदे** गौतमऋषि गुरु, कुळदैवत श्रीआंबिकादेवी, भूचरी मुद्रा पंचाक्षरीमंत्र, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पुजणें कट्यार, लग्नकार्यास देवक हळदीचें, तक्तगादी तुळजापूर, यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**अपराधे, भोवर, जोशी,** आणि **सालव,** हीं कुळें मिळून **सिसोदे,** क्षात्रियधर्म चालविणें, धूतवस्त्र नेसणें. यज्ञोपवीत घालणें.

जाधव जाणावे. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत (जानवें) घालणें.

## निकम.

वेजावंत मंत्र जपले तेच **निकम** निर्माण झाले, यांसीं आचार सडासंमार्जन, अंघोळ करणें, यांसीं वहन दिधलें, लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र, पार्थऋषि गुरु, कळकी देवक, कुळें:—**नरखांबे, गूढभोजनें, अवताडे, हाळींग**, ऐसीं ही निकमकुळें.

## नलावडे.

सफळवंत मंत्र जपले, तेच **नलावडे** निर्माण झाले; क्षत्रियधर्म चालविणें, यांसीं वहन दिधलें लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र, अथर्वण वेद, चौपदा गाईत्रि, दुर्वास गुरु, नागचाप्याचें देवक, कुळें:–**दाखे** आणि **साबळे**. सोंवळें धूत वस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत घालणें.

## कदम.

गुणवंत मंत्र जपले, तेच **कदम** निर्माण झाले, क्षत्रियधर्म चालविणें, यांसीं वहन दिधलें, लाल घोडा, लाल भूषण, लाल छत्र, लाल निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र. वेद सामवेद, चौपदा गाईत्री, दुर्वास गुरु, कळंब देवक, कुळें:—**चोराटे, भीरसलगडे, आंगणें, उगडे, कदमराय, गुढघ्यासीं बसींग**, ऐसीं हीं कदमकुळें. सोंवळें धूत वस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत घालणें.

## साळुंके.

बुद्धिवंत मंत्र जपले, तेच **साळुंके** निर्माण झाले, क्षत्रियधर्म चालविणें, यांसीं वहन दिधलें, पिवळा घोडा, पिवळें आभरण, पिवळें भूषण, पिवळें छत्र, पिवळें निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र,

अथर्वणवेद, चौपदागाईत्रि, दुर्वास गुरु, साळुंखे चक्रवर्ती, त्रिशूळ उत्पत्ति, महिनगर, कुळें:—**काळे, खांडे, तांबे, चंदनसीव, वावरे, मोटे, ढोरे, आतकारि, सावळे, सेवाळे, पडवळ,** ऐसे हे साळुंखे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—हंसध्वजराजा सूर्यवंशीं याचें कुळ, साळुंके, विश्वामित्र ऋषि गुरु, कुळदैवत हिंगळाजमाता, अगोचरी मुद्रा, बीजमंत्र, लग्नकार्यास देवक कमळ देठासहित, तक्त गादी दिल्ली शहर, पिंवळी गादी, पिवळें निशाण, जरदा वारु, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पुजणें खांडा. यांचीं कुळें येणेंप्रमाणें: **वाघमारे, घाटगे, घाग, पाताडे,** किंवा **पाटोले.**—हीं कुळें मिळून साळुंके जाणावे. क्षात्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र, यज्ञोपवीत (जानवें) घालणें.

## सिसोदे.

सहस्र मंत्र जपले, तेच **सिसोदे** निर्माण झाले. यांसीं वहन दिधलें, लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, भगवें छत्र, हिरवें निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र, अथर्वण वेद, चौपदा गाईत्रि, दुर्वास गुरु, सूर्यकांत देवक, कुळें:—**खराटे, कांटे, चौधारे,** ऐसे हे **सिसोदे.** सोंवळें धूत वस्त्र नेसणें, यज्ञोपवीत घालणें.

## सिसोदे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—सिंहकेत राजा सूर्यवंशीं याचें कुळ **सिसोदे** गौतमऋषि गुरु, कुळदैवत श्रीआंबिकादेवी, भूचरी मुद्रा पंचाक्षरीमंत्र, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पुजणें कट्यार, लग्नकार्यास देवक हळदीचें, तक्तगादी तुळजापूर, यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**अपराधे, भोवर, जोशी,** आणि **साळव,** हीं कुळें मिळून **सिसोदे,** क्षात्रियधर्म चालविणें, धूतवस्त्र नेसणें. यज्ञोपवीत घालणें.

## भोंसले.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—भोजराजा सूर्यवंशीं याचें कुळ, **भोंसले**, शालंकायन ऋषि गुरु, कुळदैवत जगदंबा, भूचरी मुद्रा, तारक मंत्र. विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र विद्या पुजणें, लग्न कार्यास देवक शंक पुजणें, भगवी गादी, भगवें निशाण, निळा वारु, तक्तगादी नागपूर, यांचीं कुळें:—**सकपाळ, राव, नकाशे,** हीं कुळें मिळून **भोंसले**, क्षत्रियधर्म चालविणें, यज्ञोपवीत जानवें घालणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें.

## घोरपडे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मतः**—हरिश्चंद्र राजा सूर्यवंशी त्याचें कुळ उपनाम **घोरपडे**, वसिष्ठ ऋषि गुरु, कुळदैवत खंडेराव, अगोचरी मुद्रा, पंचाक्षरी मंत्र, विजयादशमीस (दसऱ्यास) कटयार पुजणें, लग्नकार्यास देवक रुईचें, तक्तगादी पैठण, शुभ्र गादी, शुभ्र निशाण, लाल अथवा निळा घोडा, यांचीं कुळें:—**मालप, पारधे,** हीं कुळें मिळून **घोरपडे**, क्षत्रियधर्म चालविणें, यज्ञोपवीत (जानवें) घालणें सोवळें धूतवस्त्र नेसणें.

## मोरे.

महेश मंत्र जपले तेच **मोरे** निर्माण झाले, शीलपात्र जानवें घालणें, क्षत्रियधर्म चालविणें, यांसी वहन लाल घोडा, लाल आभरण, लाल भूषण, भगवें छत्र, हिरवें निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र, आथर्वणवेद, चौपदा गाईत्रि, दुर्वास गुरु, तीनशें साठ वातीचें देवक, **मोरे** चित्रबेटचे राजे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मतः**—मांधाता राजा सोमवंशी याचें कुळ **मोरे**, ब्रहदश्वा ऋषि गुरु, कुळदैवत खंडेराव, अगोचरी मुद्रा, मृत्युंजय मंत्र, तक्त गादी काश्मीर, भगवी गादी, भगवें निशाण, भगवा वारु, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पूजणें कटयार, लग्नकार्यास

देवक मोराचें पीस. आणि ३६० दीप (दीवे), यांचीं कुळें:— **केसरकर, कलपाते** आणि **दरबारे**, हीं कुळें मिळून **मोरे**, क्षत्रिय-धर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत (जानवें) घालणें.

## सावंत.

नेवंत मंत्र जपले. तेच **सावंत** निर्माण झाले, क्षत्रियधर्म चालावेणें, यांसी वहन लोहबंदी वारू, पिंवळें आभरण, पिंवळें भूषण, पिंवळें छत्र, पिंवळें निशाण, ध्वजस्तंभीं चंद्र, अथर्वण वेद, चौपदा गाईत्रि, भारद्वाज देवक, दुर्वास गुरु, कुळें:–**सावंत, मंगळ, थटिव, जैसिंग**; मोहरी, पोवा वाजे, अकराशें मंडळीचा कांत, सावंत गोव्याचा राजा.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:–भद्रसेन नामक राजा, सोमवंशीं, त्याचें कुळ:— उपनाम सावंत, दुर्वास ऋषि गुरु, कुलस्वामी जोतीबा, चाचरी मुद्रा. नारसिंह मंत्र, तक्तगादी गोंव्याकडेस सावंतवाडी, भगवी गादी, पिंवळें निशाण, लोहबंदी वारू, जरीपटका. विवाह लग्नकार्यास देवक हस्तीदंत, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र तरवार पूजणें. यांचीं कुळें येणेंप्रमाणें:— **कंबले, इनमुलकर**, हीं कुळें मिळून सावंत जाणावे. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूत-वस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत घालणें.

## राणे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:–सुधन्वा नामक राजा सूर्यवंशीं याचें कुळ **राणे**, जमदग्नी ऋषि गुरु, कुळदैवत माहेश्वरी, चाचरी मुद्रा षडाक्षरी मंत्र विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र तरवार पूजणें, तक्तगादी उदेपुर, लाल गादी, लाल निशाण, अबलख वारू, लग्न-कार्यास देवक वडाचें; यांचीं कुळें:–**दधे, सिगवन, मुलीक** आणि **फाटक**, हीं कुळें मिळून **राणे** जाणावे. क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूत वस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत (जानवें) घालणें.

## दाभाडे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:-मणीभद्र राजा सोमवंशी याचें कुळ:—**दाभाडे**, शांडिल्य ऋषि गुरु, कुळदैवत जोतिबा, अगोचरी मुद्रा, तारकमंत्र, तक्तगादी द्वारकापट्टण. लग्नकार्यास देवक कळंबाचें. भगवी गादी, भगवें निशाण, जरदा वारू. विजया दशमीस (दसऱ्यास) शस्त्र कट्यार पूजणें. यांचीं कुळें येणेंप्रमाणें:-**निंबाळकर राव, रणदिवे,** असे **दाभाडे** जाणावे, क्षत्रियधर्म चालविणें, सोवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत (जानवें) घालणें.

## गाईकवाड.

**दसऱ्या ग्रंथाचें मत**:--कार्तवीर्य राजा सोमवंशी याचें कुळ:—गाईकवाड, सनत्कुमार ऋषि गुरु, कुळदैवत खंडेराव, भूचरी मुद्रा, मृत्युंजय मंत्र, तक्तगादी गुजराथदेश, भगवी गादी, भगवें निशाण, भगवा किंवा लाल घोडा, विवाह लग्नकार्यास देवक उंबराचें, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र त्यागा पुजणें, यांचीं कुळें येणेंप्रमाणें:— **पाटनकर, भाते**, हीं कुळें मिळून **गाईकवाड**, क्षत्रियधर्म चालविणें, सोवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत जानवें घालणें.

## झाडीक.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:--सुमंती राजा शेषवंशी याचें कुळ:-झाडीक, माल्यवंत ऋषि गुरु, कुळदैवत कात्यायनी, खेचरी मुद्रा, पचाक्षरी मंत्र, तक्तगादी बागलकोट, निळी गादी, निळें निशाण विवाह (लग्न) कार्यास देवक पिंपळाचें, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र कटयार किंवा तरवार पूजणें, याचीं कुळें येणेंप्रमाणें:—**गवळी, भोगले**,* **भोईर, ठाकुर**, हीं कुळें मिळून **झाडीक**,

---

* या कुळीचे भंडारी आहेत, त्यांनीं माहीम, साष्टी प्रांतांत राज्य केलें होतें.

क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें शुभ्रवस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत घालणें.

## तावडे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—नागानन राजा शेषवंशीं याचें कुळ. **तावडे**, विश्वावसु किंवा विश्वामित्र गुरु, कुळदैवत जोगेश्वरी, अगोचरी मुद्रा, षडाक्षरी मंत्र, तक्तगादी इंदुर, ढवळी गादी, ढवळें निशाण, ढवळा वारू, विवाह ( लग्नकार्यास ) देवक हळदीचें पान अथवा सोन्याचें पान, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र कट्यार पूजणें: यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**सांगळ**, **नामजादे**, **जांबळे**, **चिरफुले**, हीं कुळें मिळून तावडे, क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र परिधान करणें, यज्ञोपवीत घालणें.

## बागवे.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—गोपीराजा शेषवंशी याचें कुळ:—**बागवे**, शौनल्य ऋषि गुरु, कुळदैवत महाकाळी, भूचरी मुद्रा, नरसिंह मंत्र, तक्तगादी कोटवुंदी, भगवी गादी, भगवें निशाण, भगवा वारू, विवाह लग्न कार्यास देवक कळंबाचें, विजयादशमीस ( दसऱ्यास ) शस्त्र पूजणें तरवार, यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**मोकाशी**, **दिवटे**, हीं कुळें मिळून **बागवे**, क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत ( जानवें ) घालणें.

## शिरके.

**दुसऱ्या ग्रंथाचें मत**:—कर्णध्वज राजा यदुवंशीं याचें कुळ:—**शिरके**, सौनल्य ऋषि गुरु, कुळदैवत महाकाळी, तक्तगादी अमदाबाद, शुभ्र गादी, शुभ्र निशाण, शुभ्र वारू, जरीपटका, चाचरी मुद्रा, बीज मंत्र, विवाह लग्नकार्यास देवक कळंबाचें, विजयादशमीस (दसऱ्यास) शस्त्र पूजणें खांडा, यांचीं कुळें येणेंप्रमाणें:—**फांकडे**, **शेलके**,

**बागवान, गावंड, मोकळ,** हीं कुळें मिळून **शिरके** जाणावे) क्षत्रियधर्म चालविणें, सोंवळें धूतवस्त्र नेसणें, यज्ञोपवीत ( जानवें ) घालणें.

## "क्षत्रियोन्नति दर्पण" पुस्तकांत क्षत्रियधर्म चालविणारीं मराठ्यांचीं ९६ कुळें आहेत तीं व त्यांचीं उपकुळें व आडनांवें येणेंप्रमाणें.

१ भोसले:–१ नकासे. २ लोखंडे.

२ गायकवाड:—१ भाते. २ मवाते. ३ डिगे. ४ हुबे. ५ डेवरे. ६ सडवर.

३ पवार:—१ गुजर. २ मालपवार. ३ बने. ४ दुखंडे. ५ रोकडे. ६ पतयानें. ७ जगपाळ. ८ वागजे. ९ लांडगे. १० उबाडे.

४ शिंदे:—१ कुर्वा. २ शिशुपाळ. ३ महत्काळ. ४ सकतपाळ. ५ जय. ६ विजय. ७ दुर्दया. ८ नकुळ. ९ शितज्या. शिंद्याचीं उपकुळें १२ असून तीन मिळत नाहींत.

५ सावंत:–१ कंबले. २ बाइंग. ३ गाताड. ४ विसाटे.

६ मोहिते:–१ कामरे. २ आचटे. ३ भारे. ४ धुधुळे. ५ कुलुंगडे.

७ चवाण:–१ धडम. २ वारंग. ३ दलपते. ४ हावळे. ५ रोठे. ६ रविंद.

८ इंगळे:–१ कनवजे. २ ठुकरुल.

९ ह्याडिक:—१ गवळी. २ भोईर. ३ आटोळे. ४ घावरे.

१० कदम:—१ बिरथ. २ बोढर. ३ बोराटे. ४ भिरसलगडे ५ खडपे. ६ कावळे.

११ माने:—१ देवमाने. २ राजमाने.

१२ काळे:—

१३ आंग्रे:—

१४ जाधव:—१ साठम. २ काटवटे. ३ अपराधे. ४ हगरे. ५ भोगसाठे. ६ शेवटे. ७ बोटावे. ८ पुढाळे.

१५ साळुंखे :–१ पाताडे, अथवा पाटोळे. २ वाघमारे. ३ सरपरे. ४ पडवळ. ५ झाड. ६ तांबे. ७ चंदनशीव. ८ ताकसे. ९ बावरे. १० मोरवे. ११ मोठे. १२ आतकारी. १३ साकळे. १४ सेवाळे.

१६ हंडे:—१ वानरे. २ सेडोळे. ३ वडावळे.

१७ कांकडे:—

१८ राणे:–१ दुधे. २ सिगवण.

१९ घाटगे:—

२० जगताप:—१ कांटे. २ कांशिदे. ३ दुबळे. ४ निमसे.

२१ चालुक्य अथवा चाळके:—१ नीळवर्ण.

२२ यादव:–१ घाग. २ जोगले. ३ जारे. ४ दळु. ५ जसवंत. ६ धुमक. ७ घोगले. ८ सिरगोरे. ९ अघोक. १० भोजक. ११ वघले. १२ अमृते. १३ सुहसेन. १४ चेद्दीन. १५ यागीत. १६ घोणे. १७ कुकुर. १८ कडलग.

२३ ढमढरे:—

२४ लाड:—

२५ जगदळे.:—

२६ ढवळे:—

२७ दाभाडे:—

२८ धुमालः—१ धुलप. २ धुले. ३ धुरे. ४ नागणे. ५ कासले. ६ आंवारे. ७ माळचिमणे. ८ जाळगुज. ९ वेसे.
२९ शेरातुः—
३० दलवीः—
३१ नलावडेः—१ नलगे. २ पारधे. ३ दाखे. ४ साबळे.
३२ पानसरेः—
३३ पिसाळः—
३४ मालपः—
३५ फाळकेः—
३६ आंगणेः—१ हिरवे. २ डवडे.
३७ सिसोदेः—१ जोसी. २ शिरसाठे. ३ खराटे. ४ चववारे.
३८ इचारेः—
३९ मालुसरेः—
४० तावडेः—१ सांगल. २ नामजादे. ३ जांबळे. ४ चिरफुले.
४१ मोरेः—१ कलपाते. २ आंबळे. ३ डुकरे.
४२ खैरः—
४३ बागवेः—१ दिवटे. २ बांडगे.
४४ राऊतः—
४५ रेणुसेः—
४६ वाघः—
४७ पांढरेः—
४८ भोगलेः—
४९ बागरावः—

५० भागवतः—
५१ मुळिकः—
५२ मुर्वेः—१ घाड. २ करपे. ३ लटके. ४ डोईफोडे. ५ काचरे.
५३ क्षिरसागरः—१ गोडे. २ चक्के. ३ सार्दुळ. ४ ढारे. ५ होके. ६ वाणखडे. ७ वावडे. ८ परवाळे.
५४ शितोळेः—
५५ ठाकुरः—
५६ शंखपाळ—शंकपाळ अथवा सकपाळः—१ अंबे. २ साटे. ३ पोळ. ४ पाणपटे. ५ राजहंस. ६ नलवट. ७ तातपुते. ८ चतुर.
५७ शिरकेः—१ बागवान. २ गावंड (गावडे). ३ ढोले. ४ मोकल. ५ कपाळे. ६ कोंबे.
५८ तुवारः—१ धावडे. २ तुर्ये. ३ तामटे. ४ बुलके.
५९ मधुरेः—
६० झांबरः—
६१ बांडेः—
६२ तेजेः—
६३ देवकांतेः—
६४ शेलारः—१ प्रतिहार. २ शेटगे. ३ शेलके. ४ गोरे. ५ कराळे. ६ विसई. ७ झात्रे. ८ कलनाथ.
६५ सांबारेः—
६६ फांकडेः—
६७ हरफळेः—

६८ निकम :—१ रणदिवेनिकम. २ नरखांबे. ३ गुंड. ४ भोजणे ५ अवताडे. ६ हाऊगे. ७ वणजारे.

६९ दरबारे:—

७० कोंकाटे:—

७१ ढेंकळे:—

७२ थोटे:—

७३ अहीर:—

७४ पारटे.—

७५ सालव अथवा साळवी:—१ सेदवळ.

७६ पालांडे:—

७७ फाटक:—

७८ जगधने:—

७९ धायबर:—

८० पिंगळे:—

८१ फडतरे:—

८२ भोंवारे:—

८३ रसाळ:—

८४ खडतरे:— १ जावळे.

८५ दाडे:—

८६ ढोणे:—

८७ निसाळ:—

८८ पाठारे:—

८९ बाबर:—

९० भोइटे:—
९१ गऱ्हाणे:—
९२ गवस :—१ आगलावे २ डांगरे.
९३ जालिंधरे:—
९४ ढमाले:—१ ढके. २ रेवाळे.
९५ पाळवे:—
९६ खंडागळे:—

## त्यांच्या पूर्वजांचें मूळचें स्थान कोंकण प्रांत किंवा दुसऱ्या कोणत्या देशाहून आलेले होते वगैरे ऐतिहासिक यथार्थ गोष्टी.

पौराणिक इतिहासावरून आणि महाराष्ट्र देशाच्या इतिहासावरून भंडारी लोकांचे पूर्वज मूळचे महाराष्ट्र देशांतले रहिवासी मराठे क्षत्रिय होते, याविषयीं कांहींएक शंका घ्यावयास नकोच, हें मागल्या प्रकरणावरून कळलें.

आतां हे मराठे क्षत्रिय कोंकणांत उतरण्याचें कारण असें आहे कीं, सन १२९५ त दिल्लीचा बादशाहा जलालुद्दीन याच्या कारकिर्दींत महाराष्ट्र देशांत मुसलमान लोक फार बंडावा करूं लागले. त्यावेळीं महाराष्ट्र देशांत त्यांशीं लढायाला कोणी बळकट राजा होता असें दिसत नाहीं. फक्त देवगडचा दौलताबादचा रामदेव जाधव यानें कांहींशी टक्कर मारिली, परंतु ती व्यर्थ जाऊन

शेवटीं मुसलमानांचेंच प्राबल्य झालें. त्यानंतर अल्लाउद्दीनास दिल्लीचें तक्त मिळाल्यावर त्याच्या कारकिर्दींत मुसलमानांनीं तीनदां दक्षिणेंत स्वाऱ्या केल्या, आणि महाराष्ट्र देशाचा बहुतेक भाग हस्तगत केला. आणि नर्मदेपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व मुलूख लुटून प्रजेस बहुत उपद्रव दिला. परंतु अल्लाउद्दीनाच्या म्हातारपणीं दिल्लीच्या राज्यांत अव्यवस्था झाल्यामुळें, दक्षिणेंत हिंदुराजांस सवड सांपडून त्यांनीं देवगड खेरीज करून वरकड सर्व प्रांत मुसलमानांपासून हिसकावून परत घेतले. याकाळीं हे मराठे लोक त्यांचीं बंडें मोडीत मोडीत गोमांतकापर्यंत येऊन तेथेंच कित्येकांनीं वास्तव्य केलें.* आणि कांहीं लोक आपल्या तरवारीच्या जोरावर पुढें उत्तर कोंकणांत सरसावले.

गोमांतकवासी मराठे क्षत्रियांत नागपूर इलाख्यांतील भंडारा† प्रांतांतील मराठे लोकांस दुसरा कांहीं धंदा रुचत नसल्याकारणानें माडांचा रस‡ काढून विक्रय करून त्यावरच निर्वाह करूं लागले. पुढें दिवसेंदिवस त्यांची वंशवृद्धि होऊन उत्तर कोंकणांत हळूहळू वसत गेले. त्यानंतर पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत तो

---

* गोमांतक प्रांतांतील मुळच्या रहिवासी लोकांनीं यांस आपल्या भाषेंत म्हटलें 'किता बंडारी ( भंडारी ) आलो' त्या 'बंडारी' शब्दाचा अपभ्रंश होऊन सर्व लोक त्यांस कित्तेभंडारी असें म्हणूं लागले.

† भंडारी हें नांव भंडारा प्रांतांतील मराठे लोकांस त्या प्रांतावरून पडलें असावें हें खचित् आहे.

‡ सरेकरी म्हणून कोंकणांत एक जात आहे. त्या जातीचा धंदा पूर्वी सरा ( सुरा ) विकण्याचा होता, त्यांचें कसब या लोकांनी घेतल्यामुळें ते हल्लीं दुसरे धंदे करूं लागले आहेत.

प्रांत गेल्यावर ते लोक बाटवूं लागले. ह्मणून कित्येक लोक पुढें सरसावून उत्तर आणि दक्षिण कोंकणांत लहान लहान मुसलमानांचे गांव होते तेथील लोकांस मोठ्या पराक्रमानें हांकून देऊन आपल्या वसाहती केल्या. त्यापैकीं ज्या कुळांस माडाचें कसब ठाऊक होतें त्या लोकांनीं पुळणीवर माड लाविले. आणि वरकड कुळें पेशवाईपर्यंत तरवारबहादूर होतीं, परंतु त्यांच्या दुर्दैवानें पुढें इंग्लिश राज्य झाल्यापासून ते शूर लोक शेतकीचा धंदा करून राहिले. त्यांचीं नांवें थोडकीं सांगतों तीं येणेंप्रमाणें :—शिर्के, विचारे, सुर्वे, मोहिते, सावंत, धुळप, मोरे इत्यादि.

उत्तर आणि दक्षिण कोंकणांत या लोकांनीं आपल्या बळानें गांवोगांवीं मुसलमानांशीं लढाया करून त्यांचें निर्मूळ केलें, त्याविषयीं हल्लीं कित्येक ठिकाणीं पिरांचीं थडगीं व त्यांच्या जुन्या मोडलेल्या मशिदी साक्ष देत आहेत.

पुढें दक्षिणकोंकणाच्या शेवटीं ह्मणजे मुंबईस भंडारी लोकांची वसाहत कशी व कोणत्या कारणानें झाली, याविषयीं मेहरबान मर्फीसाहेबानें प्राचीन बखरीवरून लिहिलें आहे तें "बोधसागर नामक मासिक पुस्तकावरून घेतलें आहे तें येणेंप्रमाणें:—

"मुंबईंत माडांची वृद्धि झाल्यामुळें भंडारी लोक आले असावे. मग या लोकांची येथें वस्ती वाढली, आणि चौल येथील भंडारी लोकांनीं त्यांचें सहाय्य केल्यामुळें मुसलमान लोकांचे सरदारांबरोबर त्यांनीं मोठी लढाई केली."

अल्लाउदिनानें दक्षिण घेतली, त्यावेळीं भीमराजानें माहीम येथें राज्यस्थापना केली.

१ ह्या इतिहासावरून या पुढील सिद्धांताचें अनुमान होतें कीं, इसवी सन १२९९ चे पूर्वीं मुंबईमध्यें कोळीलोक वसत, आणि ते येथील मुळस्थायक असावे असें दिसतें."

२ इसवी सन १२९९ वा मध्यें भीमराजानें मुंबई घेऊन तेथें बहुतकरून माड लाविले, त्यामुळें भंडारी लोक आले असावे."

३ "पाताणे परभू, पळसे, आणि पांचकळसे, हे भीमराजाचें संतान" त्यांस कोळीलोकांचा फार सहवास झाल्यामुळें त्यांची भाषा लागली.

४ "भीमराजानंतर जो राज्य करीत होता, त्यास चौलच्या सरदारांनीं पदच्युत केलें, ते सरदार त्या राजाचे सुत्दत्संबंधी नसले तर शेट्ये * उपनांवाचे असावे."

५ "चौलचे सरदारांचा मुसलमान लोकांनीं मोड केला."

६ "त्यानंतर माहीमचें राज्य भोंगले* लोकांनीं केलें, ते बहुतकरून भंडारी असावे, त्यांला राज्य प्राप्त झाल्यानंतर त्यांनीं आपलें भंडारी हें नांव टाकून भोंगले ह्मणवूं लागले."

"मुसलमान लोकांनीं फिरून भोंगले सरदारांचा मोड केला. नंतर जेव्हां फिरंगी लोक आले तेव्हां त्यांस भोंगले लोकांनीं मुसलमानांचा मोड करण्याकरितां मदत करीत असतां, त्यांस कांहीं राजाधिकार प्राप्त झाला, त्यामुळें सरकारी निशाण नेण्याचें किंवा शिंग वाजविण्याचे हक्क त्यांजकडे राहिले."

"याप्रमाणें इसवी सन १२९० पासून आजपर्यंत या पुढील जातींचें मुंबईंत प्राबल्य झालें."

---

* शेट्ये आणि भोंगले या वंशाचे आणि उपनांवाचे भंडारी उत्तर आणि दक्षिण कोंकणांत व मुंबईंत हल्लीं आहेत.

"१ कोळी. २ पाताणे परभू, पळसे, आणि पांचकळसे, ह्या तिन्हीं जातींचे पूर्वज. ३ चौलचे सरदार ज्यांचे जातीविषयीं बरोबर सिद्धांत होत नाहीं, ते वरील तीन जातींतील एक निराळीच जात असावी. ४ मुसलमान. ५ भंडारी अथवा भोंगले. ६ दुसरे वेळीं आलेले मुसलमान. ७ फिरून बहुतकरून भंडारी भोंगले. ८ फिरंगी. ९ इंग्रज.

# भंडारी लोकांस गोमांतक प्रांतांतील गांवांवरून पडलेलीं उपनांवें.

| गांवाचें नांव. | उपनांव. | गावाचें नांव. | उपनांव. |
|---|---|---|---|
| भटी | भाटकर. | बोरी | बोरकर. |
| सिरदन | सिरदनकर. | बांदिवडें | बांदिवडेंकर. |
| नेवरें | नेवरेंकर. | वेळयिणें | वेळनकर. |
| नारवें | नारवेंकर. | खेडें | खेडेंकर. |
| जुवें | जुवेंकर. | कुर्ल | कुर्लकर. |
| केळोशी | केळोसकर. | पाळडें | पाळडेंकर. |
| नागवें | नागवेंकर. | मयें | मयेंकर. |
| चिखली | चिखलकर. | गुळ्ळें | गुळेंकर. |
| आंबेली | आंबेलकर. | वांईंगिणी | वांईंगिणीकर. |
| कळंगूट | कळंगूटकर. | पेडणें | पेडणेंकर. |
| पिळेर्ण | पिळेर्णकर. | मांद्रें | मांद्रेंकर. |
| तिवरें | तिवरेंकर. | | |

इत्यादि.

# भंडारी लोकांचे देव.

या लोकांचे देव ह्मटले ह्मणजे मुख्य देव महादेव, आणि त्याचे अवतार भैरी–भैरोबा, खंडेराव, रवळनाथ, केदार इत्यादि; तसेंच पार्वती आणि तिचे अवतार, भवानी, चंडिका, काळिका, महाकाळी इत्यादि. यांच्या प्रत्येक गांवांत एक तरी भैरीभवानीचें देऊळ आहेच. आणि यांच्या घरच्या देव्हाऱ्यांत सदर्हु सांगितलेल्या देवांचें पंचायतन असतें. त्यांची पूजा करून धूप जाळतेवेळीं घंटा वाजवून "हरहर महादेव" असा उच्चार भक्तिपूर्वक नित्य करीत असतात. या लोकांत साकार देवांच्या भक्तीचें महात्म्य फारच वाढलें आहे. लग्नकार्यांत भवानीचा गोंधळ घालवीत असतात. बहुतकरून कोणी आजारी किंवा दुखण्यानें पिडीत झालेला असला तर त्याचे आप्तवर्ग देव्हाऱ्यांतील घरच्या देवास किंवा देवळांतील देवास नारळाचें फळ अर्पण करून रोगी मनुष्यास आरोग्य मागतात. या लोकांत निराकार परमेश्वराच्या भक्तीची गोडी विद्येच्या अभावामुळें मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. सारांश, एकंदर महाराष्ट्र देशांतील मराठे लोकांचीं जीं दैवतें तींच यांचीं आहेत. हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत, भक्तिविजय, भक्तलीलामृत, संतलीलामृत, इत्यादि प्राकृत ग्रंथ प्रेमळभावानें वाचितात, वाचवितात व ऐकतात, आणि त्यांची देवाप्रमाणें पूजा करून जतन नरून ठेवितात.

# भंडारी लोकांचा धर्म.

या लोकांचा धर्म वेदप्रतिपाद्य असून नामधारी ब्राह्मण त्यांकडून पौराणिक धर्म चालवितात. दररोज सकाळीं आंघोळ करणें, गंध लावणें, देवपूजा करणें, सोमवार, प्रदोष, एकादशी, संकष्टीचतुर्थी, शिवरात्र, आणि सर्व कामनीक व्रतें करितात, ब्राह्मणांस दानें देतात, तीर्थयात्रा करितात, चातुर्मासांत पोथ्या वाचणें अथवा ब्राह्मणांकडून वाचविणें इत्यादि प्रकारें पौराणिक धर्म आचरतात; याप्रमाणें धर्माचरण केलें ह्मणजे आपणांस स्वर्गप्राप्ति होते असें ते मानितात.

धर्म ह्मणजे काय? धर्म शब्दाचा अर्थ बहुतेक भंडारी लोकांस समजत नाहीं ह्मटलें तरी चालेल. याचें कारण असें आहे कीं, या लोकांत शेंकडा नव्वद लोक विद्याशून्य आहेत, पैकीं दहा कांहींशी विद्या शिकले आहेत, ते स्वार्थसाधु ब्राह्मणांच्या संगतीनें वर सांगितलेला पौराणिक धर्म आचरून आपलें सार्थक झालें असें मानून घेतात. परंतु जर विद्या शिकून विचार करूं लागतील, तर त्यांच्याच कुळांत जो यादवांचा (जाधवांचा) वंश, त्या वंशांतील कुळदीपक जो श्रीकृष्ण, ज्याला विष्णूचा अवतार असें ह्मणतात, तो आपल्या गीतेंत ह्मणतो कीं, "सर्वधर्मान् परित्यज्य, मामेकंशरणंव्रज" याचा अर्थ असा आहे कीं, सर्व धर्म सोडा, आणि मी जो एक परमेश्वर, त्या मला शरण या, आणि माझीच भक्ति करून मुक्ति पावा.

या जगांत आह्मी मनुष्यें जन्मास आलों आहों, त्या आह्मांस प्रत्येकास धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष या चार

पुरुषार्थावांचून गति नाहीं. जन्मापासून आईबापापाशीं योग्य प्रकारें वर्तणें, त्यांची आज्ञा पाळणें, पुढें लग्न झाल्यावर स्त्रिया पुरुषानीं, आईबापाजवळ मुलांनीं, राजाजवळ प्रजेनें, सासुजवळ सुनेनें, योग्य प्रकारें वर्तणूक करणें; या जगांत ज्या ज्या जीवासीं, ज्या ज्या व्यक्तीसीं, आह्मांस प्रसंग पडतील, त्या त्या वेळीं आह्मीं आपल्या कर्तव्याप्रमाणें, आपल्या शक्तीप्रमाणें, योग्यप्रकारें वर्तणें आणि एका परमेश्वराचें नित्य चिंतन करणें. यालाच धर्म असें ह्मणतात. आह्मी या जगांत जन्मास येऊन काय काय केलें पाहिजे याविषयीं एक कवी असें म्हणतो कीं;—

सत्कर्मयोगें वय घालवावें ॥
सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥

आणि श्रीकृष्णही याविषयीं काय ह्मणतो तें पहाः—

स्वधर्मे निधनं श्रेयः । परधर्मो भयावहः॥

याचा अर्थ, आपली शक्ति, आपलें कर्तव्य, आपला अधिकार, आपली योग्यता, जितकी आपल्या अंगीं असेल, त्याप्रमाणें मरणपर्यंत वर्तणूक ठेवून परमेश्वराची भक्ति करून मोक्ष साधून घ्यावा, हाच मुख्य धर्म आहे.

## भंडारी लोकांचा आचार.

या लोकांचा आचार क्षत्रियाप्रमाणेंच असावा, परंतु हे लोक काळाला अनुसरून आपला आचार ठेवूं लागले आहेत. कोणी लोक फार थोडी विद्या शिकून सरकारी वगैरे चाकऱ्या करूं लागले

आहेत, त्या लोकांत श्रेष्ठवर्णाच्या सहवासानें सोंवळीं वगैरे आचार चालू आहेत. परंतु बहुतकरून मोठा समुदाय सोंवळ्याशिवाय आणि शुचिर्भुतपणाशिवाय राहिला आहे, त्याचीं कारणें अनेक आहेत. एक तर या लोकांतील मोठ्या समुदायानें जो धंदा पत्करिला आहे, त्यामुळें क्षत्रियांचे आचार त्यांस चालवितां येत नाहींत. दुसरें ज्या देशांत हल्लीं या लोकांचें वास्तव्य आहे, त्या देशांत क्षत्रियांचे आचार चालवून या लोकांस आपली उपजीविका करितां येणार नाहीं. तिसरें हल्लीं इंग्रजी राज्यांत या लोकांस कायदेकानूनें जर्जर करून सोडिलें आहे, त्यामुळें योग्यप्रकारें आचारविचार राहूं शकत नाहींत. आचारविचार राहण्यास लोक सुखी असले पाहिजेत.

## भंडारी लोकांची व्यवहारीक रीतिभाती.

उत्तर आणि दक्षिण कोंकणांतील भंडारी लोकांची व्यवहारिक रीतभात ह्मटली ह्मणजे कोणत्याही संसारी व्यवहारांत आपल्या पोटाची व अन्नवस्त्रांचीच काळजी बाळगितात. इतर श्रेष्ठ वर्णांप्रमाणें हे लोक स्वार्थसाधु नाहींत. त्यांचा व्यवहार चांगला चालला तरी त्यांत ते एका वर्षाच्याच अन्नाची बेगमी करितात. शेतकी चांगली पिकली तर दुसरा धंदा न करितां तेंच अन्न खात घरीं बसतात. माडांच्या धंद्यांत उदरनिर्वाहाची सोय असली तर शेतकीकडे दुर्लक्ष्य झालेंच. प्रत्येक भंडारी आपल्या माडांचा रस दररोज निघत असेल तो विकून त्या रसावर आपल्या कुटुंबाचें पोषण होई इतका नफा मिळवितो; आणि कुटुंबाचा चरितार्थ

चालवितो. त्यामुळें ज्याच्या कुटुंबांत दोन तीन मनुष्यें असतात ती आपल्या माडांचा रस स्वस्त दरानें विकून त्याजवर निर्वाह करितो. आणि ज्याचें कुटुंब मोठें, त्याचा माल त्यास अधिक नफा पाहिजे, ह्मणून महाग विकावा लागतो, त्यामुळें त्याचा माल कोणी फारसें घेत नाहींत ; अशा रीतीनें मोठीं कुटुंबें संकटानें आपले दिवस काढितात. या लोकांच्या अंगीं इतर वर्णाप्रमाणें व्यापाऱ्यांच्या रीतीचा अभावच आहे. यांच्या माडांवर मुळीं देणें नव्हतें, त्यावेळची जी यांची धंदा करण्याची रीति, तीच पुढें प्रत्येक माडावर आठ आणे कर बसला तरी सारखीच राहिली. त्यानंतर एक रुपया, तीन रुपये, साहा रुपयेपर्यंत जरी कर बसला, तरी या लोकांची मुळची धंदा करण्याची रीति बदलली नाहीं. त्यामुळें त्यांच्या उदरनिर्वाहांत दिवसेंदिवस कमतरता होत चालल्यामुळें त्यांस देशोधडीं जाणें भाग पडलें. या गोष्टीचा दाखला ज्यांस पाहिजे असेल, त्यानें मुंबईच्या दाहा दाहा वर्षांच्या मनुष्यगणतीचीं पुस्तकें पाहिलीं ह्मणजे स्पष्ट समजेल. शेवटल्या मनुष्यगणतीवरून पाहिलें तर, दाहा वर्षांत पांच हजार भंडारी लोक उत्तर व दक्षिण कोंकणांतून पोट भरण्याकरितां मुंबईत आले. याप्रमाणें हे लोक व्यवहारिक रीतिभातींत दक्ष नसल्यामुळें घडून आलें.

## भंडारी लोकांचे अधिकार.

भंडारी लोकांत ज्यांस चांगले संस्कार झाले असतील, आणि जे विद्वान् आणि सुशिक्षित झाले असतील, त्यांस वेद शिकण्याचा अ-

धिकार आहे. ह्या लोकांतील कितीएक लोक आपल्या विद्येच्या बळावर, अकलेच्या जोरावर, आणि पराक्रमावर, मोठमोठे अधिकार व जोखमाचीं कामें आजपर्यंत करीत आले आहेत. राजे, सरदार, मानकरी, शिपाई, फौजदार, सुभेदार, डाक्तर, सराफ वगैरे राजकीय अधिकार चालवीत आले आहेत.

हल्लींही इंग्रजसरकारच्या कृपेनें वेदांचीं भाषांतरें झाल्यावरून, आणि प्रार्थनासमाज, आर्यसमाज स्थापन झाल्यापासून, या लोकांतील कितीएक विद्वान् गृहस्थ लग्नें, पूजा वगैरे स्वतां सांगतात व करितात. पेशवाईपासून हा वेळपर्यंत हे लोक ब्राह्मणांच्या अधिकाराखालीं वागत असत. परंतु आतां त्यांतील कितीएक विद्वान् गृहस्थ आपल्या जातीचे काय काय अधिकार आहेत ते पूर्ण समजून चालवीत आहेत.

## भंडारी लोकांची कर्में.

दोनशें वर्षांपूर्वीं यांचीं सर्व कर्में क्षत्रियांचींच होतीं. परंतु पोर्तुगीज, आणि पेशवे यांच्या पेंढारांत या लोकांस नारळीचा रस काढून तो विकून आपला निर्वाह करून घेण्याची वेळ आली होती ह्मणून हेंच आपलें कर्म आहे असें हे लोक समजत असत. तथापि इंग्लिश राज्यांत अबकारी कायद्यानें तें कर्म दिवसेंदिवस सुटत जाऊन, दुसरीं निरनिराळीं कर्में करून आतांचे लोक आपला निर्वाह चालवीत आहेत.

या लोकांचा बहुतेक भाग कृषिकर्म करून आपला चरितार्थ

चालवितो. ज्या लोकांस जमिनी नाहींत ते शिल्पकाम, कारकुना काम, इत्यादि कामें करून आपला निर्वाह चालवितात.

## भंडारी लोकांचा गुण.

या लोकांमध्यें राजभक्तीचा मुख्य गुण फारच वाढला आहे. राजाचे कायदे कानु कितीही कठीण असले, व त्या कायद्यानें आपला उपासमारा जरी होऊं लागला, तरी आपला राजभक्तीचा गुण सोडीत नाहींत, ही मोठी वर्णनीय गोष्ट आहे. एरवीं या लोकांचें रक्त शुद्ध क्षत्रियांचें असल्यामुळें, इतर श्रेष्ठ वर्णांची हे लोक पर्वा करीत नाहींत. शूरपणाविषयीं हे लोक आपणांस श्रेष्ठ मानितात. आपल्या राजकर्त्याप्रभूस या लोकांचा सहनशीलतेचा गुण लक्षावधि रुपयांची प्राप्ती करून देत आहे. परंतु सरकार त्यांच्या गुणांचा मोबदला त्यांस देशोधडीस पाठवून देत आहे.

भंडारी लोकांत स्वतंत्रतेनें उदरनिर्वाह करण्याचा गुण फार चांगला आहे. भिक्षा मागून खाणें, हें या लोकांत मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल.

## भंडारी लोकांची स्थिति.

भंडारी लोकांची उपजीविका ह्मटली ह्मणजे समुद्रापासून, जमिनीपासून आणि नारळीच्या झाडांपासून चालत होती. त्या तिन्ही गोष्टींवर इंग्रजसरकारानें दुःसह कर बसवून त्यांच्या उदरनिर्वाहाच्या धंद्यांचा अगदीं नाश करून टाकिला, त्यामुळें त्यांची स्थिति फार वाईट होत चालली आहे.

समुद्रापासून मीठ पिकविण्याची बंदी करून, भंडारी लोकांचे मिठागर बंद करून मिठावर जबर जकात बसवून, साखरप्रमाणे मीठ माहाग झाल्याकारणानें गरीब लोक अळणीं आहार खातात, तेणेंकरून एका प्रकारच्या रोगाचा उत्तर आणि दक्षिण कोंकणांत बराच फैलाव होत चालला आहे, यामुळें त्यांची स्थिति चांगली नाहीं.

जमिनीपासून निर्वाह करावा, तर भंडारी लोकांपाशीं जमिनी फार थोड्या आहेत; आणि त्याही खडकाळ असून त्यांत दाणा किती पिकेल याचा विचार न करितां पैमाषी खात्यांतील कामदारांनीं, कातळवट जमिनी गुरें चराईस न सोडितां, त्यावर दर एकरास दोन आणेप्रमाणें कर बसविला आहे. कोंकण प्रांतांत कितीही चांगला पाऊस पडला तरी धान्याची कमताई असते, ह्मणून प्राचीन लोकांनीं या देशाचें नांव "कोंकण" ह्मणजे क्वचित् कण, असें ठेविलें आहे. या शब्दाचा अर्थ इंग्रजसरकार आणि त्यांचे कामदार यांस समजला नसेल असें नाहीं, परंतु भंडारी लोकांचें दुर्दैव, त्याला त्यांनीं तरी काय करावें? निरुपायामुळें त्यांची स्थिति वाईट होत चालली आहे.

समुद्रकिनाऱ्यावरील पुळणीच्या ढिगांवर नारळीचीं झाडें लावून, तेथेंच आपलीं घरें बांधून राहिलेल्या लोकांनीं त्या झाडांचा रस काढून, कुळवाडी, खारवी, दालदी इत्यादि गरीब लोकांस त्यांचा शीणभाग हरविण्याकरीतां, तो रस स्वस्थ विकून त्याचे मोबदला उपजीविकेचे पदार्थ किंवा पैसे घेऊन, ते आपलें पोट आणि सरकारी धारा यांची भर करीत असत; तें आतां जबर कर बसल्यामुळें बंद

होऊन भंडारी लोकांवर मोठें संकट येऊन पडलें आहे. इत्यादि गोष्टींचा शोध सरकारी अमलदार गांवगन्ना फिरून भंडारी लोकांची कशी काय स्थिति आहे, ती पाहातील तर बरें होईल; परंतु ते पाहातील कशाला! अबकारी कमिशनर आणि कलेकटर साहेब स्वारीस फिरावयास निघाले तर जेथें चांगलें पाणी, हवा, आणि सोय असेल तेथेंच फिरावयाचे! लक्षावधि भंडारी लोक उपाशीं मेले तर त्यांचें काय गेलें !!!

मामलेदार आपापल्या तालुक्यांत फिरावयास निघतात, तेही आपल्या जेवणाखाण्याच्या सोई जेथें चांगल्या होतील तेथेंच मुक्काम करितात. ते जर प्रत्येक गांवीं जाऊन तेथील पोलिसपाटलाचे मार्फत सर्व गांवकऱ्यांस आपले भेटीस बलावून त्यांचीं सुखदुःखें ऐकून घेतील, आणि त्याप्रमाणें बारकाईनें शोध करितील, तर त्यांची खात्री होऊन ते सरकारास रिपोर्ट केल्यावांचून कधींही रहावयाचे नाहींत. तसेंच ज्या करापासून रयत बेजार होत चालली आहे, तशा प्रकारचे कर कमी करण्याविषयीं जर ते कलेकटर साहेबांची खात्री करून देतील, आणि कलेकटर साहेब कमिशनरांस लिहून कळवितील, व कमिशनर वरिष्ठ सरकारास कळवून योग्य बंदोबस्त करून रयतेस जितका कर सोसण्याची शक्ति असेल तितकाच कर बसवितील, तर प्रजेचा योग्य बचाव आणि सरकारची सुकीर्ति होईल; परंतु या सर्व गोष्टी केव्हां होतील कीं जेव्हां कित्येक मामलेदार आपापल्या बढतीची आशा न धरितां देशकल्याणाची आशा बाळगून स्वतंत्रतेनें सरकार आणि रयत यांचें योग्य हित करतील तेव्हां.

आंतील कंगाल अवस्था झांकून बाहेरून हुशारी दाखवावी असा समज पडून गेल्यामुळें भंडारी लोकांस गळ्याइतकें पाणी होई-पर्यंत धंदा न सोडण्याचीं जीं खरीं कारणें आहेत तीं येणेंप्रमाणेः-

१ ज्या जातीचा जो धंदा तो त्या जातीला धर्मरूप आहे, अशा हिंदुशास्त्राच्या प्रसिद्ध मतास अनुसरून, भंडारी लोकांची प्रवृत्ति याच धंद्यांत पडून, अभ्यासानें त्यांस तो सोपा झाला आहे; ह्मणून सहसा हा धंदा त्यांस सोडावासा वाटत नाहीं.

२ आपत्काळांत दुसऱ्याचा धंदा करण्यास हरकत नाहीं, असें-ही धर्मशास्त्राचें मत आहे, त्याप्रमाणें सांप्रत कित्येक तरुण भंडारी लोक हळुहळु इतर धंद्यास लागत चालले आहेत, परंतु एकदम जातीच्या मोठ्या समुदायास दुसऱ्या धंद्यांत शिरायास जागा होत नाहीं; व आपला धंदा त्यांच्यानें सोडवत नाहीं.

३ शेतकी अधिक करावी, तर भंडारी लोकांपाशीं शेताची जमीन कमी असून ती अशा प्रतीची आहे कीं, कितीही कष्टानें ती कशिली तरी तिजपासून धारा वारून कुटुंबाचा चरितार्थ चालण्या पुरतें उत्पन्न होत नाहीं; ह्मणून माडांचा धंदा करावा लागतो.

४ चवथें कारण असें आहे कीं, ज्या भूभीवर भंडारी आपल्या आप्तजनांसहित वंशपरंपरेनें नांदत आले, उपजीविकेच्या पुढील आशेवर मोठ्या मेहनतीनें व खर्चानें जमिनी तयार करून लागव-डीस आणिल्या, नारळीचीं झाडें लावून बागाइतास डोईनें पाणी आणून घातलें, गांव वसाविले, आणि संरक्षणकर्त्या सरकारास वाजवी कर भरीत आले, असें जें त्यांचें वडिलोपार्जित वतन किंवा प्रिय जन्मभूमि. ती सोडावयास त्यांस फार दुःख वाटतें, हें स्वाभा-

सन १८८० च्या मनुष्यगणतीच्या पत्रकावरून मिळविली आहे. हा मोठा समुदाय बहुतकरून नारळीच्या झाडांवर निर्वाह करीत असे. कोणी माड वाहून त्यांचा रस काढून विकीत; कोणी दारुचीं दुकानें घालून नेमस्त दरानें दारू विकून मोठ्या नफ्याची आशा न धरितां आपल्या चरितार्थापुरता नफा घेऊन आपलें पोट भरीत असत, आणि त्यांच्या स्त्रिया व पुरुष याच धंद्यांत निमग्न राहून आपलीं पोटें भरीत असत. परंतु सरकारानें नेमलेले अबकारी कमिशनर, अथवा कलेकटर लोक अबकारी खात्याची जमाबंदी वाढविण्यासाठीं, आणि सरकारांत आपली बढती होण्यासाठीं, ज्या नारळीच्या झाडास पूर्वीं चार आणे कर होता, त्या प्रत्येक झाडास हल्लीं दीड रुपयावर कर बसविला आहे. जोंपर्यंत या लोकांची शक्ति होती, तोंपर्यंत या लोकांनीं धंदा सोडिला नाहीं. परंतु बहुतेकांनीं हा धंदा सोडून देण्याचें मनावर घेऊन, यांतील कितीएकांनीं बिगारकामें व कितीएकांनीं चिठीचपाटी नेण्याची शिपाईगिरी पत्करून, जेमतेम आपला आणि आपल्या कुटुंबाचा निर्वाह करीत आहेत.

याप्रकारें मुंबईतील भंडारी लोकांच्या मोठ्या समुदायाची अबकारी कायद्यानें निकृष्ठ स्थिति करून सोडिली आहे. तिचें निवारण परमेश्वराच्या प्रेरणेनें इंग्रज सरकार करील तेव्हां खरें.

## भंडारी कोणत्या वर्णांत मोडतात तें.

आतांच्या शाळाखात्यांतील इयत्तेचे वर्गासारिखे जातीचे नियम असते तर योग्य मनुष्य खालच्या वर्गांतून वरच्या जातीवर्गांत चढायास द्वार झालें असतें. व अशानें लोकांस उत्तम गुण

विक आहे. अशा कारणामुळें धंद्यावांचून त्यांस दुसरी गति राहिली नाहीं. ह्मणूनच त्यांनीं अनन्यगतिक होऊन या धंद्याचा नाश न होण्याचा लोभ धरून त्यास चिकटून लोंबत राहिले आहेत. कारण कीं, धंदा सुटला ह्मणजे त्यांस जन्मभूमि अंतरली, ती अंतरल्यावर मग त्यांची देशांतरी दाणादाण होऊन देशपार केल्याच्या दंडासारिखें संकट पडण्याचें भय त्यांस वाटतें.

आतां देशाची जमाबंदी सुधारण्याचा न्यायी मार्ग ह्मटला ह्मणजे प्रथम रयतेच्या संसारिक स्थितीची सुधारणा झाली पाहिजे, असें सरकारचेंही मत आहे. त्याप्रमाणें भंडाऱ्यांच्या स्थितिविषयीं विचार करून पाहणें सरकारास उचित आहे. भंडारी लोक जो माल उत्पन्न करितात, तो न घेतल्यानें कोणी उपाशी मरत नाहींत. ज्या थोड्या लोकांस त्याची गरज पडते, त्यांस महाग मिळूं लागल्यास सामर्थ्य नसल्यामुळें त्यांच्यानेंही घेववत नाहीं. तात्पर्य,—विकणारे आणि घेणारे दोन्ही निकृष्ट स्थितींतले लोक असले ह्मणजे सुविचारी सरकारानें त्यांजवर जबर कर बसविण्यांत डोळेझांक करणें योग्य नाहीं. याप्रमाणें मोठा कर पत्करून व हाल सोसून धंदा धरून राहण्याचीं कारणें आहेत.

सदर्हुप्रमाणें उत्तर आणि दक्षिण कोंकणांतील भंडारी लोकांची स्थिति आहे.

मुंबईतील भंडारी लोकांची स्थिति ह्मटली ह्मणजे, जे कोणी चांगली विद्या शिकून कारकुनीच्या नोकरीवर आहेत, तेच आपलें पोट भरून सुखी आहेत, परंतु मुंबईंतील भंडारी लोकांचा मोठा समुदाय स्त्रिया व पुरुष मिळून एकंदर २७,७२८ आहे, ही संख्या

सन १८८० च्या मनुष्यगणतीच्या पत्रकावरून मिळविली आहे. हा मोठा समुदाय बहुतकरून नारळीच्या झाडांवर निर्वाह करीत असे. कोणी माड वाहून त्यांचा रस काढून विकीत; कोणी दारुचीं दुकानें घालून नेमस्त दरानें दारू विकून मोठ्या नफ्याची आशा न धरितां आपल्या चरितार्थापुरता नफा घेऊन आपलें पोट भरीत असत, आणि त्यांच्या स्त्रिया व पुरुष याच धंद्यांत निमग्न राहून आपलीं पोटें भरीत असत. परंतु सरकारानें नेमलेले अबकारी कमिशनर, अथवा कलेकटर लोक अबकारी खात्याची जमाबंदी वाढविण्यासाठीं, आणि सरकारांत आपली बढती होण्यासाठीं, ज्या नारळीच्या झाडास पूर्वीं चार आणे कर होता, त्या प्रत्येक झाडास हल्लीं दीड रुपयावर कर बसविला आहे. जोंपर्यंत या लोकांची शक्ति होती, तोंपर्यंत या लोकांनीं धंदा सोडिला नाहीं. परंतु बहुतेकांनीं हा धंदा सोडून देण्याचें मनावर घेऊन, यांतील कितीएकांनीं बिगारकामें व कितीएकांनीं चिठीचपाटी नेण्याची शिपाईगिरी पत्करून, जेमतेम आपला आणि आपल्या कुटुंबाचा निर्वाह करीत आहेत.

याप्रकारें मुंबईतील भंडारी लोकांच्या मोठ्या समुदायाची अबकारी कायद्यानें निकृष्ठ स्थिति करून सोडिली आहे. तिचें निवारण परमेश्वराच्या प्रेरणेनें इंग्रज सरकार करील तेव्हां खरें.

## भंडारी कोणत्या वर्णांत मोडतात तें.

आतांच्या शाळाखात्यांतील इयत्तेचे वर्गांसारिखे जातीचे नियम असते तर योग्य मनुष्य खालच्या वर्गांतून वरच्या जातीवर्गांत चढायास द्वार झालें असतें, व अशानें लोकांस उत्तम गुण

संपादण्यास प्रोत्साहनही मिळालें असतें. पृथ्वींतील उत्कर्ष पावलेल्या राष्ट्रांत अशा जातीच्या प्रती आहेत. परंतु चालू प्रकारानें खालच्या वर्गांतील लोकांनीं चिरकाल वंशपरंपरेनें खालच्या वर्गांतच राहावें, व कदाचित् खालच्या जातींतील मनुष्यांस वरची पायरी घेण्याची शक्ति झाली तर त्यानें तादृश प्रयत्न करूनच वर्गांतल्या वरच्या नंबराप्रमाणें आपले जातीवर्गांत राहून वरल्या स्थितीचा नंबर घ्यावा. त्यानें वरच्या जातीवर्गांत त्याची केवढीही योग्यता असली तरी चढायाची या जन्मांत आशा करूं नये, असें प्राप्त करून ठेविलें आहे. यावरून खालच्या वर्णाच्या लोकांस हलकेपणाचें वैषम्य वाटेल तर श्रीकृष्ण भगवानानें ज्या कर्मांवरून जाती मानिल्या आहेत, त्या कर्मांसच धर्म मानून आपला धर्म कितीही दोषी असला तरी तोच आचरावा. त्यांत कल्याण आहे. आपल्या धर्मांत मरण बरें. आणि परधर्म कितीही चांगला असला तरी तो भयावह आहे, असें भगवद्गीतेंत समाधान केलें आहें. तेव्हां खालच्या जातीस गत्यंतर नाहींसें होऊन तसाच निर्वाह करणें प्राप्त झालें आहे. जरी जाती आणि स्थिति निराळे अर्थ आहेत, तरी त्या अर्थांचा परस्पर बहुतांशीं संबंध दिसून येतो. जसें उंच वर्णाचे लोकांची स्थिति बहुधा उंच, व हलके वर्णाची अवस्था बहुधा निकृष्ट असें उघड दृष्टीस पडतें.

क्षत्रियांचीं जीं शाण्णवकुळें, त्यांतील कांहीं कुळांपैकीं मुसलमानांचीं बंडें मोडीत मोडीत जे क्षत्रिय गोमांतकांत उतरून, त्यांतील ज्या लोकांनीं नारळीच्या झाडांचा धंदा पत्करला, त्या लोकांस 'भंडारी' हें नांव पडण्याचें कारण, नागपूर इलाख्यांत 'भंडारा'

ह्मणून जो प्रांत आहे, त्यांतील क्षत्रियांनीं एकमतानें हा माडांचा धंदा पत्कारला. त्यावेळीं गोमांतकवासी लोकांनीं, या लोकांस आपल्या भाषेंत "कितां भंडारी आले" ह्मणून ह्मणूं लागले, त्यावरून या लोकांस त्या शब्दाचा "ता" अक्षराचा अपभ्रंश होऊन "त्ते किंवा त्ता" अक्षर पडलें असावें. या लोकांस अलिकडेस "कित्ते भंडारी" हें नांव पडलें आहे; वस्तुतः हे खरे क्षत्रिय आहेत. याविषयीं पुष्कळ प्रमाणें आहेत. त्यापैकीं एक प्रमाण असें आहे कीं, या लोकांतील मनुष्य मेलें ह्मणजे कामठाचें तिकटें करून, त्यावर तें मेलेलें मनुष्य उताणें निजवितात. भारतांत ज्या प्रमाणें भीष्मास अर्जुनानें शरपंजरीं निजविलें होतें, त्याप्रमाणें यांच्या प्रेताचा विधि होत असतो.

मुसलमानी राज्य मोडल्यानंतरही या लोकांनीं आपला शूरपणा सोडिला नाहीं. तमाम कोंकणपट्टींत ठिकाणोठिकाणीं मुसलमानांचे गांव वसले होते, त्यांस मराठ्यांच्या साह्यानें या लोकांनीं निर्मूळ करून मराठे व हे लोक त्या त्या गांवांचे जमिनदार होऊन राहिले. यांत नवल इतकेंच झालें कीं, मराठे लोकांनीं वरच्या जागा बळकाविल्या व या लोकांनीं समुद्रकांठचे पुळणीचे ढीग नारळीच्या झाडांची लागवड करण्याकरितां घेऊन तेथेंच आपलीं घरें बांधून राहिले. त्यावेळेपासूनच या लोकांनीं शिपाइगिरीचीं व लष्कराचीं कामें पतकरिलीं आहेत.

जंजिऱ्याच्या हप्श्याच्या लष्करांत हेच लोक बहुतकरून आहेत. उत्तर व दक्षिण कोंकणांत रत्नागिरी वगैरे जिल्ह्यांत कांहीं भंडारी लोक शिबंदी खात्यांत अद्यापपर्यंत शिपाईगिरीचीं कामें कारितात.

आंग्र्याच्या राज्यांत आरमारखात्यांत या लोकांचाच भरणा असे.

इंग्रज सरकारानें हत्यारांचा कायदा चालू केला त्या वेळेपर्यंत क्षत्रियांचीं शूरत्वाचीं सर्व प्रकारचीं हत्यारें या लोकांपाशीं होतीं.

या लोकांच्या आंगीं क्षत्रियांचें रक्त कसें आहे, त्याचा अनुभव ज्या ज्या गांवांत हल्लीं ते राहातात, त्या त्या गांवांतील अन्य जातींबरोबर यांची वर्तणूक शूरत्वाचीच नजरेस येते. यांतील अशिक्षीत लोक आपणाखेरीज अन्य जातीस हलकट व नीच शब्दांचीं विशेषणें देत असतात! तीं येणें प्रमाणें :—

ब्राह्मण लोकांस "भटगे" कुळवाडी लोकांस "कुणबट" खारवी लोकांस "खारकांडे" इत्यादि प्रकारें अन्य जातींची निर्भत्सना करीत असतात.

क्षत्रिय या शब्दाचा अर्थ क्षत्र ह्मणजे जमीन व तिचा जो मालक तो क्षत्रिय. त्या जमिनीच्या वांटणीवरून किंवा गांवाच्या सिमेवरून हे लोक एका गट्टीनें एकत्र मिळून, मोठमोठ्या मारामाऱ्या केल्याचे दाखले इंग्रजसरकारच्या मामलेदारी दप्तरांत हजारों सांपडतील. येणेंप्रमाणें शूरत्वाचीं जीं जीं कामें क्षत्रियांस पाहिजेत, तीं तीं या लोकांत आजपर्यंत वास करीत आहेत, यावरून हे क्षत्रियांत मोडतात हें निर्विवाद आहे.

## भंडारी लोकांचे पराक्रम.

पेशव्यांच्या राज्यांत आरमार खात्यांत दामाजी कुवेसकर या नांवाचा एक सरदार असे. त्याची परिक्षा व शूरत्व पाहण्यासाठीं

पेशव्यांचे जे मुख्य दिवाण नानाफडनवीस यांनीं त्यांस पुण्यास बोलाविलें, त्यावेळीं तो सरदार आपल्या खासगी मंडळीसुद्धां पंचहत्यारें भिडून पुण्यास गेला, आणि पुण्याच्या बाहेर आपला डेरा दिला. दुसऱ्या दिवशीं पहाटेस शौचाविधि करण्याकरितां तो शूर सरदार दामाजी कुवेसकर आंगावर धोतर घेऊन, हातांत पितळेचा गडवा आहे, अशा स्थितींत शौचविधि आटपून आपल्या डेऱ्याकडे येत असतां, नानाफडनवीसानें एका जबरदस्त हत्तीच्या महातास सांगून ठेविल्यावरून तो हत्ती दामाजीच्या आंगावर जाण्याकरितां पिसळाऊन सोडिला, आणि आपण त्याची मजा पाहात तेथेंच उभा राहिला. इकडे मस्त झालेला हत्ती आपल्या आंगावर येत आहे, असें जेव्हां दामाजीनें पाहिलें; तेव्हां महातास मोठ्यानें हांका मारून हत्तीस आवरायास सांगितलें, परंतु महाताचें कपट जाणून आणि हत्ती आंगावर येत आहे असें पाहून, आतां हा हत्ती आपला प्राण घेईल अशी पूर्ण खात्री करून, आंगावरील धोतर कंबरेस गुंडाळून, हातांतील गडवा मजबूत धरून आपली उडी हत्तीच्या मस्तकावर जाईल इतक्या अंतरावर हत्तीला जवळ येऊं दिलें, आणि लागलेंच उड्डाण साधून, हत्तीच्या मस्तकावर चढून, हातांतील पितळेच्या गडव्याचा जबरदस्त प्रहार त्याच्या ताळूवर मारून, हत्तीच्या मेंदूची कवटी फोडून टाकिली; त्यासरसा हत्ती मोठ्यानें किंकाळी फोडून, गतःप्राण भूमीवर निचेष्टीत पडला. त्यानंतर दामाजी कुवेसकरानें हत्तीवरून उतरून महाताच्या आंगावर चाल केली. त्यावेळीं महात शरण येऊन ह्मणूं लागला कीं, श्रीमंत नानाफडनविसांनीं आपलें शूरत्व पाहण्या-

करितां त्यांच्या हुकुमावरून मी हा हत्ती तुमच्या आंगावर सोडिला. हें मजपाशीं त्यांच्या हातचें पत्र आहे तें घ्या, आणि वाचून आपली खात्री करून पाहा, हें ऐकून दामाजी आपल्या डेऱ्यांत जाऊन, नानाफडनवीसास पत्र लिहून कळविलें कीं, आपणांस माझी परिक्षा आणखी पाहणं असेल तर, शेंपन्नास हत्याखंद शूर शिपाई मज एकट्यावर पाठवा. आणि त्यांत माझा विशेष पराक्रम पाहणें असेल तर पाहा. अशा प्रकारचें दामाजीचें पत्र वाचून, नानाफडनविसानें त्यास आपल्या दरबारांत मोठ्या थाटानें बोलावून, शिरपाव बक्षीस देऊन, आंग्र्याकडे रवाना करून दिलें, अशी दंतकथा आहे.

शिवछत्रपतीच्या कारकीर्दींत समुद्रावरील आरमार खात्यांत भंडारी लोक अग्रगण्य असत. स्वतः शिवछत्रपतीनें मायनाख नांवाच्या भंडाऱ्याच्या ताब्यांत आपलें सर्व आरमार दिलें होतें.

भंडारी लोकांच्या पूर्वजांनीं मुंबईमध्यें सरकारी पोलीस खात्यांत व लष्करी खात्यांत चांगली चाकरी केल्याबद्दल, व त्यांनीं मुंबई शहर इच लोकांच्या हल्ल्यापासून राखल्याबद्दल सन १६५७ मध्यें त्यांनां दारू काढण्याकरितां व विकण्याकरितां सरकारांतून फुकट परवाना मिळत असे.

## भंडारी लोकांचा संभवनीय आणि खरा वृत्तांत.

पुष्कळ काळामागें हिंदुस्थानांतून रजपूत लोकांचीं बहुत कुळें महाराष्ट्र देशांत येऊन राहिलीं. दीर्घकाळ या देशच्या सहवा-

सानें त्यांचा मूळचा आचार, वेष, भाषा रीति इत्यादि व्यवहार मराठी लोकांप्रमाणेंच झाले. व त्या लोकांसही मराठे असें नांव पडलें. हिंदुस्थानांत रजपुत लोकांच्या नांवापुढें 'सिंघ' ह्मणजे सिंह असा प्रतिष्ठित शब्द लागत असतो. त्याच्याबद्दल अस्सल मराठे लोकांच्या नांवापुढें या देशांत मानवाचक (राव) ह्मणजे राजा, हा शब्द लागतो. असो, यांत वऱ्हाड, नागपूर, भंडारा इत्यादि प्रांतांतील रजपूत मराठ्यांचीं कुळें होतीं. या सर्व लोकांचा धंदा मुख्यत्वें लढाई करण्याचा होता. परंतु जेव्हां लढाई नसे, व सर्वांचाच त्या धंद्यांत निर्वाह होईना, तेव्हां त्यांस दुसरे अनेक प्रकारचे उद्योग करावे लागत. तेसमयीं त्यांत जे भंडारा प्रांतांतिल मराठे लोक होते, त्यांनीं प्रथम कोंकणांत उतरून गोमांतक प्रांतीं वसती केली. त्यांची मराठी भाषा, रीतभात, त्या प्रांताप्रमाणें झाली. त्यांतील कितीएकांनीं शेतकीचा धंदा धरिला. कोणी स्वतः गलबतें वापरूं लागले. कांहीं लोक मीठ पिकवूं लागले. कित्येकांनीं समुद्रांत जाहाजांतुन व जमिनीवर युद्ध करण्याची चाकरी धरिली. कोणी क्वचित् गुरवकी किंवा भोपीपणा ह्मणजे ग्रामदेवतांच्या पुजाऱ्यांचीं कामें पतकरिलीं. आणि मोठ्या समुदायानें तेथें आपल्या वस्तीच्या गांवांत नारळीचे बाग करून नारळ, नारळीचा रस व सरा* किंवा मद्य विकून त्यावर ते गुजराण करूं लागले. यांच्यापूर्वीं गोमांतकांत हा माडांचा धंदा दुसरे कोणी लोक करीत होते कीं

* 'सरा' हा शब्द संस्कृत 'सुरा' या शब्दाचा अपभ्रंश, अथवा पार्शी 'शराब' शब्दापासून झाला असावा.

नव्हते आणि करीत असल्यास त्यांच्या जातीचें नांव काय होतें तें ठाऊक नाहीं. असो, याप्रमाणें त्यांनीं उदरनिर्वाहार्थ अनेक प्रकारचे उद्योग धरिले, तरी ते आपल्या सर्व प्रांतस्थ स्वजातीयांस भंडारी असें ह्मणवीत आले. या लोकांस 'भंडारी' असें नांव त्यांच्या कोणत्यातरी कामावरून पडलें असेल असें जर ह्मणावें, तर त्यांचा कोणताही धंदा 'भंडार' अथवा 'भंडारा' या नांवाचा नाहीं; व त्यांतील जे कांहीं लोक हा धंदा करीत नव्हते; त्यांसही हें नांव होतें. तस्मात् भंडारी हें नांव त्यांच्या मुळच्या प्रांतावरून पडलें असावें असें दिसतें. हे भंडारा प्रांतांतील भंडारी लोक, रजपूत कुळांतील मराठे असून, जेव्हां गोमांतकांत प्रथमच येऊन, पुष्कळ जण मिळून मुख्यत्वें नारळीचा धंदा करूं लागले, तेव्हां त्यांचें प्रांतसंबंधीं जें 'भंडारी' नांव होतें, तें माड वाहण्याच्या धंद्यासंबंधीं होऊन, माड वाहणार जातीस पडलें. त्यावरून हल्लीं जो माड वाहतो, तो दुसऱ्या कोणत्याही जातीचा असला, तरी त्यास भंडारी ह्मणण्याची चाल आहे. याप्रमाणें गैरमाहितीनें सांप्रत धंद्यावरून, एका जातीचें नांव दुसरे जातीस देण्याची चाल प्रसिद्ध आहे. कसेंही असो, परंतु सध्यां माड वाहणाऱ्या जातीस कोंकण प्रांतांत भंडारी ह्मणतात ही गोष्ट निर्विवाद आहे.

हे लोक बांध्यानें सुदृढ, सुरेख, साहसी, गोमांतकवासी झाल्यावर यांची अवस्था जरी चांगली नव्हती तरी स्वभावानें मूळचेच उद्दाम होते. उद्दाम असून आपल्या धंद्याशिवाय इतर बहुत गोष्टींविषयीं हे अज्ञान व भोळेभाविक असत. या लोकांस

विद्येची अभिरुचि नव्हती. ब्राह्मण सांगतील तें त्यांचें शास्त्र, ब्राह्मणांवर त्यांचा विश्वास, तेथील ब्राह्मणांस हे फार मान देत असत. व तेही यांच्याशीं सलुख्यानें वागत. माडांच्या धंद्यांत दोष आहे असें श्रेष्ठलोकांनीं सांगितल्यावरून, आपलीं जानवीं या दोषांनीं दुषित होऊन निरुपयोगीं झालीं असें समजून, या भोळेलोकांनीं तीं पुनः कोणत्याही दोषास दुपित करायास सांपडत, अशा अज्ञातस्थानीं पाठवून दिलीं. तात्पर्य जानव्यांचा त्याग केला. आणि आपलें पोट भरण्यास ज्यावांचून दुसरें पुरतें साधन नाहीं, असा जो आपला रोजचा जिवावरला हाडेंमोड माडांचा अपवित्र धंदा, तोही सोडायास सिद्ध झाले. परंतु वरिष्ठ लोकांनीं पुनः अशी समजूत दिली कीं, हा धंदा बहुत काळ चालवीत आलां ह्मणून तुह्मांला धर्मरूप झाला आहे. याशिवाय तुह्मांला गत्यंतर नाहीं. यास्तव हा जरी दोषयुक्त आहे, तरी यांतच आपलें कल्याण समजून मरावें हें बरें. दुसऱ्याचा धंदा कितीही निर्दोष असला, तरी तो भयंकर जाणून कधींही धरूं नये. असा उपदेश ऐकिल्यावरून तो धंदा धरून राहिले. यांत सुयेर व सुतक आणि लग्नादि मंगलकार्य संस्काराचे विधि व अंत्येष्टीचे विधि सोपे, संक्षिप्त आणि थोडे असून ब्राह्मण उपाध्ये ते पुराणोक्त चालवूं लागले. त्याविषयीं यांस पर्वा नव्हती. पूजा संकल्प किंवा लग्नांत ब्राह्मण जीं मंगळाष्टकें ह्मणतात ते वेदमंत्र ह्मणतात. शुद्र ह्मणजे चांगले शुद्ध लोक असा बहुतेक लोकांचा अजून समज आहे. अधिकाऱ्यानें सांगितलेलें नीच कामही करून घरांतील झाडलोट करणें, भांडीं घांसणें, यजमाना-

चीं वस्त्रें धुणें, पाणी भरणें, खरकटें काढून शेण लावणें, इत्यादि बरचाकरीचीं कामें शुद्र जातींत होतात तशीं, स्वजातीकडे किंवा परजातीकडे चाकरीस राहून हे लोक कदापि करीत नसत. व स्वजातीचे लोक असलें काम स्वजातीच्या लोकांस सांगतही नसत. जातीच्या दाराशीं भीक मागेन पण असलें नीच काम करणार नाहीं. ह्मणजे जातीसाठीं माती खाईन. उपाशी मरेन, जातीचे जोडे उचलीन, जातीचें लेंकरूं हाडानें चोख राहील.

गोमांतकांत येऊन ते आपली मराठी क्षत्रिय जात विसरले पण देशसंबंधी भंडारी जात व राजवंशीय कुळें विसरले नाहींत. शाण्णवकुळी नामें पोथी या लोकांत प्रसिद्ध आहे. व बहुतांच्या संग्रहीं आहे. यांचीं कुळें वगैरे बहुतेक मराठ्यांच्या कुळांशीं बरोबर मिळतात. हें यांच्या पुरातन क्षत्रिय वर्णाचें मोठें प्रमाण आहे. या लोकांस विद्येची अभिरुचि नव्हती, ह्मणून यांत कोणी विद्वान झालेले ऐकिवांत नाहीं. भयंकर लढाईच्या गोष्टी ऐकायास यांला बरें वाटतें; ह्मणून ते तसले ग्रंथ दुसऱ्यापासून ऐकून घेत. हे जुन्या काळच्या लढाईच्या कसरतीची करमणूक व अभ्यास करीत असत. श्रीमहादेव पार्वती हें त्यांचें मुख्य दैवत. ह्मणून त्यांचे अंश जे भैरवनाथ, केदारनाथ, रवळनाथ खंडेश्वरप्रभृती देव व दुर्गा, भवानी, चंडिका, कालिका, या. आदिकरून नांवाच्या देवी, हीं आपलीं कुळदैवतें मानून असत. फुरसतीच्या वेळांत कित्येक भाविक वृद्ध लोकांस ...गप्रयुक्त वेदांत व हरिहरकथा ऐकण्याची फार गोडी होती.

नि. २४
इ.नं २४०३ K.L. Chhoribai

ग्रंथ संग्रहालय ठाणे.

# विचारमाला

अथवा

## सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी.

हें पुस्तक

विश्वनाथ बाळजोशी शास्त्री नाशिककर

यांनीं लिहिलें

तें

वासुदेव मोरेश्वर पोतदार

यांनीं

मुंबईंत " जॉइन्ट-स्टॉक " छापखान्यांत छापिलें.

सन १८८८.

[ या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क छापविणारानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. ]

किंमत अर्धा आणा.

चीं वस्त्रें धुणें, पाणी भरणें, खरकटें काढून शेण लावणें, इत्यादि घरचाकरीचीं कामें शुद्र जातींत होतात तशीं, स्वजातीकडे किंवा परजातीकडे चाकरीस राहून हे लोक कदापि करीत नसत. व स्वजातीचे लोक असलें काम स्वजातीच्या लोकांस सांगतही नसत. जातीच्या दाराशीं भीक मागेन पण असलें नीच काम करणार नाहीं. ह्मणजे जातीसाठीं माती खाईन. उपाशी मरेन, जातीचे जोडे उचलीन, जातीचें लेंकरूं हाडानें चोख राहील.

गोमांतकांत येऊन ते आपली मराठी क्षत्रिय जात विसरले पण देशसंबंधी भंडारी जात व राजवंशीय कुळें विसरले नाहींत. शाणवकुळी नामें पोथी या लोकांत प्रसिद्ध आहे. व बहुतांच्या संग्रहीं आहे. यांचीं कुळें वगैरे बहुतेक मराठ्यांच्या कुळांशीं बरोबर मिळतात. हें यांच्या पुरातन क्षत्रिय वर्णाचें मोठें प्रमाण आहे. या लोकांस विद्येची अभिरुचि नव्हती, ह्मणून यांत कोणी विद्वान झालेले ऐकिवांत नाहीं. भयंकर लढाईच्या गोष्टी ऐकायास यांला बरें वाटतें ; ह्मणून ते तसले ग्रंथ दुसऱ्यापासून ऐकून घेत. हे जुन्या काळच्या लढाईच्या कसरतीची करमणूक व अभ्यास करीत असत. श्रीमहादेव पार्वती हें त्यांचें मुख्य दैवत. ह्मणून त्यांचे अंश जे भैरवनाथ, केदारनाथ, रवळनाथ, खंडेश्वरप्रभृती देव व दुर्गा, भवानी, चंडिका, कालिका, माहामाया, आदिकरून नांवाच्या देवी, हीं आपलीं कुळदैवतें मानून पुजीत असत. फुरसतीच्या वेळांत कित्येक भाविक वृद्ध लोकांस योगमार्गप्रयुक्त वेदांत व हरिहरकथा ऐकण्याची फार गोडी होती.

# सूचना.

---

वृद्धांचीं वचनें ह्मणजे अनुभवाचें भांडार होय. त्यांतून कित्येक सर्वांस अवगत असतात, तरी प्रसंगविशेषीं तीं स्मृत्युपलब्ध होत नाहींत. याकरितां त्यांचा एकत्र संग्रह करावा ह्मणजे सर्वांस तीं ध्यानांत ठेवण्यास सुलभ होऊन आपलें आचरण शुद्ध ठेवण्याविषयीं त्यांस तीं स्मारक होतील. अशा हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे. याचा सर्वांनीं उपयोग करावा.

नि. २५

# विचारमाला

अथवा

## सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी.

---

१ प्रातःकालीं उठावें व शौच मुखमार्जन करावें.

२ स्वच्छता राखण्यासाठीं व स्नान संध्यादि कर्में करण्यासाठीं अंग स्वच्छ धुवावें.

३ कोणत्याही कार्यास प्रारंभ करणें तर आपले दैवतांचें प्रथम स्मरण करावें.

४ आपल्या धर्माची आस्तिक्य बुद्धि आपल्या अंतःकरणांत बाळगावी.

५ उत्तर दिशेस व प्रतीची दिशेस मस्तक ठेऊन शयन करूं नये.

६ आपले दरवाज्याजवळ अतिथी आल्यास आपल्यास सामर्थ्य असेल तर आपण त्यास घेऊन भोजन करावें.

७ जप, होम, पूजन वगैरे आपल्यास फावेल तितक्या वाताबेतानें करावें.

८ फार अपरात्र होई पावेतों बाहेर हिंडूं नये.

९ परकीय स्त्रीवर आपण मो

१० विचार केल्यावांचून कोणतेंही कार्य करूं नये.

११ होतां होईल तितकें करून व्यसनबद्ध होऊं नये, त्यांतही दारू वगैरे वाईट पदार्थांचें सेवन करूं नये.

१२ दुसऱ्या विषयीं व हरएक कामाविषयीं अत्यंत ईर्षा बाळगूं नये.

१३ होतां होईल तितकें राखावें परंतु धर्म सोडून कांहीं ए[क] करूं नये.

१४ साधारण कामासाठीं खोटें बोलूंच नये. परंतु कोणाचे प्राण वांचत असल्यास किंवा एखाद्यास नोकरी मिळत असल्यास किंवा एखाद्याचें अत्यंत महत्संकट दूर होत असल्यास खोटें बोलण्याचा दोष नाहीं.

१५ संगति धरणें तर नेहमीं चांगल्या लोकांबरोबर धरावी, मूर्ख मनुष्यांचे दुष्ट गुण पाहून त्यांकडे मन जाऊं देऊं नये.

१६ आईबाप व दुसरीं घरांतील थोर माणसें यांच्यांशीं नम्रपणाचें वर्तन ठेवावें. व त्यांजपासून नेहमीं चांगलें ह्मणवून घेत जावें. तेणेंकरून आपला कोणत्याही प्रकारचा तोटा होत नाहीं.

१७ कोणास कांहीं देणें तर बाताबेतानेंच द्यावें, दुसऱ्यानें खुलविलें असतां सगळें देऊन टाकून मागाहून पश्चाताप करीत बसणें चांगलें नाहीं.

१८ जातिश्रेष्ठ जे असतील, त्यांचा सहसा अपमान करूं नये.

१९ लोकांनीं मोठा ह्मणण्यासाठीं भलतेंच अचाट कृत्य करूं [नये.] कारण त्याचा परिणाम वाईट होतो, हे लक्षांत ठेवावें.



[२]० सेवा करणें तर नीच पुरुषाची सहसा करूं नये. व [क]र्ता नीच असतांही त्यास नीच समजूं नये.

२१ दुसऱ्याचे प्राणरक्षण आपले हातून होईल तितकें करावें.

२२ आपलें मन लोण्यासारखें मऊ ठेवावें ह्मणजे कोणाचा घातपात करूं नये.

२३ दुर्जनावर उपकार करणें तर तो अनुपकाराप्रमाणेंच करावा.

२४ घरांतील कर्त्यापुरुषानें स्वस्त्रीवश होऊं नये. कारण त्यापासून कुटुंब हानि होते.

२५ आपल्या तोंडानें सदासर्वकाळ आपल्याच गुणाचें वर्णन करूं नये.

२६ शिकार वगैरे करण्याचा अभ्यास असावा, परंतु त्यांत [ली]न होऊं नये.

२७ अति कठोर बोलणें बोलून दुसऱ्याचें मन दुखवूं नये, साधारण बोलण्यांतच आपलें कार्य साधून घ्यावें.

२८ दुसऱ्याचें पैशून्य आपण सहसा बोलूं नये.

२९ चांगले ज्यांस ह्मणतात, त्यांचे दोष आपण काढूं नयेत.

३० मोठ्यांची निंदा करूं नये.

३१ आपल्या संबंधी लोकांची टर उडवूं नये.

३२ मोठमोठ्या लोकांची त्यांच्या योग्यतेनुसार होईल तितकी स्तुति करावी.

३३ आपल्यास गुणी मनुष्य दिसल्यास, त्याचा गुण आदरानें त्याजपासून घ्यावा.

३४ लोभी मनुष्यांची तशीच अतिशय क्रूर पुरुषांची संगति सोडून द्यावी.

३५ कितीही संकटें आलीं तथापि धैर्य सोडूं नये.

३६ विद्येविषयीं उद्योग करून व गुरुजींची सेवा करून विद्या संपादन करावी.

३७ कोणतीही वस्तु व कोणाचीही संगति सोडणें झाल्यास तिचा पूर्ण विचार केल्यावांचून सोडूं नये.

३८ जगांत आपली प्रख्याति ( वाहवा ) होऊन ती आपल्या मरणानंतर चिरकाल राहील अशीच पहिल्यापासून व्यवस्था ठेवावी.

३९ लक्ष्मीचें ( संपत्तीचें ) सुख हें दोन दिवसांचें आहे, असें मनांत आणून तिच्या संचयाकडे विशेष लक्ष्य न देतां होतां होईल तितका सद्व्यय करावा.

४० अशक्त मनुष्यानें नेहमीं क्षमा जवळ बाळगावी.

४१ वेश्येच्या वचनावर भरंवसा कधींहीं ठेवूं नये, कारण त्यांचा धंदा फसविण्याचा असतो.

४२ आपण कपटानें कधींहीं सुकीर्ति मिळविण्याचे भानगडींत पडूं नये.

४३ लोकांतल्या कांहींतरी पोकळ गप्पा ऐकून ताबडतोब आपण त्या खऱ्या मानूं नये. तर प्रथम आपण त्यांचा विचार करावा.

४४ आपणास दैवयोगानें एखादी मोठी कामगिरीची जागा किंवा जगांत संपत्ति मिळाली म्हणून आपणास जे वडील असून पूज्य आहेत, त्यांचा हेवा व निंदा करूं नये.

४५ कितीही लोकांनीं हितोपदेश केला तथापि आपण त्याचा विचार करावा.

४६ नानाप्रकारचे देश पहावे, कारण त्यांत तीर्थ व स्वार्थ हीं दोन्ही घडतात.

४७ आपणास आपत्कालीं उपयोगी पडतील अशा प्रकारच्या युक्त्या पूर्वीपासून योजून ठेवाव्या.

४८ दुष्टस्वभावाची स्त्री मिळाल्यास तिचा त्याग करावा असें धर्मशास्त्र आहे.

४९ गीत, वाद्य, रतिविलासादिकांचे ठिकाणीं प्रीति असावी, परंतु त्यांविषयीं नादिष्ट होऊं नये.

५० आपली सर्व देव, घेव व ठेव पुत्राचें स्वाधीन करूं नये.

५१ सुधारणा करण्याकडे विशेष लक्ष्य द्यावें.

५२ दोघांच्या तंट्यांत पडून तंटा मिटवावा, परंतु एक बाजू कधींही धरूं नये.

५३ ज्या राज्यांत स्त्रीचें प्राबल्य आहे, राजा बालक आहे, मंत्री अक्षरशत्रु आहे, त्या राज्यांत धनाचें रक्षण तर राहिलें, पण प्राणांचें-ही रक्षण होणें कठीण.

५४ चोर, परस्त्रीच्या ठिकाणीं जे मोहित ते व सोंगट्या व फांसे खेळणारे ह्यांस झोंप नाहीं.

५५ पाण्यावर काठी मारीत बसल्यास जसें फळ मिळत नाहीं, तशीं निष्फळ कामें करूं नये.

५६ वेळ फावेल तितक्या म्हाताऱ्या मनुष्याच्या गोष्टी ऐकाव्या.

५७ सर्वकाळ विद्येंत न घालवितां थोडेंसें खेळत जावें.

५८ खाण्यांत व व्यवहारांत भीड कोणाचीही धरूं नये. कारण भिडेनें मनुष्य फसतो.

५९ गोड बोलण्यास जातीची, रूपाची व कर्माची जरूर नाहीं.

६० धैर्य असल्याशिवाय लक्ष्मी मिळत नाहीं.

६१ शौर्य दाखविल्याशिवाय जय होत नाहीं.

६२ ज्ञानप्राप्ति झाल्याशिवाय मोक्ष मिळत नाहीं.

६३ दानें केल्याशिवाय यशाचा वांटा मिळत नाहीं.

६४ शौर्यापासून फार फायदे आहेत. शौर्यानें लोकांचें रक्षण कारितां येतें, शौर्य अंगांत असल्यास प्रसंगीं मोठ्या हुद्याची जागा मिळते; शौर्यानेंच मोक्ष प्राप्ति होते; इत्यादि पुष्कळ आहेत.

६५ क्षमेसारखी दुसरी तरवार नाहीं. सहनशीलता ही तिचीच सोबतीण. क्षमा ज्याच्या जवळ आहे त्याचीं सर्व कामें सिद्ध होतात; व फार उत्तम रीतीनें पारही पडतात. धर्म थोडा तरी करावा.

६६ गांवीं गेलेल्या मनुष्यास बारा वर्षें झालीं असल्यास व त्याचा आपणास कोणत्याही रीतीनें शोध लागत नसल्यास त्याचे प्रेतसंस्कार करावेत.

६७ लग्नें वगैरे करून लोकांची मुलगी कशाला नाडावी असें ह्मणून परस्त्री गमन, अथवा वेश्येचे घरीं जाणें यापेक्षां लग्न करून गरीबींत संसार करणें फार चांगलें आहे.

६८ पहिली लग्नाची बायको रीतीनें वागत नसल्यास दुसरी करण्यास शास्त्राचा अडथळा नाहीं.

६९ आपण वाईट मार्गास लागलों तर आपला सखा भाऊही मदत करीत नाहीं.

७० लोकांनीं ठरविलेल्या चांगल्या मार्गानें आपण चालावें.

७१ अज्ञानी मनुष्याची लौकर समजूत होते; ज्ञानी मनुष्याची त्याहून लौकर समजूत होते. परंतु धड शहाणा नाहीं व धड मूर्खही नाहीं अशा अर्धवट मनुष्याची समजूत कोणाच्यानेंही होत नाहीं.

७२ संगती नेहमीं विद्वानाची धरावी.

७३ ग्रंथ वाचणें तर चांगले मोठमोठे व सर्वमान्य असतील असेच वाचावे.

७४ भांडण उभें राहण्याचा घांट दिसल्यास त्याच्या उत्पत्ति-स्थानांकडे लक्ष्य पोहोंचवावें ह्मणजे भांडण मिटतें.

७५ पुष्कळ विद्वानांपासून पुष्कळ गोष्टी ऐकाव्या.

७६ मोठे लोकांचे बायकांशीं बोलण्याचालण्याचा फारसा घरोबा ठेऊं नये.

७७ आपण ज्या जागेवर गप्पा मारावयास बसतों तेथून उठल्यावर एकवार तेथें पाहावें.

७८ सकाळीं उठून आपण आपलें अथवा देवाचें अगोदर दर्शन घ्यावें, नंतर इतर मनुष्यें पाहावीं.

७९ कोणाशीं वाद करणें तर समजून उमजून करावा; निरर्थक

आपणावर बाजू येऊं नये, अशीच कल्पना मनांत आणून वाद करूं नये.

८० सर्व गोष्टी करण्यापेक्षां त्यांचें परिणामाचा विचार करणें फार चांगलें.

८१ उगीच पांटीभर बोलण्यापेक्षां न बोलणें हा मार्ग उत्तम.

८२ शहाणपण घेणें तेथें लहान थोराचा विचार करूं नये; जेथें दृष्टीस पडून येईल, तेथून घ्यावें. फार तर काय मुलापासून सुद्धां घ्यावें.

८३ आपणास पक्केपणानें कोणतीही गोष्ट माहीत असली तरी कोणाच्या सांगितल्यावरून एकाएकीं करूं नये.

८४ आपल्याच्यानें राखवेल तितकी आपली, धन्याची, शेजाऱ्याची आणखी इतरांची अब्रू ( मोठेपणा ) राखावी.

८५ दुसऱ्यानें आपणास फसविल्यास आपण त्यास फसवावें, त्याचा दोष नाहीं.

८६ इकडली गोष्ट तिकडे सांगणें, तिकडली गोष्ट इकडे सांगणें, अशा प्रकारची वाईट खोडी लागलेली सोडून द्यावी; कारण त्यापासून फार भयंकर परिणाम घडतात.

८७ द्वेष धरणें तर तो कामापुरता धरावा. त्याची आपल्या शरीरांत चिरकाळ स्थिति होऊं नये.

८८ अल्पविद्या असली ह्मणजे मी सर्वज्ञ आहें असा मनुष्यास गर्व सहज होतो. म्हण आहेच कीं उथळ पाण्यास खळखळाट फार.

८९ ब्राह्मणाची मुंज चुकून राहिली असल्यास सोळा वर्षांपावेतों हरकत नाहीं.

९० मनुष्यास पैक्याची आशा सुटली ह्मणजे बापाची परवा नाहीं किंवा भावाची परवा नाहीं; भूक लागली ह्मणजे कांहीं कच्चें नाहीं व कशाची गोडी नाहीं; काम उत्पन्न झाला ह्मणजे भय नाहीं व लज्जा नाहीं; आणि चिंता प्राप्त झाली ह्मणजे निद्रा नाहीं आणि सुख नाहीं.

९१ आपल्या धर्मांत पूर्वीं काय काय झालें याचा इतिहास पाहणें असल्यास भारत ग्रंथ वाचावा.

९२ रामाची पूर्ण स्थिति पाहणें असल्यास वाल्मिकीचें रामायण वाचावें, सोपें असून माहिती फार व चांगली आहे.

९३ सोबती करणें तर आपल्यासारखा आपल्या योग्यतेचाच करावा.

९४ दुष्ट मनुष्याच्या दुराचरणाचें फळ बहुतेक साधु पुरुषांस भोगावें लागतें.

९५ आपल्या भावांशीं आपण वैर उत्पन्न करूं नये, केल्यास फार नाश होतो.

९६ आपण केलेली प्रतिज्ञा पूर्ण करावी.

९७ नेहमीं सर्वांनीं लोकरीतीस धरून चालावें. ती सोडल्यास निरपराधी असल्यासही अपराधी ठरतो.

९८ मूर्ख मनुष्याशीं गोड गोड बोलून त्यास दूर करावें.

९९ पक्का मूर्ख जो आहे त्यास हिताची गोष्ट कधींही सांगूनये.

आपणावर बाजू येऊं नये, अशीच कल्पना मनांत आणून वाद करूं नये.

८० सर्व गोष्टी करण्यापेक्षां त्यांचें परिणामाचा विचार करणें फार चांगलें.

८१ उगीच पांटीभर बोलण्यापेक्षां न बोलणें हा मार्ग उत्तम.

८२ शहाणपण घेणें तेथें लहान थोराचा विचार करूं नये; जेथें दृष्टीस पडून येईल, तेथून घ्यावें. फार तर काय मुलापासून सुद्धां घ्यावें.

८३ आपणास पक्केपणानें कोणतीही गोष्ट माहीत असली तरी कोणाच्या सांगितल्यावरून एकाएकीं करूं नये.

८४ आपल्याच्यानें राखवेल तितकी आपली, धन्याची, शेजाऱ्याची आणखी इतरांची अब्रू ( मोठेपणा ) राखावी.

८५ दुसऱ्यानें आपणास फसविल्यास आपण त्यास फसवावें, त्याचा दोष नाहीं.

८६ इकडली गोष्ट तिकडे सांगणें, तिकडली गोष्ट इकडे सांगणें, अशा प्रकारची वाईट खोडी लागलेली सोडून द्यावी; कारण त्यापासून फार भयंकर परिणाम घडतात.

८७ द्वेष धरणें तर तो कामापुरता धरावा. त्याची आपल्या शरीरांत चिरकाळ स्थिति होऊं नये.

८८ अल्पविद्या असली ह्मणजे मी सर्वज्ञ आहें असा मनुष्यास गर्व सहज होतो. म्हण आहेच कीं उथळ पाण्यास खळखळाट फार.

८९ ब्राह्मणाची मुंज चुकून राहिली असल्यास सोळा वर्षांपावेतों हरकत नाहीं.

९० मनुष्यास पैक्याची आशा सुटली ह्मणजे बापाची परवा नाहीं किंवा भावाची परवा नाहीं; भूक लागली ह्मणजे कांहीं कच्चें नाहीं व कशाची गोडी नाहीं; काम उत्पन्न झाला ह्मणजे भय नाहीं व लज्जा नाहीं; आणि चिंता प्राप्त झाली ह्मणजे निद्रा नाहीं आणि सुख नाहीं.

९१ आपल्या धर्मांत पूर्वी काय काय झालें याचा इतिहास पाहणें असल्यास भारत ग्रंथ वाचावा.

९२ रामाची पूर्ण स्थिति पाहणें असल्यास वाल्मिकीचें रामायण वाचावें, सोपें असून माहिती फार व चांगली आहे.

९३ सोबती करणें तर आपल्यासारखा आपल्या योग्यतेचाच करावा.

९४ दुष्ट मनुष्याच्या दुराचरणाचें फळ बहुतेक साधु पुरुषांस भोगावें लागतें.

९५ आपल्या भावांशीं आपण वैर उत्पन्न करूं नये, केल्यास फार नाश होतो.

९६ आपण केलेली प्रतिज्ञा पूर्ण करावी.

९७ नेहमीं सर्वांनीं लोकरीतीस धरून चालावें. ती सोडल्यास निरपराधी असल्यासही अपराधी ठरतो.

९८ मूर्ख मनुष्याशीं गोड गोड बोलून त्यास दूर करावें.

९९ पक्का मूर्ख जो आहे त्यास हिताची गोष्ट कधींही सांगूनये.

१०० आपणापेक्षां जो मोठा बलाढ्य आहे त्याच्याशीं आपण युद्धाची तयारी करूं नये.

१०१ कसलाही प्रसंग आला तरी धैर्य सोडूं नये.

१०२ कपटी लोकांबरोबर खेळ खेळूं नये.

१०३ चांगल्या मित्रांनीं सांगितलेल्या गोष्टींचा विचार करून त्या कराव्या. न केल्यास फार हानि होते.

१०४ मोठ्यांची निंदा कधींच करूं नये

१०५ लोकांचें ऋण होतांहोईल तितकें लवकर फेडावें.

१०६ कोणतेंही काम एकाएकीं करूं नये.

१०७ आपणास कोणतेंही काम आपल्या गुरूनीं सांगितलें असल्यास त्याचा विचार न करितां तें करावें.

१०८ यश मिळविण्यासाठीं मोठें साहस कृत्य केलें तरी हरकत नाहीं.

१०९ अति वाईट जें कृत्य आहे तें करण्यास कधींही तयार होऊं नये.

११० दुष्ट मनुष्याची क्षमा करूं नये.

१११ शत्रु आपल्याला शरण आल्यास त्याचा नाश करूं नयें.

११२ दुष्ट स्वभावाच्या यजमानाजवळ चाकरीस राहूं नये.

११३ केलेल्या पापकर्माचा विचार करावा.

११४ ऐश्वर्योपभोग हे क्षणभर सुख देणारे आहेत असें समजावें.

११५ दुःखी मनुष्यास पाहिल्यावर आपणास दुःख वाटणें साहजिक आहे.

११६ हातीं घेतलेलें काम अपुरतें टाकून देऊं नये.

११७ मोठेपणा मिळविण्यासाठीं मोठ्यांचाच आश्रय करावा.

११८ स्वतःचें जितकें रक्षण होईल तितकें करावें.

११९ आपल्या पडत्या काळांत स्वभावानें चांगला व उत्तम असा पाहून मित्र करावा.

१२० मूर्खास उपदेश केला तर त्याचें समाधान होणें दूरच राहिलें पण त्यास उलटा क्रोध मात्र येतो.

१२१ चांगल्या मोठ्या महत्वाच्या कामावर चांगल्याचीच नेमणूक करावी.

१२२ ज्या देशाचा राजा दुष्ट आहे त्या देशांत राहूं नये.

१२३ आपणांस भलत्याच ठिकाणीं राग येऊं देऊं नये.

१२४ आपल्याला जो शरण आला त्याचा कोणत्याही बाजूनें नाश करूं नये.

१२५ लोक ज्यास वाईट असें म्हणतात, तेंच काम आपण करूं नये.

१२६ प्रतिज्ञा वगैरे कांहीं करणें झाल्यास चांगल्या लोकांबरोबर करावी.

१२७ मनुष्याचा वरचा घाट पाहून आंतली बाजू ओळखून काढावी.

१२८ दुष्ट मनुष्यास पाहिल्या बरोबर नमस्कार करावा.

१२९ मरण हें कोणाला सुटत नाहीं, मुनीचा वर असो व न तें सर्वांस आहेच.

१३० स्वप्नांत ज्याप्रमाणें सर्व गोष्टी आपणास खऱ्या खऱ्या भासतात व जागें झाल्यावर कांहीं नाहीं असें भासतें त्याप्रमाणें हें सर्व जग आहे असें समजावें.

१३१ या जगांत जितक्या मनुष्याच्या उपभोगाच्या वस्तु आहेत, तितक्या सर्व विषाप्रमाणें भयंकर आहेत असें समजावें.

१३२ ज्यांस लोक साधु समजतात त्यांस आपण नमस्कार करावा.

१३३ राजा, गुरु किंवा देव यांचे दर्शनास जाणें झाल्यास रिक्त हस्तानें जाऊं नये.

१३४ शत्रूस भेटण्यासाठीं जाणेंच असेल तर एकट्यानें जाऊंच नयें.

१३५ मनुष्य दरिद्र स्थितींत असतांना त्याच्या विद्येचा कोणत्याही प्रकारानें उदय होत नाहीं.

१३६ आपला धर्म कसाही असला तरी सोडूं नये.

१३७ हत्ती विकल्यावर अंकुशाबद्दल तंटा घालण्यांत काय अर्थ?

१३८ बोलाविल्यावांचून कोणाचेही घरीं जाऊं नयें.

१३९ आपण आपल्या शत्रूस जिंकिलें असतांही तो शत्रू असें मनांत आणून त्याजवर विश्वास ठेऊं नये.

१४० तपस्वी लोकांस त्रास देऊं नये.

१४१ काम ह्मणजे इच्छा इची नेहमीं आपण आपल्या मनांत ीति बाळगावी.

१४२ शाहण्या मनण्यानें मनांत गर्व धरूं नये.

१४३ पुरुषानें नेहमीं कांहींतरी व्यवसाय करीत असावा, कीं ज्यापासून पुढें आपणास कांहींतरी फळ मिळेल.

१४४ आपल्या स्त्रीला आपण होऊन बहुमान देऊं नये.

१४५ आपल्या मित्राचा जो शत्रु तो आपलाच शत्रु आहे असें समजून त्याच्याशीं तसेंच वर्तन ठेवावें.

१४६ आपल्याला समजूं उमजूं लागल्या दिवसापासून शेवटीं आपणाला ज्या कृत्यापासून संताप उत्पन्न होईल असलें कृत्य कधींही करूं नये.

१४७ गोडबोलणारे पुरुष पुष्कळ असतात, परंतु ऐकणाऱ्यास आवडलें नाहीं तरी, त्याचें ज्यांत हित असेल तेंच बोलणारे पुरुष दुर्लभ.

१४८ सत्य, दान, उद्योग, हेवा न करणें, क्षमा, धैर्य हे गुण पुरुषानें कधींही सोडूं नयेत.

१४९ बाल्यावस्थेंत खेळणें, तारुण्यांत विद्या संपादन करून कीर्ति मिळविणें व ज्ञातारपणीं आपल्या जगन्नियत्या परमेश्वराचें स्मरण निशिदिनीं करणें हेंच योग्य आहे.

१५० आपणाला सर्वोपरी सुखोपभोग देणाऱ्या परमेश्वराचें निरंतर स्मरण करावें.

**समाप्त.**